सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर बुधवार, दि. २० ऑगस्ट २०२५ ⏮ वर्ष - तिसरे ⏮ अंक १३८ ⏮ पाने : ८+४ ⏮ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अमेरिका-चीनची चिंता वाढणार, टॅरिफनंतरही अर्थव्यवस्था दिलासादायक

नवी दिल्ली : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर टॅरिफ लावण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. सुरुवातीला भारतावर २५ टक्के टॅरिफ लावण्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र, भारत रशियाकडून मोठ्या प्रमाणात तेल खरेदी करत असल्याचा मुद्दा पुढे करत अमेरिकेने आणखी २५ टक्के अतिरिक्त टॅरिफ लावण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे एकूण ५० टक्के टॅरिफ भारतीय वस्तूंवर लागू होणार आहे. हा नवा टॅरिफ येत्या २८ ऑगस्टपासून लागू होणार आहे. ट्रम्प यांच्या या निर्णयानंतर भारताच्या अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होऊ शकतो, अशी चिंता तज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात येत होती. मात्र, या सर्व अंदाजांना धक्का देणारी आणि वेगळे चित्र दाखवणारी माहिती आता समोर आली आहे.

भारताचा बेरोजगारी दर घसरला; जुलै महिन्यात ५.२% वर

जुलै महिन्यात भारताच्या बेरोजगारी दरात लक्षणीय घट झाल्याचे चित्र समोर आले आहे. देशाचा बेरोजगारी दर ५.६ टक्क्यांवरून कमी होऊन ५.२ टक्क्यांवर आला आहे. ग्रामीण भागातील स्थिती पाहता, १५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या तरुणांचा बेरोजगारी दर ४.९ टक्क्यांवरून घसरून ४.४ टक्क्यांवर पोहोचला आहे. या घटमागे मुख्य कारण म्हणून ग्रामीण भागात



पावसाळ्यामुळे शेतामध्ये सुरू असलेली कामे दिली जात आहेत. दरवर्षीप्रमाणेच पावसाळा आणि हिवाळ्यात शेतीसंबंधित कामांमुळे मोठ्या प्रमाणात मजुरांना रोजगार उपलब्ध होतो. त्यामुळे ग्रामीण अर्थचक्राला गती मिळाल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

शहरी बेरोजगारीत किंचित वाढ, तरीही देशाचा बेरोजगारी दर ५.२% वर

भारतातील बेरोजगारीच्या आकडेवारीत ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये वेगवेगळे चित्र दिसून येत आहे. शहरी भागात बेरोजगारी दरात किंचित वाढ झाली आहे. जून महिन्यात शहरी बेरोजगारी दर ७.१ टक्के होता, तो जुलै महिन्यात वाढून ७.२ टक्क्यांवर पोहोचला आहे. तथापि, ग्रामीण भागातील रोजगाराच्या संधींमुळे एकूण राष्ट्रीय बेरोजगारी दर घटला आहे. सरासरी पाहता, भारताचा बेरोजगारी दर ५.६ टक्क्यांवरून कमी होऊन ५.२ टक्क्यांवर आला आहे. या घटीमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला काही प्रमाणात दिलासा मिळाल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

जीएसटी सुधारणा; रोजगारवाढीची शक्यता

भारतातील अर्थव्यवस्थेसाठी दिलासादायक घडामोड घडली आहे. केंद्र सरकारकडून नुकतंच जीएसटीमध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा (ऋड्ढ ठशर्षेाी) करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे. या सुधारणा अमलात आल्यास देशातील व्यापाराला चालना मिळेल आणि विविध क्षेत्रांमध्ये नव्या रोजगार संधी निर्माण होण्याची शक्यता आहे. परिणामी, बेरोजगारी दर आणखी खाली येऊ शकतो. दरम्यान, अमेरिकेने भारतावर टॅरिफ लावल्यानंतर अर्थव्यवस्थेबाबत चिंता व्यक्त होत होती. मात्र, जीएसटी रिफॉर्मच्या निर्णयामुळे या चिंतेवर काही प्रमाणात पाणी फिरल्याचे मानले जात आहे. तज्ज्ञांच्या मते, येत्या काळात रोजगार वाढून बेरोजगारी दरात आणखी घट होण्याची शक्यता आहे.

# मुंबईत भरतीच्या वेळी पाऊस पडला तर, धोका वाढेल...मुख्यमंत्र्यांचे निर्देश

मुंबई : नांदेड जिल्ह्यात मंगळवारी ढगफुटीसदृश पाऊस झाला. या अतिवृष्टीमुळे ८ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, सध्या तेथील परिस्थिती हळूहळू नियंत्रणात येत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, मुंबईतही पावसाने प्रचंड जोर पकडला. काही भागांमध्ये तब्बल ३०० मिलिमीटरहून अधिक पाऊस झाल्याची नोंद झाली आहे. हा पाऊस विक्रमी ठरला असून यामुळे शहरातील अनेक ठिकाणी पाणी साचले आहे. काही भागांमध्ये पाण्याचा निचरा सुरू झाल्यामुळे वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मुंबईची लाईफलाईन मानली जाणारी लोकल ट्रेन सेवा मुसळधार पावसामुळे काही प्रमाणात विस्कळीत झाली होती. मात्र, आता परिस्थिती सुधारत असल्याने वाहतूक हळूहळू पूर्ववत होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. ते मंगळवारी मुंबईत झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीनंतर पत्रकारांशी बोलत होते.

मुंबईत पावसाचा जोर कायम राहिल्यास संकट वाढणार

मुंबईत गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे परिस्थिती चिंताजनक झाली आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांशी संवाद साधला. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पुढील काही तास पावसाचा जोर कायम राहिला, तर मुंबईत आव्हानात्मक परिस्थिती निर्माण होऊ शकते. विशेषतः मिठी नदी धोकादायक पातळीवर गेल्याने प्रशासनाला तातडीने ४०० ते ५०० नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे लागले. नदीच्या पातळीवर सातत्याने लक्ष ठेवले जात असून, गेल्या काही तासांमध्ये पाणी काहीसे ओसरले आहे. मात्र हवामान खात्याने येत्या काही तासांत पुन्हा मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. त्यामुळे प्रशासनाने सर्व यंत्रणा सतर्क ठेवल्या आहेत. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी सरकारी व खासगी कार्यालयांना सुट्टी देण्यात आली असून, कर्मचाऱ्यांना वर्क फ्रॉम होम चा पर्याय दिला आहे. याशिवाय आज संध्याकाळी समुद्राला भरती येणार असल्याने त्यावेळी परिस्थिती कशी राहील हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

राज्यातील नद्या धोक्याच्या पातळीवर

राज्यातील वाढत्या पावसाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परिस्थितीबाबत महत्वाची माहिती दिली आहे. त्यांनी सांगितले की, राष्ट्रीय आपत्ती निवारण दल आणि राज्य आपत्ती निवारण दल यांना पूर्णपणे सज्ज राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. राज्यातील बहुतांश नद्या इशारा पातळीवर पोहोचल्या असून, काही नद्या या पातळीच्या वर गेल्या आहेत. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी शेजारच्या राज्यांशी संपर्क ठेवण्यात आला आहे. पाण्याचा विसर्ग व्यवस्थापन योग्यरीत्या होत असून, विशेषतः हिपरगी धरणाचा विसर्ग वाढवण्याची मागणी करण्यात आली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, तेलंगणा सरकारशीही संपर्क साधला आहे. तथापि, काही कॅचमेंट क्षेत्रातील परिस्थिती पूर्णतः आपल्या नियंत्रणात नसली तरी त्यावर लक्ष ठेवण्यात येत आहे. प्रशासन प्रत्येक हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे आणि नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य दिले जात आहे.

मुंबईत विक्रमी पाऊस ३०० मिमीपेक्षा जास्त; दर तीन तासांनी अलर्ट

मुंबईत झालेल्या पावसाने विक्रमी पातळी गाठली असून, काही भागांत तब्बल ३०० मिलिमीटरपेक्षा अधिक पाऊस झाला आहे. हा पाऊस अतिवृष्टीपेक्षाही मोठा असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. ते म्हणाले की, मिठी नदीतील गाळ काढण्याच्या कामाबाबत अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत आणि त्याचा परिणामही पावसाच्या परिस्थितीवर होताना दिसतो आहे. यासोबतच, बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने पावसाची तीव्रता वाढली आहे. तोपर्यंत अतिवृष्टी संभाव्य असल्याने मुंबईसाठी रेड अलर्ट जारी केला गेला आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले की, शहरांमध्ये डिझाईन 'नॉर्मल प्लस १०' या पद्धतीने केलेले असते. मात्र, विक्रमी पावसामुळे अडथळे निर्माण होणे स्वाभाविक आहे. नागरिकांना वेळोवेळी अचूक माहिती मिळावी यासाठी प्रशासनाने दर तीन तासांनी अलर्ट जारी करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे कोणत्या भागात किती पाऊस होईल याची माहिती लोकांपर्यंत पोहोचवली जात आहे.

ग्रामीण भागातील पीडितांना तत्काळ मदतीचे आदेश

राज्यातील ग्रामीण भागात मुसळधार पावसामुळे अनेकांचे घरं कोसळली, जनावरे मृत्युमुखी पडली आणि मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या परिस्थितीवर तात्काळ उपाय म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हाधिकाऱ्यांना विशेष अधिकार आणि आदेश दिले आहेत. त्यामुळे जिल्हाधिकारी तातडीने पीडितांना मदत करू शकतील. याशिवाय, मृतांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत करण्यासाठी आवश्यक पावले उचलली जात आहेत. शेतीचे नुकसान झालेले आहे, मात्र त्याबाबतची मदत पंचनामे पूर्ण झाल्यानंतर दिली जाईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

# राज्य मंत्रिमंडळाचे महत्त्वाचे निर्णयः आरोग्य आणि भूमी वापरासंदर्भात घोषणा

मुंबई: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यामध्ये आरोग्य सुविधांचा विस्तार, शासकीय जमिनींचा वापर आणि कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करण्यासंबंधीचे निर्णय प्रामुख्याने समाविष्ट आहेत.

आरोग्य आणि शैक्षणिक क्षेत्राला चालना

मुंबईतील टाटा मेमोरिअल सेंटर: मुंबईमध्ये टाटा मेमोरिअल सेंटरच्या एकात्मिक आयुर्वेदिक कर्करोग दवाखाना आणि संशोधन केंद्रात १०० खाटांचे रुग्णालय उभारले जाणार आहे. या महत्त्वाच्या प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या जमिनीच्या हस्तांतरणावर मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कोल्हापूरमध्ये औद्योगिक वसाहत: कोल्हापूर येथील सावित्रीबाई फुले महिला सहकारी औद्योगिक वसाहत लिमिटेडला कसबा करवीर येथील गट क्र. ६९७/३/६ मधील २ हेक्टर ५० आर जमीन देण्यास मान्यता देण्यात आली आहे. यामुळे महिला उद्योजिकांना प्रोत्साहन मिळेल.



अतिक्रमण नियमितीकरण: सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मौजे वेंगुर्ला - कॅम्प गवळीवाडा येथील शासकीय जमिनीवरील अतिक्रमण नियमानुकूल करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.

कर्मचाऱ्यांची सेवा नियमित: राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयांमधील गट-क (तांत्रिक) संवर्गातील १७ कर्मचाऱ्यांची तात्पुरती सेवा नियमित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. हे कर्मचारी २९ दिवसांच्या तत्त्वावर कार्यरत होते. या निर्णयामुळे आरोग्य आणि औद्योगिक क्षेत्रातील प्रकल्पांना गती मिळेल, तसेच दीर्घकाळ सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

मंत्रिमंडळ निर्णय (संक्षिप्त)

मुंबईतील टाटा मेमोरिअल सेंटरच्या एकात्मिक आयुर्वेदिक कर्करोग दवाखाना आणि संशोधन केंद्रात १०० खाटांचे रुग्णालय उभारण्यासाठी मुद्रांक शुल्क माफ. (महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क विभाग)

कोल्हापुर येथील सावित्रीबाई फुले महिला सहकारी औद्योगिक वसाहत लिमिटेड, संस्थेस कसबा करवीर, बी वॉर्ड, कोल्हापूर येथील गट क्र.६९७/३/६ मधील २ हे. ५० आर जमीन देणार. (महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क विभाग)

सिंधुदुर्ग जिल्ह्यामधील मौजे वेंगुर्ला - कॅम्प गवळीवाडा येथील शासकीय जमिनीवरील अतिक्रमण नियमानुकूल करण्यास मान्यता. (महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क विभाग)

राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील गट-क (तांत्रिक) संवर्गातील विविध पदावर २९ दिवस तत्त्वावर कार्यरत १७ कर्मचाऱ्यांची तात्पुरती सेवा नियमित करण्यास मान्यता. (वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग)

# मुंबई गोवा महामार्ग वाहतुकीसाठी बंद

माणगाव : मुंबईकडून माणगावकडे येणा-या मार्गावर माणगाव येथील कळमजे माणगाव ब्रीज कमकुवत झाल्याने १९ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता हा पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. त्यामुळे माणगाव परिसरात वाहतूक कोंडीला सुरुवात झाली आहे. त्यामुळे वाहतुकीमध्ये महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे.



माणगावजवळील कळमजे गावाजवळील पुलावरून पाणी वाहू लागल्याने पुलाला तडे गेले आहेत. त्यामुळे सुरक्षेच्या कारणास्तव वाहतूक पूर्णपणे थांबवण्यात आली आहे. त्यामुळे माणगाव-महाड-पोलादपूर तसेच तळकोकणाकडे जाणारी वाहतूक कोलाड-भिरा फाटा-सुतारवाडी-विले-जावठा-निजामपूर मार्गे वळविण्यात आली आहे. यामुळे वाहनचालकांना मोठ्या प्रमाणावर गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. दरम्यान, सततच्या पावसामुळे रोहा तालुक्यातील नद्या-नाले ओसंडून वाहू लागले असून काही नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे. राष्ट्रीय महामार्गावरील अनेक ठिकाणी पाणी साचल्याने वाहनचालकांना तारेवरची कसरत करत मार्गक्रमण करावे लागत आहे. स्थानिक प्रशासन आणि पोलिस यंत्रणा सतत दक्ष राहून वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

सोमवारी रात्रीपासून मंगळवारी पहाटेपर्यंत झालेल्या मुसळधार पावसामुळे मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग वर अनेक ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली आहे.

# आशिया कपसाठी टीम इंडियाची घोषणा! सूर्या करणार नेतृत्व

मुंबई : दिनांक ९ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या आशिया कप २०२५ साठी बीसीसीआयने टीम इंडियाची घोषणा केली आहे. मुख्य निवडकर्ते अजित आगरकर यांनी पत्रकार परिषद घेऊन टीम इंडियाचा संघ जाहीर केला. ज्यात सूर्यकुमार यादवच्या खांद्यावर कर्णधारपदाची धुरा सोपवण्यात आली असून, शुभमन गिल उपकर्णधार म्हणून भारताच्या टी २० टीमची कमान सांभाळेल. बीसीसीआयने जाहीर केलेल्या आशिया कप २०२५ साठीच्या टीमध्ये कोणकोणत्या खेळाडूंचा स्थान मिळाले आहे, याबद्दल सविस्तर जाणून घेऊया.

बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया आणि निवड समिती यांच्यातील बैठकीनंतर आशिया कप २०२५ साठी निर्णायक संघ जाहीर करण्यात आला. आयपीएलमधील



काही सिद्ध कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना यंदा दुर्लक्षित करण्यात आल्याचे दिसते, तर कमी प्रभावी कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. ज्यामध्ये शुभमन गिलला उपकर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आले आहे, तर जसप्रीत बुमराहचा संघात समावेश करण्यात आला आहे. मात्र श्रेयस अय्यर आणि यशस्वी जयस्वालला संघात स्थान मिळू शकलेले नाही.

आयपीएल २०२५ मध्ये अय्यरने ६०४ धावा केल्या होत्या तर जयस्वालने ५५९ धावा केल्या होत्या. या दोघांची एकत्रितपणे, एकूण संख्या ११६३ पेक्षा जास्त होती. रिंकू सिंगने आयपीएल हंगामात खराब कामगिरी असूनही संघात स्थान मिळवले आहे. मात्र जयस्वालचा पाच राखीव खेळाडूंमध्ये समावेश करण्यात आला आहे.

आशिया कप २०२५ साठी टीम इंडियाचा संघ:

सूर्यकुमार यादव (कर्णधार), शुभमन गिल (उपकर्णधार), अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, हार्दिक पांड्या, शिवम दुबे, अक्षर पटेल, जितेश शर्मा, जसप्रीत बुमराह, अर्शदीप सिंग, वरुण चक्रवर्ती, कुलदीप यादव, संजू सॅमसन, हर्षितराणा, रिंकू सिंग.

यावर्षीचा आशिया कप ९ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर दरम्यान अबू धाबी आणि दुबई येथे खेळला जाणार आहे. तसेच यावेळी ही स्पर्धा टी-२० स्वरूपात असेल. विशेष म्हणजे, यावर्षी पहिल्यांदाच आशिया कपच्या इतिहासात आठ संघांचा समावेश करण्यात आला आहे. या आठ संघांना दोन गटात विभागण्यात आले आहे. आधी लीग स्टेज सामने खेळवले जातील, ज्यामध्ये प्रत्येक संघ ३ सामने होतील. त्यानंतर अंतिम ४ ची फेरी होईल. यातील अव्वल संघांमध्ये २८ सप्टेंबर रोजी विजेतेपदाचा सामना खेळला जाईल.

टीम इंडियाचं वेळापत्रक

भारतीय संघाला आशिया कपच्या गट अ मध्ये पाकिस्तान, ओमान आणि युएईसह स्थान देण्यात आले आहे. तर गट ब मध्ये श्रीलंका, बांगलादेश, हाँगकाँग आणि अफगाणिस्तानचे संघ आहेत. भारतीय संघ आपला पहिला सामना १० सप्टेंबर रोजी दुबईमध्ये युएई विरुद्ध खेळेल. त्यानंतर त्यांचा पुढचा सामना १४ सप्टेंबर रोजी दुबईमध्ये पाकिस्तान विरुद्ध होईल. भारतीय संघ आपला शेवटचा गट सामना १९ सप्टेंबर रोजी अबू धाबीमध्ये ओमान विरुद्ध खेळेल. आशिया कप दोन्ही गटातील टॉप-२ संघ सुपर-४ टप्प्यात पोहोचतील. त्यानंतर सुपर-४ टप्प्यातील टॉप २ संघांमध्ये जेतेपदाचा सामना खेळवला जाईल.

# प्रशिक्षणातून नवउद्योजकांना प्रगतीची नवी दिशा - विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर

## एमसीईडीत नवउद्योजकांसाठी क्षमता बांधणी कार्यशाळा





छत्रपती संभाजीनगर, दि.१९ : नवउद्योजकांनी व्यवसाय करताना योग्य प्रशिक्षणाचा लाभ घेऊन उद्योगक्षेत्रात प्रगती साधावी. कृषी आधारित उद्योग तसेच इतर व्यवसायामध्ये यश मिळवण्यासाठी प्रशिक्षणातून मिळणाऱ्या ज्ञानाचा प्रभावी वापर करा, असे प्रतिपादन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी केले.

सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय, केंद्र शासन, नवी दिल्ली व जागतिक बँक पुरस्कृत, तसेच महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, मुंबई आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी), छत्रपती संभाजीनगर विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांतील नोंदणीकृत उद्योजकांसाठी एक दिवसीय क्षमता बांधणी कार्यशाळेचे आयोजन आज एमसीईडीच्या मुख्य कार्यालयात करण्यात आले. यावेळी विभागीय आयुक्त श्री. पापळकर बोलत होते.

कार्यक्रमाला महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे कार्यकारी संचालक विक्रांत बगाडे, जिल्हा अग्रणी बँकेचे अधिकारी मंगेश केदार, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाचे विभागीय व्यवस्थापक संजय कोटुरकर, एमसीईडीचे विभागीय अधिकारी सुदाम थोटे आदी मान्यवर उपस्थित होते.

पापळकर म्हणाले, प्रशिक्षणातून दिशा मिळते. आपल्याला आवडत्या क्षेत्रातील व्यवसाय निवडता येतो आणि त्यासाठी आवश्यक प्रशिक्षण संस्था पुरवतात. बँकेकडून कर्ज मिळवण्यासाठी निवडलेल्या व्यवसायाची व्यवहार्यता, परतफेडीची हमी आणि आपली क्षमता महत्त्वाची असते. त्यासाठी आपल्या बँक व्यवहारात सातत्य ठेवणे आवश्यक आहे. यावेळी उद्योजकांशी निगडित शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. तसेच रॅम्प अंतर्गत एमसीईडी प्रशिक्षित उद्योजकांच्या उत्पादनांच्या स्टॉल प्रदर्शनीचे उद्घाटन विभागीय आयुक्त यांच्या हस्ते झाले. कार्यकारी संचालक विक्रांत बगाडे व जिल्हा अग्रणी बँकेचे अधिकारी मंगेश केदार यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक एमसीईडीचे विभागीय अधिकारी सुदाम थोटे यांनी केले. सूत्रसंचालन प्रकल्प अधिकारी भारती सोसे यांनी केले, तर आभार प्रदर्शन एमसीईडीचे प्रकल्प अधिकारी शंकर पवार यांनी मानले.

## १,३४९ हेक्टरच्या वर पिकांचे नुकसान दोन घरांचे नुकसान

# सोयगाव तालुक्यात तहसीलदारांनी घेतला नुकसानग्रस्त आढावा

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.१८ ऑगस्ट

तालुक्यात शनिवारी रात्रीच्या व सोमवारी सकाळी सुमारास झालेल्या अतिवृष्टी मुळे व मुसळधार पावसामुळे पिकांना मोठ्या प्रमाणात तडाखा बसला. सोयगाव घरांची पडझड झाली आणि झाडेही कोसळली. महसूल विभागाच्या प्राथमिक अहवालानुसार सुमारे १,३४९ हेक्टर पिकांचे नुकसान झाले असून, दोन घरांचे अंशतः नुकसान झाले आहे.

तालुक्यातील पळसखेडा येथील नदीकाठच्या शेतकऱ्यांना विशेष फटका बसला असून,पळसखेडा येथील नाल्याच्या पुरात प्रताप कवाल,इंदारचंद चोपडा,विजय शर्मा ,निवृत्तीथोरात,शेनफडू थोरात,रवी थोरात,यज्ञेश थोरात, शुभम थोरात,ऋषीकेश थोरात आदींसह तीस शेतकऱ्यांची नाल्याच्या पुरात पाण्याच्या प्रवाहात कपाशीव मका पिकांसह शेती खरडून वाहून गेली आहे नाल्याच्या पुरात मोठ्या प्रमाणात भरून वाहत गेल्यामुळे शेतीकाठच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

### पळसखेडा येथील शेतकऱ्यांना मोठा फटका

**तालुक्यातील पळसखेडा येथील नाल्याला सोमवारी आलेल्या पुराने व मुसळधार पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले.तालुक्यात सोयगाव सह बनोटी, सावळदबारा, फर्दापूर,जरंडी, घोसला, गोंदेगाव,तिडका,या परिसरातील सोयाबीन, तूर आणि कापूस पिके पूर्णपणे पाण्यात बुडून गेली. जवळजवळ १०० टक्के नुकसान झाले, असे स्थानिक शेतकरी ईश्वर सपकाळ यांनी सांगितले. या अचानक आलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट कोसळले असून, तातडीने शासनाकडून मदत मिळावी, अशी जोरदार मागणी भाजपचे तालुका सरचिटणीस सुरज राजपूत यांनी मंगळवारी केली.**

तहसीलदार मनीषा मेने,तालुका कृषी अधिकारी भारत कासार,आणि गटविकास अधिकारी दादाराव अहिरे यांनी तालुक्यातील नुकसानग्रस्त भागाचा मंगळवारी संयुक्त पणे आढावा घेतला आहे.

## इंडस्ट्रीयल एन.ए.च्या परवान्याकरीता जिल्हाधिकारी कार्यालयात हेतुतः आडवा-आडवी
### रामदेव ओझा यांची गंभीर तक्रार

परभणी,दि.१९(प्रतिनिधी) : इंडस्ट्रीयल एन.ए. च्या परवान्या करीता आपण गेल्या दोन-तीन महिन्यांपासून जिल्हाधिकारी कार्यालयात खेटे मारीत आहोत. परंतु, या कामास जिल्हाधिकार्यांकडून हेतुतः अडवणूक होत आहे, अशी गंभीर तक्रार रामदेव ओझा यांनी पालकमंत्री सौ. मेघना साकोरे बोर्डीकर यांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.



ओझा यांनी सादर केलेल्या या निवेदनात, २५ सप्टेंबर २०२४ रोजी इंडस्ट्रीयल एन.ए.चा प्रस्ताव आपण जिल्हाधिकार्यांकडे सादर केला होता, परंतु या कार्यालयाने मागील दोन-तीन महिन्यांपासून खेटे मारुनसुध्दा तो प्रस्ताव मंजूर केला नाही. त्यापूर्वी भूमीअभिलेख कार्यालयानेसुध्दा जाणिवपूर्वक, हेतुतः जी त्रुटी दोन दिवसात दुरुस्त होऊ शकली असती त्यात विनाकारण एक महिना घातला, त्यानंतर नगररचना कार्यालयानेसुध्दा आपले तीन महिने वाया घातले आणि आता जिल्हाधिकारी कार्यालय हेतुतः त्रास देत आहे, असे निदर्शनास आणून दिले. पालकमंत्री म्हणून आपल्या जनता दरबारात आपण त्या संदर्भातील समस्या मांडली होती. आपण जिल्हाधिकार्यांना त्या अनुषंगाने स्पष्ट सूचना, आदेशही दिले होते. परंतु, जिल्हाधिकार्यांनी आपल्या आदेशाचे पालन तर केलेच नाही. प्रस्तावाच्या मंजूरीबाबत ओळीनेसुध्दा खूलासा केला नाही, असे ओझा यांनी नमूद केले.

एखाद्या दलालाच्या मार्फत तो प्रस्ताव आपण दाखल केला असता किंवा जिल्हाधिकारी कार्यालय, नगर रचना कार्यालय, भूमी अभिलेख कार्यालय येथील अधिकारी किंवा कर्मचार्यांना लाच दिली असती तर दोन महिन्यात आपणास एन.ए. ऑर्डर मिळाली असती, परंतु सरळमार्गी आपण प्रस्ताव दाखल केल्यानेच इंडस्ट्रीयल एन.ए.चा परवाना मिळाला नाही, अशी खंत ओझा यांनी या निवेदनातून व्यक्त केली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या या कारभारास आपण अक्षरशः कंटाळलो आहोत, जर लाच देऊन काम करायचे असेल तर आपण लाच द्यावयासही तयार आहोत, कारण कामास न्याय मिळण्यास आता आपल्यासमोर कोणताही पर्याय उरला नाही, अशीही खंत ओझा यांनी या निवेदनातून व्यक्त केली.


## बोंदरगाव च्या अंगणवाडीत शिरले पाणी
### कागदपत्रासह पोषण आहाराचे झाले नुकसान

सोनपेठ (वार्ताहर) अतिवृष्टीमुळे अंगणवाडी केंद्रा लगत असलेल्या नदीस मोठा पूर आल्यामुळे. पुराचे पाणी तालुक्यातील बोंदरगांव येथील अंगणवाडी केंद्रात शिरल्यामुळे खोलीत २ ते३ फूट पाणी जमा झाले होते.त्यामुळे अंगणवाडी सी निगडी असे सर्व जुने व नवे नोंदी असलेले कागदपत्रे ईतर साहित्याचे भिजून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.



सोनपेठ तालुक्यातील बोंदरगाव येथील नदीला दि .१७ ऑगस्ट रोजी मध्यरात्री अतिवृष्टी मुळे पूर आला होता. या पुराचे पाणी जवळच असलेल्या अंगणवाडीच्या खोलीमध्ये शिरले मोठ्या प्रमाणात पाणी साचून राहिल्यामुळे खोलीतील मुलांसाठींचा पोषण आहार साठा, टी एच आर,खेळणी साहित्य, छोटे मोठे वजनाचे काटे, विद्यार्थी शिक्षक हजरीपट, वजन नोंदी, आहार नोंदी, वृद्धी चार्ट, आहार मिळाल्याच्या पावत्या, ग्रह भेटी रजिस्टर, गाव सर्वे रजिस्टर, इत्यादी महत्त्वाची सर्वच कागदपत्रे भिजून नष्ट झाले आहेत. आहार व इतर साहित्य भिजल्यामुळे निकृष्ट दर्जाचे झाले आहे. या घटनेची माहिती अंगणवाडीची सेविका सौ आशा सावंत यांनी एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प अधिकारी श्री मधुकर कदम यांना दिली.त्यांनी तात्काळ या गंभीर घटनेची दखल घेऊन दि. १९ ऑगस्ट रोजी सोनपेठ विभाग पर्यवेक्षिका एस. एस. मुंडे यांना पाठवून दिले. त्यांनी गावातील प्रतिष्ठित नागरिक, सरपंच,पोलीस पाटील, व ग्रामस्थ समक्ष बोंदरगाव अंगणवाडी केंद्राच्या पुरामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करून पंचनामा केला व सदर प्रकरणी अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर केला आहे. यावेळी अंगणवाडी पर्यवेक्षिका एस. एस. मुंडे,मदन सपकाळ,मदन सोनवणे, पांडुरंग पानखडे, राजेश सपकाळ, मुंजाभाऊ सपकाळ, काशिनाथ सपकाळ, श्रीकृष्ण चव्हाण, दिलीप चव्हाण, मनोहर सपकाळ, अनंत बनसोडे, हनुमान पानखडे, बालकिशन सपकाळ, देवानंद मोळे, सुभाष सावंत, अंगणवाडी सेविका अशा सावंत, मदतनीस महानंदा ताटे इत्यादी उपस्थित होते.

## कडगावं हुडा च्या लिंगी नदीवरील पुरात चार चाकी सह चौघे जण गेले वाहून; एकाचा मृत्यू



सोनपेठ प्रतिनिधी : सोनपेठ येथून जवळच असलेल्या कडगाव हुडा ( गव्हाणे )ता परळी या गावालगत असलेल्या लिंगी नदीला दि १७ ऑगस्ट रोजी रात्री झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठा पूर आला होता या रोडवरून डिग्रस तालुका परळी येथील४ युवक जात होते त्यांना पुराच्या पाण्याचा अंदाज आला नाही. चार चाकीसह चौघेजण वाहून गेले चार चाकी चे धार काढून युवक बाहेर पडले. एकाने आपल्या मोबाईल वरून मित्रांशी संपर्क साधला रात्रीच पोलीस प्रशासन व एन डी आर एफ च्या टीमने एका युवकास रात्रीच वाचवले. उर्वरित दोघांना आज सकाळी एका झाडावरून वाचवण्यात आले. चौघांपैकी एकाचा मृतदेह आज दुपारी घटनास्थळावरून ३ किलोमीटर खाले आढळून आला. पुरात वाहून गेलेल्यांपैकी. अमर मधुकर पोळ वय वर्ष २२, राहुल संपत्ती पोळ वय वर्ष ३२, राहणार डिग्रस तालुका परळी. राहुल सटवाजी नवले वय वर्ष २२ राहणार फुलारवाडी तालुका पाथरी तर या घटनेमध्ये मृत पावलेला विशाल बल्लाळ वय वर्ष२४ राहणार पुणे असे नावे आहेत.

## रक्तदान शिबिरात ३६९ कार्यकत्यांचे रक्तदान



पूर्णा, प्रतिनिधी : गंगाखेड विधानसभा मतदारसंघाचे आ. डॉ. रत्नाकर गुट्टे यांच्या वाढदिवसानिमित्त शहरातील जनसंपर्क कार्यालयात १२ ऑगस्ट मंगळवार रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. आमदार महोदययांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिरास मोठा प्रतिसाद मिळाला. शहर व ग्रामीण भागातील ३६९ कार्यकत्यांनी रक्तदान करून वाढदिवस साजरा करण्यात आला.

रक्तदान शिबिराचे आयोजन गुट्टे काका मित्रमंडळाच्या वतीने करण्यात आले होते. तालुका प्रभारी नितीन (बंटी) कदम, तालुकाध्यक्ष सुभाषराव देसाई, शहराध्यक्ष ड.राजेश भालेराव यांनी उत्तम असे नियोजन करून रक्त तुटवड्यात भरीव वाढ करण्याचा प्रयत्न केला.तसेच तालुक्यातील कावलगाव येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.त्याच प्रमाणे शहरातील कोळीवाडा येथील कार्यकर्ते किशोर सूर्यवंशी यांच्या वतीने आमदार महोदययांच्या उपस्थितीत परिसरातील गरजू महिलांना साड्या वाटपाचा कार्यक्रम करण्यात आला.तसेच मूकबधीर शाळेत जाऊन विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत वाढदिवस साजरा करून विद्यार्थ्यांना अल्पोउपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. तालुक्यातील माहेर येथे जिल्हा परिषदेतील विद्यार्थ्यांना वही व पेन चे वाटप करण्यात आले. तालुक्यात अशा पद्धतीने आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे यांच्या उपस्थितीत वाढदिवसानिमित्त वेगवेगळ्या ठिकाणी कार्यक्रम घेण्यात आले. यावेळी लक्ष्मीकांत कदम,उत्तम ढोणे, नंदकुमार डाखोरे, गिताराम देसाई, महादजी देसाई, हरिभाऊ कदम, साहेब भाकरे, विनायक पवार, सैनाजी माठे, मुकुंद भोळे, प्रभाकर डाखोरे, जगन्नाथ रेनगडे, विश्वनाथ होळकर, ड.गोविंद ठाकूर,अनिल खर्गखराटे, प्रविण अग्रवाल, हर्षवर्धन गायकवाड,विकास गव्हाळे, अनिल खर्गखराटे,नारायण मोरे, श्रीनिवास कदम,असलम पठाण, मधुकर गायकवाड,ईश्वर ठाकूर, जयसिंग चंदन यांच्यासह आ.डॉ.रत्नाकर गुट्टे काका मित्र मंडळाचे पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत वाढदिवस साजरा करण्यात आला.

## मराठा आरक्षणासाठी २९ रोजी मुंबईत आंदोलन; जिंतूर तालुक्यातील सकल मराठा समाजाची जोरदार तयारी

जिंतूर : प्रतिनिधी



मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली येत्या २९ ऑगस्ट रोजी मुंबई येथे भव्य आंदोलन होणार आहे. या आंदोलनात जिंतूर तालुक्यातील मराठा समाजाचा मोठ्या प्रमाणावर सहभाग होण्यासाठी तालुक्यात सकल मराठा समाजाच्या वतीने गावागावात जनजागृती मोहीम सुरू आहे.

आजपर्यंत तालुक्यातील सुमारे ७० गावांमध्ये सभा व भेटी घेऊन समाज बांधवांना आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या भेटींना ठिकठिकाणी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, युवक, शेतकरी, महिला यांच्यात मोठ्या प्रमाणात उत्साह दिसून येत आहे.

आंदोलनासाठी प्रत्येक गावातून मोठ्या प्रमाणावर नागरिक मुंबईकडे रवाना होणार असून, त्यासाठी वाहतूक,भोजन व इतर आवश्यक सोयीसुविधांचे नियोजन करण्यात आले आहे. सकल मराठा समाजाच्या पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली ही सर्व तयारी युद्धपातळीवर सुरू आहे.

मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्यासाठी होणारे हे आंदोलन निर्णायक ठरणार असल्याचा विश्वास स्थानिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे. मराठा समाजाचा इतिहास घडवणारा सहभाग २९ ऑगस्ट रोजी मुंबईत पाहायला मिळणार असून,यासाठी गावोगाव उत्साहाचे वातावरण आहे.

## गंगाखेडचे राजे संभाजी गोविंदा पथक प्रथम; पुर्णेतील शिवसेनेच्या दहीहंडी महोत्सवाची सांगता
### जय नृसिंह गंगाखेड द्वितीय,जय बजरंग लोहा तृतीय



पूर्णा ता.१९ - येथील शिवसेना शिंदे गटाच्या वतीने आयोजित भव्य दहीहंडी महोत्सवातील दहीहंडी गंगाखेडच्या राजे संभाजी गोविंदा पथकाने फोडून प्रथम क्रमांक पटकावला आहे. नागरिकांनच्या अलोट गर्दीत पार पडलेल्या या महोत्सवात सुमारे दीड लाख रुपयांची पारितोषिके गोविंदा पथकांनी पटकावली आहेत.

पूर्णा शहरातील जूना मोंढा मैदानावर रविवारी (ता.१८) रोजी शिवसेनेच्या वतीने जिल्हाप्रमुख विशाल कदम यांच्या नेतृत्वाखाली गणेश कदम,सचिन कदम, यांनी भव्य दहीहंडी महोत्सवाचे आयोजन केले होते.यावेळी माजी नगराध्यक्ष उत्तमराव कदम व माजी नगराध्यक्ष सत्यनारायण कुल्थे यांच्या प्रमुख उपस्थितीत पालकमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या हस्ते दहीहंडी फोडून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर ऑपरेशन सिंदूर मधे सहभागी सैनिक मुंजाजी सुंदरराव कदम, भाजपचे जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे, शिवसेना जिल्हाप्रमुख आनंद भरोसे, गणेशराव अंभोरे, एन. डी. देशमुख, क्षितिज चौधरी, पृथ्वीराज चौधरी शिवसेना जिल्हाप्रमुख तथा आयोजक विशाल कदम, गणेश कदम, सचिन उर्फ पप्पू कदम, एकनाथ लोखंडे, प्रकाश कराळे, नारायणराव पिसाळ,प्रशांत कापसे,शेख लतीफ ताज,रौफ कुरेशी,अमजद नुरी,ड.विशाल किरडे, सुनील इंगोले, गणेश कदम,प्रक्षित सवनेकर,लक्ष्मण कदम, भगवान सोळंके,माऊली कदम, अंकित कदम, गोविंद पळसकर,गोपाळराव कदम सावकार उपस्थित होते. यावेळी बोलताना मेघना बोर्डीकरांनी पुर्णा शहर वासीयांसह, गोविंदा पथकास शुभेच्छा दिल्या. सदरील दहीहंडी उत्सवात मराठवाड्यातील नामवंत दहीहंडी पथक सहभागी झाले होते. या स्पर्धेत प्रथम पारितोषीक ५५००० रुपये व सन्मान चिन्ह गंगाखेड येथील राजे संभाजी गोविंदा पथकाने पटकावले , व्दितीय पारितोषीक ३१००० रुपये व सन्मानचिन्ह गंगाखेड येथील जय नृसिंह गोविंदा पथक , तृतीय पारितोषीक २१००० रुपये व सन्मान चिन्ह लोहा येथील जय बजरंग गोविंदा पथक यांनी पटकावले. यावेळी पंच म्हणून, माणिक कदम, संभाजी शेवटे, बालाजी वाघ, कैलास टेहरे, योगेश जोशी, प्रकाश रौंदळे, सज्जन जयस्वाल, धरमसिंह बायस, सतीश बरकुंटे यांनी काम पाहिले. पारितोषिक वितरण समारंभास पोलिस निरीक्षक विलास गोबाडे, शिवराम भंगे, भगवान सोळंके, रवि गायकवाड, विजय यादव सहाय्यक पोलिस निरीक्षक सोमनाथ शिंदे, गजानन पाटील यांची उपस्थिती होती. मुंबई येथील प्रतिक्षा डान्स ग्रुपने कार्यक्रमाची रंगत वाढवली. सुत्रसंचालन जगदीश जोगदंड यांनी केले. दिनेश पवार यांनी आभार मानले.स्पर्धा यशस्वीतेसाठी दत्ता कदम,शरद कदम, कैलास मुळे,अक्षय कहाते,राम भालेराव, बंटी खाकरे,रवि गायकवाड,सह पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## राजे संभाजीच्या दहीहंडी फोड स्पर्धेत गंगाखेडचा राजेसंभाजी गोविंदा पथक प्रथम
### गंगाखेडचाच टायगर पथक द्वितीय तर नांदेडचा जय बजरंग गोविंदा पथक तृतीय

परभणी,दि.१८(प्रतिनिधी) : राजे संभाजी मित्र मंडळ आयोजित २३ वा दहीहंडी महोत्सव व २३वी माखनचोर दहीहंडी फोड स्पर्धेत गंगाखेड येथील राजे संभाजी गोविंदा पथकाने प्रथम क्रमांकाचे तर गंगाखेड येथील टायगर गोविंदा पथकाने द्वितीय व नांदेड येथील जय बजरंग गोविंदा पथकाने तृतीय क्रमांक पटकावला.

गंगाखेड येथील राजे संभाजी गोविंदा पथकाने एकूण सहा थर रचले, ते सुध्दा ४२.८ सेकंदात व ३० फूट उंचीचे, त्या पाठोपाठ गंगाखेड येथीलच टायगर गोविंदा पथकाने पाच थर रचले, ते ०.२८.५३ सेकंदात, २५ फुट उंचीचे तर नांदेड येथील जय बजरंग गोविंदा पथकाने पाच थर रचले ते ०.३०.०० सेकंदात, २५ फुट उंचीचे, अशी माहिती डॉ. माधव शेजूळ, रणजित काकडे, शिवाजी वाघमारे, एस.एन. शेवटे या पंच मंडळाच्या सदस्यांनी दिली.

जिंतूर रस्त्यावरील महात्मा फुले विद्यालयाच्या मैदानावर सोमवारी (दि.१८) रात्री उशीरापर्यंत 'गोविंदा आला रे आला' या गाण्याच्या तालावर, ठेक्यावर गोविंदा पथकांसह हजारो नागरीकांनी रिमझिम अशा पावसात,



अभूतपूर्व जल्लोषात बेफाम नृत्य करीत दहीहंडी महोत्सव व दहीहंडी फोड स्पर्धेचा आनंद लूटला.

राजे संभाजी मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा विद्यमान खासदार संजय उर्फ बंडू जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या २३ वर्षांपासून हा भव्य दिव्य महोत्सव होतो आहे. यावर्षी या महोत्सवाचे महोत्सवास प्रसिद्ध सिने अभिनेत्री अमृता खानविलकर यांनी संचासह हजेरी लावली. महात्मा फुले विद्यालयाच्या मैदानावर अभिनेत्री खानविलकर यांचे सोमवारी रात्री रिमझिम अशा पावसात आगमन झाले तेव्हा हजारो परभणीकरांनी त्यांचे उत्स्फूर्तपणे स्वागत केले, कसे आहात परभणीकर या आवाजात खानवीलकर यांनी साद घातली तेव्हा परभणीकरांनी एकच जल्लोष केला. यावेळी खानवीलकर यांचे खासदार संजय जाधव यांनी स्वागत केले. यावेळी खानवीलकर व संचाने एका सरस एक उडत्या चालीच्या गाण्यावर सुंदर असे नृत्य सादर करीत गोविंदा पथकातील सदस्यांसह परभणीकरांना मंत्रमुग्ध केले.

या स्पर्धेस परभणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती पंढरीनाथ घुले पाटील, संचालक सोपानराव मोरे, रावसाहेब रेंगे, तसेच रमेश दळवी, माजी नगरसेवक अतूल सरोदे, सचिन मोटे, संतोष कांबळे, शितल साकला, रामप्रसाद रणेर, दिलीप पवार, सचिन जोगदंड, प्रल्हादराव लाड, सचिन राष्ट्रकूट, देविदास राव खटिंग, पवन आगलावे, कुणाल गायकवाड, गजानन लव्हाळे, प्रदीप भालेराव, संतोष सामाले आदी पदाधिकारी, कार्यकर्ते व मान्यवरांसह राजे संभाजी मित्र मंडळाचे सर्व सदस्य व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ई-पिक पाहणी प ठप्प - शेतकऱ्यांची अडचण वाढली, प्रशासनाला भारतीय किसान संघाचे निवेदन, आंदोलनाचा इशारा

परभणी (प्रतिनिधी) : महसूल विभागाकडून पारदर्शक आणि वेगवान सेवा देण्याचा दावा असलेला ई-पिक पाहणी प प्रत्यक्षात निकामी ठरत असून शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. इंटरनेटची निकृष्ट कनेक्टिव्हिटी आणि पची मंद गती यामुळे शेतकऱ्यांना पिकपेरा नोंदवणे अशक्य होत आहे. यामुळे अनेक शेतकरी पिकपेरा सातबाऱ्यावर नोंदवण्यापासून वंचित राहतील आणि शासकीय योजनांच्या लाभांपासून दूर राहण्याची शक्यता आहे.

या समस्येवर तातडीने उपाययोजना करून पमध्ये सुलभता आणावी, अन्यथा प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा भारतीय किसान संघाच्या वतीने दिनांक १८ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे देण्यात आला.

निवेदनावर भारतीय किसान संघाचे जिल्हा मंत्री ॲड. अमोल देशमुख, जिल्हाध्यक्ष नामदेव बुडाले, प्रसिद्धीप्रमुख ज्ञानोबा कदम, सुवर्णमाला परिहार, बळवंत कौसडीकर, सुंदरराव शिंदे, माधवराव चव्हाण, सचिन आवचार, व्यंकटेश गुंगे, अनंतराव कच्छवे, प्रकाशराव देशपांडे, राहुल देशमुख, सुशील रसाळ, ॲड. ऋषी नाईक, व्यंकटेश कदम, दिनकर चिलगर, दिगंबर सूर्यवंशी, रमेशराव निलवर्ण, गजानन सोळंके, प्रशांत जाधव यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांच्या सह्या आहेत.

भारतीय किसान संघाने महसूल प्रशासनाला तातडीने त्रुटी दुरुस्त करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याची मागणी केली असून, अन्यथा मोठ्या प्रमाणावर आंदोलन उभारण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## तांत्रिक मनुष्यबळाअभावीच ग्रामिण विकासाचे कुपोषण : ३० ते ३५ टक्के निधी दरवर्षी अखर्चीत, जि. प. अभियंता संघटनेचे अध्यक्ष सुहास धारासूरकर यांची खंत

परभणी,दि.१९(प्रतिनिधी) : राज्यातील जिल्हा परिषदेंतर्गत मंजुर पदापैकी अभियंत्यांची सुमारे १८०० पदे रिक्त आहेत. त्यामुळेच ग्रामीण विकासाच्या कामांना मोठ्या प्रमाणावर खीळ बसली आहे. विशेषतः जिल्हा परिषदांचा विविध विकास कामांवरील ३० ते ३५ टक्के निधी तांत्रिक मनुष्यबळाअभावी अखर्चीत राहतो आहे, अशी खंत जिल्हा परिषद अभियंता संघटनेचे अध्यक्ष सुहास धारासूरकर यांनी व्यक्त केली.

जिल्हा परिषद अभियंता संघटनेच्या नागपुरात आयोजित केलेल्या राज्यस्तरीय त्रैवार्षिक अधिवेशनात ते बोलत होते. या अधिवेशनास राज्यभरातून १२०० च्या वर अभियंते उपस्थित होते. याप्रसंगी राज्याध्यक्ष धारासूरकर यांनी राज्यातील जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील बांधकाम, पाणी पुरवठा, सिंचन, विद्युत, यांत्रिकी विभागामार्फत ग्रामीण जनतेच्या हीताशी निगडीत ४८ योजना राबविल्या जातात. विशेषतः शाळांचे बांधकाम, रस्ते, समाज मंदिरे, रुग्णालये, पशुचिकित्सा दवाखाने, विद्युत जोडणी, कालवे, स्मशानभूमी, जलसंधारण अशा पायाभूत सुविधांची बांधकामे मोठ्या प्रमाणावर केली जातात. मात्र, या कामांकरीता मोठ्या प्रमाणावर तांत्रिक मनुष्यबळ गरजेचे असतांना सद्यस्थितीत जिल्हा परिषदेंतर्गत मंजूर पदांपैकी सुमारे १८०० अभियंत्यांची पदे रिक्त आहेत. २२०० अभियंत्यांच्या मार्फतच या विविध विभागातील योजनांची कामे राबविली जात आहेत. त्याचा परिणाम ग्रामीण विकासाच्या कामांना मोठ्या प्रमाणावर खीळ बसत असून राज्यातील जिल्हा परिषदांना प्रत्येकी सरासरी ५०० ते ६०० कोटी रुपयांचा निधी मिळत असतांना यातील ३० ते ३५ टक्के निधी अखर्चीत राहतो आहे, अशी खंत धारासूरकर यांनी व्यक्त केली.

जिल्हा परिषद स्तरावर एक उपभियंता, पाच कनिष्ठ अभियंता, प्रादेशिक स्तरावर कार्यकारी अभियंत्यांची नितांत गरज आहे. प्रत्यक्षात हे मनुष्यबळ नसल्यामुळेच अनेक प्रश्न उभे राहीले आहेत, असे धारासूरकर यांनी नमूद केले.

अभियंता संघटनेच्या अध्यक्षपदी सचिन चव्हाण...

संघटनेच्या नागपूर येथील या त्रैवार्षिक अधिवेशनात चंद्रपुर जिल्हा परिषदेचे अभियंते सचिन चव्हाण यांची नव्या कार्यकारणीच्या राज्याध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली. राज्याचे महासचिव म्हणून कोल्हापुरचे प्रदीप हुपरे तर कार्याध्यक्ष म्हणून पुणे येथील हेमा कुलकर्णी तर संघटनेचे मुख्य सल्लागार म्हणून मावळते अध्यक्ष धारासूरकर यांची निवड जाहीर करण्यात आली.

## सोनपेठ तालुक्यातील लासीना व परिसरातील मुलींनच्या शिक्षणा साठी मानव विकास योजने अंतर्गत बस सुरु

सोनपेठ प्रतिनिधी: सोनपेठ तालुक्यातील गोदाकाठ परिसरात मुलींना शालेय शिक्षणा साठी दररोज सोनपेठ येथे शाळेत यावे लागत आहे . बऱ्याच दिवसाच्या पाठपुरानंतर आज दि १८ ऑगस्ट रोजी मानव विकास योजनेअंतर्गत बस सुरू झाली आहे.यावेळी बस चालक व वाहक यांचे शाल श्रीफळ व पुष्पहार घालून स्वागत केले आहे.

सोनपेठ तालुक्यातील मौजे लासीना येथील लालबहादूर शास्त्री विद्यालय येथे गोदाकाठावरील लोहीग्राम, गंगापिंपरी, थडीउक्कडगाव, वाडीपिंपळगाव, थंडीपिंपळगाव, गोळेगाव ,वाघलगाव या भागातील शालेय विद्यार्थी व विद्यार्थीनी इयत्ता पाचवी ते दहावी वर्गात शिक्षण घेत आहेत.मानव विकास योजनेअंतर्गत या मार्गावर बस सुरू नव्हती. सावित्रीच्या लेकींना शिक्षण घेण्यासाठी अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते.गोदाकाठचा रस्ता पुर्ण झाला पण या मार्गावर बस सुरू नव्हती.अखेर आमदार राजेश विटेकर यांच्या प्रयत्नातून गोदाकाठ रस्त्यावर विजेच्या खांबावरुन लोंबकळणाऱ्या तारा काढल्या आहेत. त्यामुळे गोदाकाठ मार्गावर नव्याने मानव विकास योजनेअंतर्गत बस सुरू झाली आहे.यामुळे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.यावेळी स्थानिक मंडळाचे अध्यक्ष पंडीतराव कदम यांच्या हस्ते बस चालक बाळासाहेब रेवले व वाहक एस.जी.शेखदार सत्कार करण्यात आला आहे.बसला पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले आहे. यावेळी जि प प्रा शा मुख्याध्यापक विनोद दाढेल, भगवान पैठणे,मुंजाजी डुकरे, सुग्रीव दाढेल,गणेश भंडे, प्रमोद मोरे, सुभाष मकने, दत्ता परतवाड,बळीराम कदम, रामचंद्र काकडे, यांच्या शालेय विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## जिंतूर येथे बंजारा परंपरेतील तीज सण उत्साहात साजरा; सिंधू संस्कृतीची जोपासली परंपरा

जिंतूर / प्रतिनिधी

जिंतूर : भारतीय संस्कृतीत प्रत्येक जाती धर्मातील विविध उत्सव वेगळ्या ढंगाने व परंपरेने साजरे केले जातात. त्यामुळेच आपल्या देशातील विविधतेत एकता दिसून येते. इसवी सन पूर्वपासून बंजारा समाजात चालत आलेला सर्वात महत्वाचा तीज उत्सव जिंतूर मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



तीज हा आमच्यासाठी फक्त सण नाही, तर नातेसंबंध घट्ट करण्याची संधी आहे. वर्षातून एकदा सर्व महिला एकत्र येऊन आनंद साजरा करतो, ही आमची परंपरा आहे.
सौ.वच्छलाबाई नामदेव चव्हाण

पारंपरिक गाणी, खेळ आणि सजावट यामुळे बालपणीचे दिवस आठवले. हा सण आमच्या संस्कृतीचा आत्मा आहे.
सौ. वनिता रमेश चव्हाण, जिंतूर

आधुनिक काळातही आमची संस्कृती जिवंत ठेवण्यासाठी अशा उत्सवांना खूप महत्व आहे. पुढील पिढीपर्यंत ही परंपरा पोहोचावा हा आमचा प्रयत्न आहे.
सौ.उज्वलाताई विश्वनाथ राठोड मा.जि.प. अध्यक्ष परभणी

महिला प्रधान संस्कृतीचे दर्शन घडवणारा हा उत्सव मातृ शक्तीला वंदन करणारा असून, आद्यगण गण गौर यांचे महत्व विशद करणारा आहे. दर सालाबाद प्रमाणे यंदाही उत्सव जिंतूर येथे बंजारा समाजाच्या वतीने आयोजित करण्यात आला. यावेळी मोठया प्रमाणात जिंतूर तालुक्यातील बंजारा बांधव आणि भगिनी या उत्सवाला उपस्थित होत्या.

राखी पौर्णिमेपासून पुढील १० दिवस प्रत्येकाच्या घरात हा सण साजरा केला जातो. अविवाहित मुली छोट्या टोपात गहूची पेरणी करतात. त्याला रोज पाणी घालतात. बोली भाषेत कृष्णाची गीते म्हणतात आणि त्याची पूजा करतात. त्यानंतर त्याला नैवेद्य दिले जाते. दहा दिवसांनंतर या गहूचे नदीत विसर्जन केले जाते. विसर्जन करताना गावातील प्रत्येक मंडळी यात सहभागी होतात. महिला आणि मुली मोठ्या उत्साहात नाचतात तसेच लोकगीत बोलतात. तिज महोत्सव मध्ये आज दि.१७ ऑगस्ट रविवार रोजी बंजारा समाजाचे वतीने भव्य मिरवणूक काढून या उत्साहाची सांगता करण्यात आली. मिरवणुकीत मुख्य आकर्षण म्हणजे 'वेगळं लागे मजेदार' फेम नाईका, दर्शना राठोड, अतुल चव्हाण, वीरा राठोड यांची विशेष उपस्थिती होती. मागील दहा दिवस हा कार्यक्रम जिंतूर - जालना महामार्गावरील मैदानात पार पडला. या तिज उत्साहाच्या यशस्वीतेसाठी बंजारा कर्मचारी संघटना, देविदास राठोड, के. टी. चव्हाण, सुधाकर जाधव, अँड. विनोद राठोड, रोहित उर्फ मुन्ना चव्हाण, सचिन राठोड, स्वप्निल राठोड, रमेश चव्हाण, उमेश आडे, स्वप्निल राठोड, केशव चव्हाण, आशिष राठोड, नरेश चव्हाण, योगेश राठोड, प्रशांत राठोड, विजय जाधव, सुजित राठोड, अभिजीत राठोड, पंकज चव्हाण, नितीन आडे, रोहन चव्हाण, रोहन जाधव, अतुल आडे, रोहन जाधव, नितीन जाधव, उमेश चव्हाण, महेश चव्हाण, जगदीश राठोड, किशन राठोड, किरण राठोड यांच्यासह अदी युवकांनी प्रयत्न केले.

# सोयगावात एका घराची भिंत कोसळली



सोयगाव,दि.१९ ऑगस्ट –सोयगाव शहरात सुरु झालेल्या रिपरिप संततधार पावसाने सोयगाव शहरात भागवत महादू थोटे यांच्या घराची भिंत भिज पावसाने कोसळल्याची घटना सोमवारी सायंकाळी सहा वाजता घडली. दरम्यान सोयगाव सह परिसरात सोमवारी पाच तास रिपरिप पावसाची संततधार सुरु होती.

# पर्युषण पर्वात भाविकांनी उपस्थित राहावेः प्रवीणाजी म. सा.

छत्रपती संभाजीनगर: येथील वर्धमान रेसीडेंसी परिवारात चातुर्मास २०२५ निमित्त पर्युषण पर्वाचे आयोजन करण्यात आले आहे. पर्युषण पर्व हे आत्मशुद्धी, संयम आणि आध्यात्मिकतेसाठी एक महत्त्वाचे पर्व मानले जाते. या पर्वात प. पू.साध्वी श्री प्रवीणाजी म . सा. आदी ठाणा ६ साधू–साध्वींच्या उपस्थितीत विविध धार्मिक कार्यक्रम आणि स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने वर्धमान रेसीडेंसीमध्ये धार्मिक वातावरणाने चैतन्य निर्माण झाले आहे.

२० ते २७ ऑगस्टपर्यंत चालणाऱ्या या पर्वात दररोज सकाळी ६.३५ पासून रात्री ८.०० पर्यंत विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित केले आहेत. यात प्रार्थना, अंतगड सूत्र पठण, प्रवचन, कल्पसूत्र वाचन आणि प्रतिक्रमण यांचा समावेश आहे. या व्यतिरिक्त, दररोज दुपारी ३.०० ते ४.०० या वेळेत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये अंताक्षरी, तीर्थयात्रा, वंदना क्शन स्पर्धा, प्रश्नमंच आणि ज्ञानवर्धक स्पर्धांचा समावेश आहे. प्रत्येक दिवसाच्या प्रवचनासाठी खास विषय निवडले आहेत. २० ऑगस्ट रोजी 'स्वागत है पर्वाधिराज' या विषयावर प्रवचन होणार असून, २७ ऑगस्ट रोजी 'आइए धोए मन का मैल' या विषयावर प्रवचन आणि संवत्सरी महापर्वासह कार्यक्रमाचा समारोप होईल. यादरम्यान मोठ्या प्रमाणात तपोत्सव सुरू आहे, अशी माहिती समितीचे कोषाध्यक्ष किशोर ललवाणी यांनी दिली. पर्युषण पर्वाच्या यशस्वितेसाठी मनोज चोपड़ा, सुरेश ओस्तवाल, आनंद कोठारी, आशीष कोठारी,स्वप्निल पारख, सतीश ललवाणी , आनंद मुथा, प्रफुल बोथरा परिश्रम घेत आहेत. वर्धमान रेसीडेंसी परिवाराने धर्मप्रेमी जनतेला या शुभ पुण्य प्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. या कार्यक्रमांच्या माध्यमातून भाविकांना आत्मिक शांती आणि धार्मिक लाभ घेण्याची संधी मिळत आहे.

## भैरवनाथ पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत कृषी भूषण,कवी,साहित्यिक कलावंताचा विशेष सत्कार



सोयगाव,दि.१९ ऑगस्ट – येथील भैरवनाथ ग्रामीण बिगर शेती सह.पतसंस्था सोयगावचे चेअरमन प्रभाकर आबा काळे व संचालक मंडळ यांच्या हस्ते भैरवनाथ ग्रामीण बिगर शेती सह.पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत कृषी साहित्य व आरोग्य या क्षेत्रात प्रभावी काम करणाऱ्या व्यक्तींचा विशेष सत्कार करण्यात आला.भैरवनाथ पतसंस्थेचे चेअरमन प्रभाकर (आबा)काळे हे व्यक्ती विशेष राजकीय क्षेत्रात प्रतिष्ठित व्यक्तिमत्व आहेत.ते सहकार क्षेत्राला ज्या दूरदृष्टीने पाहतात.तसेच साहित्यिक कलावंतांना ही ते विशेष सहकार्य करीत असतात.यंदाही त्यांनी सन.२०२५ भैरवनाथ ग्रामीण बिगर शेती सह पतसंस्था सोयगावच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत,साहित्य क्षेत्रातील गलवाडा येथील युवा कवी.गोपाल इंगळे गलवाडेकर,कृषी क्षेत्रातील प्रगतशील शेतकरी कृषी भूषण अरुण सोहनी,जेष्ठ नाट्य कलावंत तथा समाज प्रबोधनकार विष्णू मापारी,आरोग्य क्षेत्रातील युवा समाजसेवक दिगंबर वाघ,कवी माणिक सोनवणे ह्या प्रसिद्ध व्यक्तिनी त्यांच्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्या बद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी भैरवनाथ पतसंस्थेचे चेअरमन प्रभाकर काळे,सर्व संचालक मंडळ व सभासद,भैरवनाथ पतसंस्थेचे मॅनेजर धनराज (गोविंदा)औरंगे,विजय जावळे,गोकुळ रोकडे,योगेश काळे,सह ग्रामस्थ उपस्थित होते.

## किलबिल प्राथमिक शाळेत स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



बिडकीन दि १९ ऑगस्ट–पैठण तालुक्यातील बिडकीन येथील स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी किलबिल प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक यांच्या हस्ते महात्मा गांधी व डॉ बाबासाहेब आंबेडकर तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून ध्वजारोहण करण्यात आले . यानंतर कवायत संचालन घेण्यात आले तसेच सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले देशभक्तीपर गीत नृत्य असे विविध कार्यक्रम घेण्यात आले तसेच तंबाखू मुक्ती भारत सामूहिक शपथ घेण्यात आली. कार्यक्रमाचा समारोप पसायदानाने करण्यात आला . अध्यक्ष भाषण शाळेचे मुख्याध्यापक सुजित देशमुख यांनी केले तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंढरी गाडेकर यांनी केले तर आभार प्रदर्शन गणेश इंदापूरे यांनी केले.यावेळी गावांतील मान्यवर पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

## दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेज बिडकीन येथे दहीहंडी उत्सवात साजरी



बिडकीन दि १९ ऑगस्ट –पैठण तालुक्यातील बिडकीन येथील दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल बिडकीन येथे दि १६ रोजी दहीहंडी उत्साहात साजरी करण्यात आली. यश जैस्वाल , सुरज सरसे व पालकवृंद यांच्या हस्ते सर्वप्रथम श्रीकृष्ण प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले. तसेच छोट्या कृष्णाच्या हस्ते दहीहंडी फोडण्यात आली. सर्व विद्यार्थी राधा कृष्णाच्या पोशाखामध्ये आलेले होते. कृष्णाच्या गाण्यावर सर्व बालगोपालांनी नृत्य करून आनंद व्यक्त केला. यावेळी शाळेतील शिक्षक वृंद दर्शना कोकणे, सुनिता चव्हाण, दिक्षा साबळे, शितल मोरे, वैष्णवी टक्केकर, सीमा वंजारे व शाळेतील विद्यार्थी सर्वांची उपस्थिती होती.

# रिपरिप पावसाची पाच तास संततधार; बनोटीच्या धरणात ६० टक्के पाण्याची आवक

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१९ ऑगस्ट

सोयगाव सह तालुक्यात सोमवारी सकाळी नऊ वाजेपासून रिपरिप पावसाची संततधार दुपारी दोन वाजेपर्यंत सुरूच होती.त्यामुळे सोमवारी जनजीवन विस्कळीत झाले होते. दरम्यान शनिवारी रात्री झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी व पंचनामे करण्याच्या सूचना कृषी आणि महसूल विभागाला देण्यात आल्या असल्याचे तहसीलदार मनीषा मेने जोगदंड यांनी सांगितले आहे. दरम्यान सोमवारी झालेल्या पाच तास रिपरिप पावसाने सोयगाव सह परिसरात कपाशी,मका,सोयाबीन,उडीद,तूर आदी पिकें पुन्हा पाण्यात बुडालेली आहे.त्यामुळे कपाशी, मका या पिकांना संततधार पावसाचा तडाखा बसला आहे. सततच्या पावसाने जरंडीच्या खडकी नदीला सोमवारी पूर आला होता तर सोयगावची सोना नदी सलग दुसऱ्या दिवशीही दुथडी भरून वाहत होती.



सोयगाव शिवारात अतिवृष्टी पाठोपाठ सोमवारी झालेल्या संततधार रिपरिप पावसाचा फटका बसला असून सोयगाव,सोनासवाडी,आदी भागात पिके मोठ्या प्रमाणावर पाण्याखाली बुडाली असल्याने सोयगावात पिकांना जलसमाधी मिळाली आहे.त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.ऐन फुलोऱ्यात आलेली पिकं पाण्यात बुडाली आहे.कृषी व महसूलच्या पथकांनी सोयगाव,जरंडी मंडळात सोमवारपासून नुकसानीची पाहणी हाती घेतली आहे.

**बनोटीच्या धरणात पाण्याची आवक वाढली––**

तालुक्यातील बनोटी धरणात पाण्याची आवक वाढली असून बनोटी धरण साठ टक्क्यांनी भरले आहे उर्वरित धरणातही पाण्याची आवक सुरू झाली आहे

**सोयगाववासीयांना सतर्कतेचा इशारा**

सोयगावचे वेताळवाडी धरण ओव्हर फ्लो होऊन धरणाच्या सांडव्यातून पाण्याचा विसर्ग सुरु आहे.त्यामुळे सोना नदीचे पात्र दुथडी भरून आहे. त्यामुळे शहरवासीयांना व नदी काठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा नगरपंचायत सोयगाव व तहसीलदार मनीषा मेने यांनी दिला आहे.

सोयगाव तालुक्यात झालेल्या सततच्या पावसाने कपाशी वर मर चा प्रादुर्भाव होत असल्याचे माहिती प्राप्त आहे शेतकऱ्यांनी घाबरून न जाता बुरशीनाशकांची झाडा भोवती आळवणी करावी असे तालुका कृषी अधिकारी सोयगाव भारत कासार यांनी म्हटले आहे.

> सोयगाव सह तालुक्यात अतिवृष्टी झालेल्या ठिकाणी पिकांच्या नुकसानीची पाहणी करण्याचे निर्देश संबंधित कृषी सहायक,ग्राम महसूल अधिकारी यांना काढण्यात आले आहे. नुकसानी संदर्भात अद्याप स्थानिक शेतकऱ्यांकडून माहिती प्राप्त नाही त्यामुळे नुकसान कमी प्रमाणात झाले आहे असे वाटते
> – मनीषा मेने जोगदंड तहसीलदार,सोयगाव

कधी पावसाच्या खंडा मुळे तर कधी आती पावसामुळे या आसमानी संकटामूळे शेतकरांची संघर्ष करण्याची ताकत संपली आहे.शेतकरी संकटात सापडला आहे.आन्नदात्यावरचे आलेल्या संकटावर सरकारने त्वरीत पंचनामे करून मदत द्यावी अशी मागणी कृषी भूषण शेतकरी,सोयगाव अरूण सोहणी यांनी केली आहे.

# ग्रामीण तरुणांसाठी बजाज कंपनीची सुवर्णसंधी

## ज्ञानदा संस्थेच्या पुढाकारातून अप्रेंटिसशिप कॅम्प, १६,५०० मानधनासह बस व कँटीन सुविधा

तभा वृत्तसेवा

कन्नड – दि.१९ ऑगस्ट – कन्नड तालुक्यातील तरुणांना रोजगाराच्या नव्या दालने खुली करून देण्याचे कार्य ज्ञानदा कौशल्य विकास संस्था (आयटीआय कॉलेज, कन्नड) सातत्याने करत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना थेट औद्योगिक क्षेत्रात प्रवेश मिळावा यासाठी संस्थेच्या पुढाकारातून बजाज कंपनीमार्फत अप्रेंटिसशिप कॅम्प नुकताच आयोजित करण्यात आला.

या कॅम्पमध्ये इलेक्ट्रिशियन ट्रेडच्या विद्यार्थ्यांची थेट निवड झाली असून त्यांना दरमहा १५ हजार रुपये मानधनासोबत बीटीआरआय कडून १५०० रुपये मिळून एकूण १६ हजार ५०० रुपयांचा पगार मिळणार आहे. ग्रामीण पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांसाठी ही आर्थिक मदत मोठा आधार ठरणार आहे.



> कन्नडसारख्या ग्रामीण भागातील तरुणांमध्ये प्रचंड क्षमता आहे. पण संधींचा अभाव असल्याने ते मागे पडतात. ज्ञानदा संस्थेचा हेतू म्हणजे ही दारे उघडी करणे. शिक्षणाबरोबर रोजगार मिळवून देणे हेच आमचं ध्येय आहे. बजाज कंपनीमार्फत मिळालेली अप्रेंटिसशिप ही फक्त सुरुवात आहे; पुढेही अशा अनेक औद्योगिक संधी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणार आहोत. कन्नड तालुक्यातूनही उद्योगक्षेत्रात नवी क्रांती घडू शकते, याचा आम्हाला विश्वास आहे.
> विलास इंगळे, अध्यक्ष ज्ञानदा संस्था कन्नड

विद्यार्थ्यांना गल्लेबोरगावपर्यंत बस सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे केवळ १०० रुपयांत कँटीनची सुविधा उपलब्ध असल्याने ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम रोजगारासोबत सोयीसुविधांचा पॅकेज ठरणार आहे.

या भरती कार्यक्रमाला बजाज कंपनीचे एचआर प्रमुख विनायक मुळे, एचआर असिस्टंट अर्जुन, संस्थेचे अध्यक्ष विलास इंगळे, प्राचार्य अमृता इंगळे यांच्यासह प्रशिक्षक व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. अप्रेंटिसशिपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष औद्योगिक अनुभव मिळणार असून करिअर घडविण्याची ही एक महत्त्वाची संधी ठरणार आहे.

# सुभाष गवई क्रीडाशिक्षक यांना राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १९ ऑगस्ट : पैठण तालुक्यातील श्री मोहटादेवी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय म्हारोळा चे क्रीडा शिक्षक सुभाष विश्वनाथ गवई यानां रविवार दि १७ ऑगष्ट रोजी नाशिक येथिल कालिका माता मंदिराच्या सभाग्रहात कार्यक्रम संपन्न झालेल्या समारंभात पुरस्कार वितरण सोहळ्यात दुधारे क्रीडा फाऊंडेशन च्या वतीने राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. हा पुरस्कार शिक्षण, कला व क्रीडा, समाजसेवा क्षेत्रात भरीव कामगिरी केल्याबद्दल पुरस्कार देण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप शाल, श्रीफळ, मानपत्र, कोट असे होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंदिरस समितीचे अध्यक्ष अण्णासाहेब पाटील, लखुजी जाधव यांचे तेरावे वंशज शिवाजीराजे जाधव याच्रे शुभ हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी समिती अध्यक्ष अशोकजी दुधारे समिती उपाध्यक्ष आनद्रजी खरे, समिती सरचिटणीस विजया दुधारे ,खजिनदार दीपक निकम, तसेच इतर सदस्य उपस्थित होते. गेल्या विस वर्षापासुन विद्यालयातील खेळाडु जिल्हा, राज्य, आंतरराष्ट्रीय स्तरावर दरवर्षी पाठवीत असतात. सदर पुरस्काराने परिसर राज्य विविध स्तरातून कौतुक केल्या जात आहे. सदर पुरस्कारासाठी बेस्ट शिक्षण संस्था संचलित श्री मोहटादेवी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व संस्थापकीय अध्यक्ष डॉक्टर धनंजय अशोक मुखेकर, संस्थापकीय सचिव वंदना मुखेकर, प्राचार्य मनोज पाटील यांचा मोलाचा वाटा आहे. पुरस्काराचे परीसर, राज्यातुन कौतुक होत आहे.



# शनि अमावस्या निमीत्त पैठण येथे महामस्तक अभिषेक महोत्सावाचे भव्य आयोजन

छत्रपती संभाजीनगर – श्री.शनिग्रह अरिष्ठ निवारक मुनिसुव्रतनाथ भगवान अतिशय क्षेत्र पैठण येथे मुलनायक भारतातील जैन धर्मियांचे शनि अरिष्ठ निवारक श्रध्दा स्थान मुनिसुव्रतनाथ भगवान येथे शनि अमावस्या निमीत्त महामस्तक अभिषेक महोत्सव दिनांक २३/०८/२०२५ शनिवार रोजी आयोजन करण्यात आले आहे. शनि अमावस्यासाठी संपुर्ण कार्यकम हा अंतर्मना आचार्य प्रसन्नसागरजी महाराज यांच्या आर्शिवादाने संपन्न होत आहे. सकाळी ८.०० वाजता भगवान मुनिसुव्रतनाथ विधान यानंतर धर्मध्वजारोहन संपन्न होणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणुन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर साहेब, गुरैभक्त विनय जैन मुंबई, सी.ए.जयेश काला मुंबई, भारतवर्षीय तिर्थ क्षेत्र कमिटीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष संजय पन्नालाल पापडीवाल, तिर्थ भक्त राजेश मांगीलाल पहाडे हैद्राबाद मुंबई, पवन गोधा दिल्ली, अशोक जैन दिल्ली, मनोज चौधरी हैद्राबाद, डॉ.सौ.अरैणा रविंद्र काला नांदेड राहणार आहे. या प्रसंगी उपस्थित राहणा–या हजारो भाविकांना सौ.मिनादेवी बबनलाल सौ.स्विटी लाकेशकुमार, चि.आगम, सर्वार्थ गोधा परिवार डोणगांववाले पैठण, सौ. रिंकु अमितकुमार श्रेयांस ईशान बडजात्या, सौ. पायल अजय विधान जैन पुणे एवंम समस्त गोधा परिवार डोणगाववाले पैठण छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी मंच संचालन बोली सम्राट प्रविण लोहाडे हे करणार आहे. तरी धर्मप्रेमींनी तिर्थभक्तांनी अभिषेकाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन अध्यक्ष महावीर बडजाते,महामंत्री विलास पहाडे,कोषाध्यक्ष विजय पापडीवाल,विश्वस्थ जयकुमार बाकलीवाल,प्रमोद कासलीवाल,मनोज काला,प्रकाश कासलीवाल, कैलास पाटणी, किशोर भाकरे, सुमीत गंगवाल, डॉ.संजय गंगवाल,डॉ.राजेंद्र काला, स्वदेश पांडे, अभिजीत काला, यांच्यासह विश्वस्थ मंडळाने दिली. या महोत्सवासाठी छत्रपती संभाजीनगर, हैद्राबाद, मुंबई, पुणे, नाशिक, जयपुर, राजस्थान, दिल्ली आदी ठिकाणाहुन हजारो भक्त उपस्थित राहणार आहे.



# बजरंग दल कार्यकर्त्यांनी सहा गोमातेला दिले जीवदान



बिडकीन दि १९ ऑगस्ट अहिल्यानगर जिल्ह्यातील घोडेगाव येथून पैठण कडे कत्तल खाणात घेऊन जाणारे वाहन क्र .एम एच १७ टी ७३२४ गाडी मध्ये सहा गोमाता घेऊन जात असताना आज दि १९ मंगळवार रोजी पैठण तालुक्यातील बिडकीन येथील साई मंदिर जवळ बजरंग दल कार्यकर्त्यांनी गाडी अडवून कत्तल साठी जाणाऱ्या सहा गोमातांना जीवदान दिले आहे, या गोमाता ह भ प दुर्गा ताई यांच्या गौतमा आश्रम मध्ये सोडण्यात आल्या आहे, बजरंग दल कार्यकर्त्यांनी वाहन व यामधील दोन व्यक्तीला बिडकीन पोलीस ठाण्यात स्वाधीन केले यांच्या विरोधात बिडकीन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास बिडकीन पोलीस करीत आहे.बजरंग दल अध्यक्ष ऋषिकेश (चिमण)जाधव व कार्यकर्ते यांचे बिडकीन नागरिकांनी कौतुक करून आभार मानले

# एमजीएममध्ये आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि.१९ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ इन्फर्मेशन अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी आणि जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'अप्लिकेशन्स ऑफ मशीन्स इंटेलिजियन्स अँड डेटा अनॅलिटीक्स' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे गुरूवार, दिनांक २१ ऑगस्ट २०२५ ते शुक्रवार, दिनांक २२ ऑगस्ट २०२५ दरम्यान विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात आयोजन करण्यात आले आहे.

या प्रकारची हि दुसरी परिषद यावर्षी आयोजित करण्यात येत असून यामध्ये डेटा अनॅलिटीक्स अँड व्हिज्युअलायझेश, इंटरनेट ऑफ थिंग्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग, सायबर सिक्युरिटी, स्पॅशियल ऍनालिसिस, इंडस्ट्रियल अप्लिकेशन / इकॉनॉमेट्रिक्स आदी विषयांवर चर्चा होणार आहे. या परिषदेत अमेरिका, तेहरान या देशासह कर्नाटक, राजस्थान, गुजरात, आसाम, दिल्ली आदि विविध राज्यातून ७५ पेक्षा अधिक शोधनिबंध सादर करण्यात येणार आहेत. विशेषत: अनेक उद्योजकही या परिषदेत आपला सहभाग नोंदवणार आहेत.

या परिषेदत नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, मिनिस्ट्री ऑफ इलेक्ट्रॉनिक्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, न्यू दिल्लीचे डायरेक्टर जनरल डॉ. मदनमोहन त्रिपाठी, आयआयटी मुंबईचे प्रा डॉ. सूर्या दुर्भा, डीईएस विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. राजेश इंगळे व सर्व संबंधित वक्ते उपस्थितांशी संवाद साधणार आहेत. या परिषदेसाठी कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ. एच.एच.शिंदे, विभागप्रमुख डॉ. शर्वरी तामणे, प्राध्यापक, संशोधक व आयटी क्षेत्रातील तज्ञ मान्यवर उपस्थित असणार आहेत.

या परिषदेत सहभागी होण्यासाठी नोंदणी करणे आवश्यक असून अधिक माहितीसाठी ९४०४४ ९४२९९, ७३८७१८३४०८ या क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे.

तरुण भारत CHANGE IN NAME

I HAVE CHANGED MY NAME FROM
OLD NAME:ZAHIRODDIN HASEEBUDDIN GAZI
NEW NAME:MOHAMMAD ZAHEERODDIN HASEEBUDDIN GAZI
ADDRESS:Bilal Nagar,Sillod,Aurangabad,Maharashtra-431112

ज्यांचा कोणाचा याच्याशी संबंध असेल त्यांना

याद्वारे सूचना देण्यात येते की हॅथवे एमसीएन प्रायव्हेट लिमिटेड (कंपनी) द्वारे जारी केलेले खालील शेअर सर्टिफिकेट, ज्याचे नोंदणीकृत कार्यालय ३१०/३११, अक्षयदीप प्लाझाटाउन सेंटर, सिडको जालना रोड, औरंगाबाद, महाराष्ट्र ४३१००१ येथे आहे, खालील भागधारकांच्या नावावर त्यांनी हरवले / गहाळ झाले आहेत आणि खालील शेअर सर्टिफिकेटने त्याऐवजी डुप्लिकेट शेअर सर्टिफिकेट जारी करण्यासाठी कंपनीकडे अर्ज केला आहे.

| नोंदणीकृत भागधारकाचे नाव | फोलिओ क्रमांक | प्रमाणपत्र क्रमांक | विशिष्ट क्रमांक पासुन | विशिष्ट क्रमांक पर्यंत | शेअर्सची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| श्री. विरेंद्र पवार | 1 | 12 | 1300001 | 1444118 | 1,44,118 |
| | | 15 | 1590486 | 1698485 | 1,08,000 |
| मध्यस्थ आणि अजंता सिक्युरिटीज प्रायव्हेट लिमिटेड | 5 | 17 | 1806486 | 1808735 | 2,250 |
| | | 21 | 1831611 | 1849985 | 18,375 |

वरील शेअर्सच्या संदर्भात कोणताही दावा असलेल्या कोणत्याही व्यक्तीने कंपनी किंवा तिच्या रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट – केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड, सेलेनियम टॉवर बी, प्लॉट ३१ आणि ३२, गाचीबोवली, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा, हैदराबाद ५०० ०३२ यांच्याकडे ही सूचना प्रकाशित झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा दाखल करावा, अन्यथा कंपनी त्या शेअर्सच्या संदर्भात डुप्लिकेट शेअर सर्टिफिकेट जारी करेल आणि त्यानंतर कंपनीकडून पुढील कोणताही दावा स्वीकारला जाणार नाही.

संचालक मंडळाच्या वतीने आणि त्यांच्याकडून अनुक्रमे
हॅथवे एमसीएन प्रायव्हेट लिमिटेड
दिनांक: १९ ऑगस्ट २०२५ S/d रितेश वखारिया संचालक

## जाहिर प्रगटण

मा. दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर न्यायालय गंगापूर ता. गंगापूर

सिव्हील एम.ए. क्र. ५०८/२०२५ पु.ता. १५/९/२०२५

अर्जदार : १) अलका अशोकराव कानडे वय ४८ वर्ष धंदा घरकाम रा. भाजी मंडी रांजणगाव शे. पु. ता गंगापूर जि औरंगाबाद. २) संगम अशोकराव कानडे वय २७ वर्ष धंदा शिक्षण रा. भाजी मंडी रांजणगाव शे पु ता. गंगापूर जि औरंगाबाद. ३) संध्यारानी अशोकराव कानडे वय २६, वर्ष धंदा शिक्षण रा. भाजी मंडी राजणगाव शे.पु. ता. गंगापूर जि औरंगाबाद. ४) गौतमीपुत्र अशोकराव कानडे वयः २४ वर्ष धंदा शिक्षण रा. रांजणगाव शे पु. ता. गंगापूर जि औरंगाबाद

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारस प्रमाणपत्र (हेअरशिप सर्टिफिकेट) मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड. एस. एम. गायकवाड य, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे चाबत मा. न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार है परील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन असे की, अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क २ ते ४ यांचे वडील नामे अशोकराव अंबादास कानडे हे मौजे. स. रांजणगाव शे.पु. ता. गंगापूर जि औरंगाबाद येथील रहिवाशी होते व ते दिनांक ०४/०३/२०२३ रोजी राजणगाव शे.पु. येथे मयत झाले असून त्यांना अर्जदार १ ते ४ शिवाय इतर कोणीही वास्स नाही. करीता उपरोक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहेत्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेपउजर –उजर या न्यायालयात असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप व्यक्तीश अथवा विधीज्ञामार्फत हि सायटेशन नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदाराच्या हक्कात त्यानी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल. करीता है जाहिर प्रगटण माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ०६/०८/२०२५ रोजी

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर

---

मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगाव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर

## जाहिर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २४४/२०२५

१. मोहमद्द उस्मान सयैद, वय ५१ वर्ष, धंदा शैती, रा. तितूर, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर,

विरूद्ध

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सु.गिरी, रा. सोयगांव, ता. मायगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयन उस्मान हसन सय्यदं यांचा दि. ०३.११.१९९६ मौने तितूर, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर. येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क्र.१ हे वारम आहेत असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ हे मयत उस्मान हसन सय्यद यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वाग्य प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आजरोजी दि.१९/८/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता. १०/१०/२०२५.

आदेशावरून,

क. लिपीक सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)

---

## जाहिर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २४२/२०२५.

१. सुगंधाबाई विश्वनाथ गव्हाड, वय ७५ वर्षे, धंदा शेती, रा. शिवाजीनगर आमखेडा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. २. विष्णु विश्वनाथ गव्हाड, वय ५२ वर्षे, धंदा व रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध

निल

प्रकरण :– वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. स्वप्निल सुरळकर सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत विश्वनाथ नारायण गव्हाड यांचा दिनांक २९/१२/२०२३ रोजी आमखेडा येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ व २ वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ व २ हे मयत विश्वनाथ नारायण गव्हाड यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक १९/०८/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता.२५/०९/२०२५

आदेशावरुन

विभागीय लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव

## अग्रलेख...

# कोण कमावणार, कोण गमावणार?

एखाद्या भांड्यात उकळणारा कोणताही द्रव पदार्थ आगीच्या कमाल धगीमुळे कमाल तापमानाच्या पातळीवर पोहोचल्यावर एक तर तो आटून जाण्यास सुरुवात होते किंवा उकळून ऊतू जाऊन पुन्हा आपल्या पातळीवर स्थिरावतो. उत्साहाचेही तसेच असते. तो एकदा ओसंडून ऊतू गेला की पुन्हा त्याखाली कितीही धग निर्माण केली, तरी तो पुन्हा ऊतू जात नाहीच, उलट आटूनच जातो. कदाचित त्यामुळेच, काही महिन्यांपूर्वी काही मोजक्या वृत्तवाहिन्या आणि माध्यमांच्या नसानसांत ओसंडणारा उत्साह त्या वेळी ऊतू गेल्यानंतर पुन्हा त्याला उकळ्या फुटल्याच नाहीत. आता तो आटतच चालला आहे. त्या दिवशी ज्या क्षणाकडे ही माध्यमे आणि वाहिन्या डोळ्यात प्राण आणून पाहात होत्या, त्या क्षणाचे साक्षीदार झाल्यानंतर त्यांचा उत्साह कमालीचा ओसंडून ऊतू गेला आणि पुढे त्या उत्साहास उकळ्यादेखील फुटेनाशा झाल्या. महाराष्ट्रात मराठीच्या मुद्यावरून उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेस आणि राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेस भाषाभिमानाच्या संधीचे आयते सोने हातात गवसल्याचा आनंद झाला आणि मराठी अस्मितेच्या कुबड्या घेऊन तरी दोघे भाऊ एकत्र येतील या एमकेव आशेपायी गेल्या सुमारे दोन दशकांपासून त्यांच्या ऐक्याची आस लागलेल्या माध्यमांचा आनंद ओसंडून वाहू लागला. महाराष्ट्रात हिंदी सक्तीच्या विरोधात या दोघांनी रान उठविल्यास महायुती सरकारची कोंडी होईल आणि उद्धव व राज ठाकरे यांना राजकीय संधीचे आकाश ठेंगणे होईल अशी अटकळ बांधलेल्यांची उमेद जागी झाली आणि त्यांनी उभय भावंडांच्या ऐक्याच्या तुताऱ्या फुंकण्यास सुरुवात केली. आपल्या ऐक्याकडे डोळे लावून बसलेल्या माध्यमांचा वापर करून घेण्याच्या संधीची खात्री पटल्यावर राज व उद्धव ठाकरे यांनी विरोधकांच्या सर्वपक्षीय आंदोलनाचा मुखवटा चढवून आपल्या ऐक्याच्या संधीचे तात्पुरते सोने केले, तेव्हा काही वृत्तवाहिन्यांच्या कार्यालयांत ऊतू जाणारा उत्साह महाराष्ट्राने अनुभवला होता. माध्यमांनी तटस्थपणे राजकीय घडामोडींकडे पाहावे असा संकेत असतो. पण काही माध्यमांनीही त्या ऐक्याच्या मुहूर्तावर टाळ्यांचा गजर केला आणि संकेतांची ऐसीतैसी करून टाकली. त्या वेळी ओसंडणाऱ्या अभूतपूर्व उत्साहास एवढ्या प्रचंड उकळ्या फुटल्या की तो सारा उत्साह एकाच वेळी अनावरपणे अक्षरश: ओसंडून ऊतू गेला. तो क्षण सरला आणि आता सारे काही पूर्वपदावर आले आहे. त्या दिवशी, जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्याअखेरीस हिंदी सक्तीच्या निर्णयाविरुद्ध एकत्र येऊन मोर्चा काढण्याच्या निर्णयाची हवा राज्य सरकारने काढून टाकल्यावर मोर्चाऐवजी विजयी मेळावा आयोजित करून उबाठा-मनसेचे कार्यकर्ते आणि महाविकास आघाडीतील काही पक्षांच्या नेत्यांच्या हजेरीत राज आणि उद्धव ठाकरे यांनी एकमेकांच्या मध्ये वीस वर्षांपासून स्वहस्ते धरलेला दुहीचा अंतरपाट दूर केला, एकमेकांची गळाभेट घेतली, तेव्हा अनेक लेखण्यांनी आणि जिभांनी महाराष्ट्राच्या राजकारणातील भूकंपाची भाकिते वर्तविली होती. आता सुमारे दीड महिन्यांचा काळ लोटल्यानंतर या लेखण्या आणि जिभादेखील शांत झाल्या आहेत आणि त्या दिवशीच्या गळाभेटीनंतर पुन्हा एकदा वातावरण जैसे थे होऊन उबाठा-मनसे ऐक्याच्या वावड्यांना नवी उकळी आणण्यासाठी संजय राऊत यांनी नव्याने कंबर कसली आहे. त्या दिवशी ओसंडून ऊतू गेलेला तो उत्साह पुन्हा एकदा अवतरेल आणि राजकारणातील भूकंपाची भाकिते चालविण्यासाठी त्या लेखण्या पुन्हा एकदा सरसावतील ही त्यांची अपेक्षा मात्र आता फारशी फळाला येताना दिसत नाही. म्हणूनच, महापालिका निवडणुकांच्या अगोदर राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना व उद्धव ठाकरे गट यांच्या युतीच्या बातमीतून, या नेत्यांचे भविष्यातील कमावणे किंवा गमावणे यांचा हिशेब मांडावा लागणार आहे.

राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरेंचे नेतृत्व नाकारून महाराष्ट्र नवनिर्माण सेना नावाचा स्वतंत्र पक्ष स्थापन केल्यावर या पक्षाच्या माथ्यावर महाराष्ट्रातील जनतेच्या अपेक्षांचे प्रचंड मोठे ओझे होते, ही बाब नाकारता येणार नाही. कदाचित त्यामुळेच, २००९ च्या लोकसभा निवडणुकीत एकाही जागेवर विजय मिळाला नसला तरी शिवसेना-भाजपचा विजय खडतर करून या पक्षाने सुमारे चार टक्के मतांचा जनाधार मिळविला होता, तर त्या विधानसभा निवडणुकीत साडेपाच टक्क्यांहून अधिक मते मिळवून १३ मतदारसंघांतून विधानसभेत प्रवेशही मिळविला होता. ही कामगिरी राज ठाकरे यांना पुढे टिकविता आली नाहीच, उलट पक्षाच्या कामगिरीची झपाट्याने घसरणच सुरू झाली. २०१४ आणि २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत फटका बसल्यानंतर हा पक्ष चाचपडू लागला आणि भाजपसोबत उद्धव ठाकरे यांचे बिनसल्याचे निमित्त करून भाजपशी हातमिळविणी करण्याचे प्रयत्न सुरू झाले. दुरावलेल्या उद्धव ठाकरेंची जागा राज ठाकरेंना देण्याचे गाजर भाजपने हातात धरताच मनसेच्या उतरत्या कळेला उजाळा मिळणार अशा अटकळीही बांधल्या जाऊ लागल्या आणि मनसेच्या पाठीवर बसून काठीला बांधलेले गाजर समोर धरलेल्या भाजपने राज ठाकरेंच्या राजकारणाचे पितळ उघडे पाडण्यास सुरुवात केली. राज ठाकरे यांच्याकडे कमावण्यासारखे काही उरलेले नाही, हे भाजपला माहीत होते आणि आपल्याकडे गमावण्यासाठीदेखील काही राहिलेले नाही हे राज ठाकरे यांनाही ठावूक होते. त्यामुळे गाजरामागे धावण्याच्या या खेळात दमछाक झाल्यावर आता स्थैर्यासाठी कोणाच्या तरी आधाराची राज ठाकरेंच्या पक्षाला गरज होतीच आणि तेव्हाच हिंदी सक्तीच्या मुद्याची संधी चालून आली. राज आणि उद्धव ठाकरे यांच्या ऐक्याचा नवा खेळ महाराष्ट्राला पाहावयास मिळावा यासाठी सत्तेतील चाणक्यांनी हा डाव मुद्दामच घडवून आणला असे तेव्हा बोलले जात होते, पण तो स्वतंत्र चर्चेचा मुद्दा होऊ शकतो. या संधीमुळे उद्धव आणि राज यांना एकत्र आणण्याच्या संजय राऊत यांच्या अपेक्षेला नवे धुमारे फुटू लागले. महाविकास आघाडीच्या आधाराने उद्धव ठाकरे यांना शरद पवारांच्या तंबूत नेण्याच्या मोहिमेत संजय राऊत यांची भूमिका महत्त्वाची होती. अन्यथा, भाजपची सोबत सोडल्यानंतर उद्धव ठाकरेंना सत्तेचे दरवाजे कायमचे बंद झाले असते याची जाणीव झालेल्या संजय राऊत यांनी प्रसंगी स्वत:वर अपमानाचे आणि टीकेचे वार झेलत उद्धव ठाकरे यांच्या इमानी निष्ठावंताचे कर्तव्य बजावत, उद्धव ठाकरे यांच्याकडे कमावण्यासारखे काही राहिले नाही हे स्पष्ट होताच नव्या समीकरणाची आखणी घेण्यासाठी पुढाकार घेतला. युती किंवा ऐक्याबाबत राज किंवा उद्धव ठाकरे यांनी मौन बाळगलेले असतानाही, संजय राऊत यांचा उत्साह मात्र आता एकतर्फी ऊतू चाललेला दिसत असल्याने, भविष्यात कमावण्यासारखे काही न राहिलेल्या व गमावण्यासाठी काहीच हाती नसलेल्या दोघा पक्षांच्या युतीची नवी समीकरणे महाराष्ट्रात तयार झाली, तर त्यात कोणास फारसे आश्चर्य वाटणार नाही.

भाजपसोबतच्या युतीचा कटोरा जाहीरपणे फेकून दिल्यानंतर शरद पवार यांच्या आशीर्वादाने महाविकास आघाडी सरकारच्या नेतृत्वाची संधी मिळालेल्या उद्धव ठाकरे यांनी गेल्या पाच वर्षांत भाजपेतर विरोधी पक्ष किंवा अन्य संबंधित संघटनांसोबत युती करण्याच्या साऱ्या शक्यतांचे सोने करून पाहिले. हिंदुत्वाचा मुद्दा सत्तेच्या राजकारणाआड येऊ नये यासाठी आपला मुखवटाही बाजूला काढून ठेवला आणि भेटेल त्याला युतीची गळही घातली. पण गटाला लागलेली गळती आता आवरण्यापलीकडे गेल्याची जाणीव ठाकरे यांना झाली आहे. अशा परिस्थितीत, महापालिकेच्या सत्तेची हंडी फोडण्यासाठी पायाखाली नवा थर रचावा लागेल, हे ओळखून सुरू झालेल्या प्रयत्नांना महाविकास आघाडीतून फारसा प्रतिसाद मिळत नाही, वज्रमूठ तर केव्हाच सैल पडली आहे आणि काँग्रेसने स्वबळाचा नारा कधीपासूनच लावला आहे. शरद पवार यांच्या राजकारणावर विसंबून राहणे विश्वासार्ह नाही, अशा परिस्थितीत, गमावण्यासारखे काहीच हाती राहिले नसलेला एकमेव पक्ष तरी सोबत घ्यावा ही त्यांच्या पक्षाची नवी नीती आता प्रत्यक्षात येऊ शकते. तसेही, राज ठाकरे यांच्या पक्षाला निवडणुकीच्या राजकारणात फारशा अपेक्षा राहिलेल्या नसाव्यात. निवडणुका ही मनसेकरिता गाजराची पुंगी ठरणार असून उबाठाच्या सोबतीने ती वाजलीच, तर ठीक, अन्यथा तीच पुंगी मोडून वाजवण्याची मनसेची तयारी असेलच! कदाचित, यामुळेच उबाठा-मनसे ऐक्याकडे डोळे लावून बसलेल्यांच्या उत्साहाचा आता ओहोटीचा काळ सुरू झाला असावा.

## आंतरराष्ट्रीय

# थायलंडमधील अस्थिर सरकारची परंपरा

**प्रा. जयसिंग यादव**

थायलंड आणि कंबोडियामधील वादाचे मूळ प्रत्यक्षात दोन्ही देशांमधील मैत्रीतील दरी हे आहे. शिनावात्रा कुटुंब बराच काळ थायलंडच्या राजकारणाचा भाग आहे. थाक्सिन शिनावात्रा हे शिनावात्रा कुटुंबाचे प्रमुख मानले जातात. त्यांनी २००० च्या दशकात पहिल्यांदा देशाच्या राजकारणात प्रवेश केला. त्यांनी थाईक थाई पक्षाची स्थापना केली आणि २००१ च्या सार्वत्रिक निवडणुकीत प्रचंड विजय मिळवला. राजकारणात त्यांचा दीर्घकाळ प्रभाव असण्याची अनेक कारणे आहेत. पहिली गोष्ट म्हणजे त्यांनी अनेक प्रगतिशील धोरणे स्वीकारली. थायलंडच्या राजकारणाला नवीन वळण दिले. त्यांच्या आगमनापूर्वी देशात कोणतेही कल्याणकारी धोरण नव्हते. ते देशातील गरिबांच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न करणारे पहिले नेते होते. त्यांच्या विरोधकांच्या युतीला 'यलो शर्ट्स' म्हणतात. त्यात बहुतेक शहरी मध्यमवर्गीय लोक आणि राजेशाही समर्थकांचा समावेश होता. २००६ मध्ये थाक्सिन शिनावात्रा यांच्या सरकारवर भ्रष्टाचार आणि देशाच्या राजाशी निष्ठा नसल्याचे आरोप लावण्यात आले. जनतेने त्यांच्याविरुद्ध रस्त्यावर उतरून जोरदार निदर्शने केली. त्यानंतर लष्कराने त्यांना पदच्युत केले. २००८ मध्ये थाक्सिन शिनावात्रा देश सोडून गेले आणि २०२३ मध्ये परतले. त्यांच्या पक्षावर बंदी घालण्यात आली. त्यानंतर त्यांनी प्रोथाई नावाने एक पक्ष स्थापन केला. देशाचे चार पंतप्रधान शिनावात्रा कुटुंबातून आले; परंतु प्रत्यक्षात थाक्सिन पडद्यामागे राहून सरकारचे महत्त्वाचे निर्णय घेत होते. २०२३ च्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये तरुणांच्या नेतृत्वाखालील 'मूव्ह फॉरवर्ड पार्टी'ला बहुमत मिळाले; परंतु सरकार स्थापन करण्याची संधी मिळाली नाही.

थायलंडच्या संवैधानिक न्यायालयाने निवडणुकीदरम्यान दिलेल्या आश्वासनाचा हवाला देत तरुणांच्या पक्षाला बरखास्त केले. राजेशाहीचा अपमान करणे हा देशात गुन्हा आहे. यानंतर, प्रोथाई पक्षाने प्रतिस्पर्धी पक्षांशी युती करून सरकार स्थापन केले. ऑगस्ट २०२४ मध्ये संसदेने प्रोथाई पक्षातील एका पंतप्रधानाला काढून टाकले आणि त्यांच्या जागी थाक्सिन शिनावात्रा यांची मुलगी पतोंगटार्न शिनावात्रा यांना पंतप्रधान म्हणून निवडले. त्यांच्याकडे कमकुवत पंतप्रधान म्हणून पाहिले जात होते. पंतप्रधान झाल्यानंतर, थाक्सिन यांनी सरकारी धोरणांवर उघडपणे बोलण्यास सुरुवात केली. या टीकेमुळे त्यांच्या पंतप्रधान मुलीची विश्वासार्हता नष्ट झाली. त्यातच थायलंडचे पंतप्रधान आणि कंबोडियाच्या संसदेचे अध्यक्ष आणि माजी पंतप्रधान हुन सेन यांच्यातील दूरध्वनी संभाषण लीक झाले. पतोंगटार्न सीमेवरील संघर्ष थांबवून शांतता प्रस्थापित करू इच्छित होत्या. या संभाषणादरम्यान, पतोंगटार्न शिनावात्रा यांनी हुन सेन यांना काका म्हणून संबोधले. ते खूप धाडसीपणे बोलत असल्याचे दिसले.



हुन सेन आणि पतोंगटार्न यांचे वडील जवळचे मित्र आहेत आणि कदाचित म्हणूनच पतोंगटार्न या हुन सेन यांच्यांशी अतिशय विनम्रपणे बोलल्या आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी त्यांच्या मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. यानंतर एका प्रमुख रूढीवादी पक्षाला सरकारमधून बाहेर काढण्यात आले आणि देशभरात पतोंगटार्न यांच्याविरुद्ध व्यापक निदर्शने झाली. त्यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली. त्यांनी संवैधानिक न्यायालयात युक्तिवाद केला, की शांतता कराराच्या रणनीतीचा भाग म्हणून आपण कंबोडियन नेत्यांशी अशा प्रकारे चर्चा केली; परंतु संवैधानिक न्यायालयाने त्यांच्याविरुद्ध चौकशी सुरू करत निलंबित केले. थायलंडची लोकशाही कमकुवत आहे. थायलंडमध्ये निवडणुका होतात आणि तेथे संसददेखील आहे; परंतु २० वेळा संविधान बदलण्यात आले असून १३ वेळा सरकारे उलथवण्यात आली आहेत. १९३२ पासून न्यायव्यवस्थेने अनेक वेळा प्रशासनात हस्तक्षेप केला आहे. इतर देशांमध्ये कार्यकारी मंडळ सरकारी प्रशासन चालवते; परंतु येथे सैन्य आणि राजेशाहीदेखील आहे. १९९२ पासून थायलंडमध्ये संवैधानिक राजेशाही आहे, म्हणजेच राजा हा देशाचा प्रमुख असतो; परंतु संविधानावर आधारित नियमांनुसार सत्ता सरकारच्या हातात असते. लष्कराला सत्तापालट करायचा अधिकार असला तरी ते थायलंडच्या राजाच्या संमतीशिवाय होऊ शकत नाही. लष्कराने २०१४ मध्ये सत्तापालट केला होता. पूर्वी लष्करी सत्तापालटाचे सूत्र थायलंडच्या राजकारणाचा एक भाग होते. त्याची सुरुवात संविधान बदलण्यापासून व्हायची. त्यानंतर निवडणुका व्हायच्या आणि सरकारवर भ्रष्टाचाराचे आरोप व्हायचे. ते राज्य करण्याचा नैतिक अधिकार गमावायचे, त्यानंतर लष्कराकडून सत्तापालट व्हायचा. यानंतर, सत्ता हस्तगत करणारे लष्करी जनरल नवीन संविधान तयार करायचे. तिथे अनेक वेळा सत्तापालट झाला आहे. लष्कराने देशात अनेक वेळा सत्तापालट केले आहेत, आता प्रश्न असा उद्‌भवतो की हे पुन्हा घडू शकते का? थायलंडच्या कमकुवत लोकशाही व्यवस्थेमुळे सैन्य सत्ता हस्तगत करण्याची शक्यता नेहमीच असते. सध्याचे संविधान हे देशाचे विसावे संविधान आहे. २०१७ मध्ये लष्करी राजवटीत ते स्वीकारण्यात आले. हे संविधान लष्कराच्या देखरेखीखाली असलेल्या सैन्यसमर्थक समितीने तयार केले आहे. त्यात असे अनेक कायदे आहेत, ज्यात राजकीय पक्ष आणि राजकारण्यांना कमकुवत ठेवता येते. या अंतर्गत राजकीय पक्ष आणि राजकारण्यांना बंदी घालता येते. न्यायव्यवस्थेच्या सहकार्याने या संविधानाखाली सरकारांना अस्थिर आणि कमकुवत ठेवता येते. संवैधानिक न्यायालयाने गेल्या २० वर्षांमध्ये सहा पंतप्रधानांना निलंबित केले आहे. देशाच्या कमकुवत लोकशाही व्यवस्थेमुळे हे शक्य झाले आहे.

कंबोडिया आणि थायलंडमधील संबंध नेहमीच तणावपूर्ण राहिले आहेत. दोन्ही देशांमध्ये जमिनीवरून बराच काळ वाद आहे. दोन्ही बाजूंनी या मुद्यावर राष्ट्रवादी भावना वर्चस्व गाजवतात आणि एकमेकांकडे संशयाने पाहतात. त्याच वेळी दोन्ही देशांच्या राजकीय कुटुंबांमधील, म्हणजेच शिनावात्रा आणि हुन कुटुंबांमधील वैयक्तिक राजनैतिक संबंधांमुळे, परिस्थिती कधीही स्फोटक बनू शकते. असे घडते, तेव्हा दोन्ही देशांमधील सीमा बंद होतात. या वेळीही थायलंडने काही तेल पाईपलाईन बंद केल्या. कंबोडियाने थायलंडमधून फळे आणि अन्नपदार्थांच्या आयातीवर बंदी घालून प्रत्युत्तर दिले. परिस्थिती तणावपूर्ण होते, तेव्हा दोन्ही देश सीमेवर आपले सैन्य तैनात करतात. हे अनेकदा घडते; परंतु दोन्ही देशांच्या नेत्यांमधील टेलिफोन संभाषण लीक झाल्यामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली. दोन्ही देशांच्या प्रमुख राजकीय कुटुंबांचे अनेक दशकांपासून जवळचे संबंध आहेत. थाक्सिन यांना थायलंडच्या पंतप्रधानपदावरून काढून टाकण्यात आले, तेव्हा हुन सेन कंबोडियाचे पंतप्रधान होते. त्यांनी थाक्सिन यांना वरिष्ठ सल्लागार म्हणून कंबोडियाला आमंत्रित केले होते. हुन सेन हे ३०-३५ वर्षांपासून कंबोडियाच्या राजकारणात आहेत आणि तत्कालीन पंतप्रधान हुन मानेट यांचे वडील आहेत. हुन सेन यांचे पुत्र उपपंतप्रधान आहेत.

आग्नेय देशांमध्ये, एखाद्या राजकारण्याने दुसऱ्या देशातील वरिष्ठ राजकारण्याला काका, भाऊ किंवा बहीण असे संबोधणे सामान्य आहे. कंबोडियाचे माजी पंतप्रधान हुन सेन यांनी फोन कॉल लीक होण्याचे समर्थन केले आणि म्हटले की त्यांनी पारदर्शकतेसाठी असे केले; जेणेकरून संभाषणाचा वेगळा अर्थ काढला जाऊ नये. असे असले, तरी एखाद्या देशाच्या पंतप्रधानांचे कॉल लीक करणे हे योग्य पाऊल मानले जाऊ शकत नाही. हुन सेन कंबोडियाच्या परराष्ट्र धोरणावर आपली पकड असल्याचे दाखवू इच्छित असतील. ते याद्वारे देशाच्या आर्थिक समस्यांवरून लोकांचे लक्ष वळवू इच्छित असतील. थायलंड हा आग्नेय आशियातील एक प्रमुख निर्यातदार असून परकीय भांडवल गुंतवणूक आकर्षित करत आहे; परंतु गेल्या वीस वर्षांमध्ये राजकीय अस्थिरतेमुळे हा देश या बाबतीत शेजारील देशांपेक्षा मागे पडला आहे. सध्याच्या अस्थिरतेमुळे थायलंडसाठी फायदेशीर करार करणे सोपे होणार नाही. देशातील अस्थिर आघाडी सरकारला जगासोबतच्या व्यापार धोरणांवर लक्ष केंद्रित करणे कठीण होत चालले आहे. थायलंडमध्ये जून २०२७ पूर्वी सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत; परंतु अशी भीती आहे की मध्यावधी निवडणुका झाल्या तरी परिस्थितीत बदल होणे अवघड आहे.

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

## वेध

# व्यापारयुद्धात भारताची क्षमता

**पुंडलिक आंबटकर**

रशियाकडून कच्चे तेल खरेदी करून भारत इतर देशांना विकत असल्याच्या सबबीवर अमेरिकेने व्यापारयुद्ध छेडले आहे. वास्तविक अमेरिकेला भारतीय बाजारपेठ काबीज करायची आहे आणि त्यांना प्रामुख्याने आपली कृषी उत्पादने भारतात विकायची आहे. असे झाल्यास भारतीय शेतकरी नेस्तनाबूत झाल्याशिवाय राहणार नाही. अमेरिकेने भारतीय उत्पादनांवर आयात शुल्क लादून दबाव आणण्याचा प्रयत्न चालविला आहे. परंतु, भारतीय शेतकऱ्यांच्या हिताशी कोणतीही तडजोड स्वीकारली जाणार नाही, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ठणकावून सांगितले आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प स्वत: एक व्यापारी आहेत. त्यामुळे ते होईल त्या मार्गाने आपल्या देशाला आर्थिक लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न करीत आहेत. अमेरिका ३० ट्रिलियन डॉलर्सची महासत्ता आहे. परंतु, या देशावर वेगवेगळ्या प्रकारचे तब्बल ३७ ट्रिलियन डॉलर्स इतके कर्ज आहे! भारत झपाट्याने वेगवेगळी शिखरे पादाक्रांत करीत आहे. काही दिवसांपूर्वी अमेरिकन बनावटीचे इंग्लंडचे एक अत्याधुनिक लढाऊ विमान भारतीय हद्दीत घुसले होते. परंतु, भारतीय तंत्रज्ञानाने हे विमान काही क्षणातच तांत्रिकदृष्ट्या निकामी केले. तेव्हापासून अमेरिकेसह नाटो देशांची झोप उडाली आहे. आता ट्रम्प यांनी कुठलाही दूरगामी विचार न करता भारत आणि ब्राझीलवर व्यापारयुद्ध लादले आहे. त्यामुळे जागतिक पटलावर नवी समीकरणे तयार होऊ लागली आहेत. अमेरिका भारताचा सर्वांत मोठा व्यापारी भागीदार आहे. २०२४-२५ या वर्षात भारत-अमेरिकेत तब्बल १२४ अब्ज डॉलर्सचा व्यापार झाला. २०३० पर्यंत हा व्यापार ५०० अब्ज डॉलर्सवर नेण्याचे उद्दिष्ट दोन्ही देशांचे होते. परंतु, राष्ट्रवादी विचारसरणीचे ट्रम्प निवडून आले आणि एकाएकी सर्व चित्रच पालटले. डोनाल्ड ट्रम्प यांच्या विजयात भारतीय वंशाच्या नागरिकांचा मोठा वाटा आहे. प्रचार काळात ट्रम्प यांनी या नागरिकांना अनेक आश्वासने दिलीत. परंतु, निवडून आल्यानंतर त्यांची वागणूक पाहता 'हे तेच ट्रम्प आहेत का?' असा प्रश्न पडतो.

भारत सर्वांत मोठा तांदूळ निर्यातदार आहे. भारतात पिकणाऱ्या तांदळाला जगात विशेष मागणी आहे. यामुळे भारतीय शेतकऱ्यांच्या पदरी चार पैसे अधिकचे पडतात. ट्रम्प यांच्या व्यापारयुद्धाचा फटका तांदूळ उत्पादकांनाही बसणार आहे. अमेरिकेत सोयाबीन, मका, इथेनॉल, दूध आणि दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. अमेरिकेची कृषी उत्पादने उच्चत्तम हायब्रीड श्रेणीतील असतात. तिथे प्रचंड उत्पादन होत असल्याने ही उत्पादने खूपच स्वस्त असतात. अशा परिस्थितीत भारताने अमेरिकेची कृषी उत्पादने आयात केलीच तर भारतीय कृषी क्षेत्राचा पाया ढासळल्याशिवाय राहणार नाही. आधीच सोयाबीन उत्पादक नापिकीमुळे मोठ्या प्रमाणात आत्महत्या करीत आहे. अशा परिस्थितीत अमेरिकेची कृषी उत्पादने आयात केल्यास भारतातील गोरगरीब शेतकऱ्यांना आत्महत्या करण्याशिवाय पर्याय उरणार नाही. मात्र, आता देशात कणखर आणि सक्षम सरकार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी काळजी करू नये. पर्यायी मार्ग शोधण्याचा प्रयत्न सुरू आहे आणि यात सरकार नक्कीच यशस्वी होईल. जगात भारतीय तंत्रज्ञानाचा डंका वाजत आहे. परंतु, आजही अनेक बाबतीत आपण पिछाडीवर आहोत. लढाऊ विमानांचे इंजिन आपल्याला किमान आज तरी इतरांकडून प्राप्त करावे लागते. भारताने अमेरिकेचा दबाव झुगारल्याने ट्रम्प नव्याने काही निर्णय घेऊ शकतात. असे झालेच तर गूगल, फेसबुक, युट्यूब, इन्स्टाग्राम आदींचे नवे पर्याय आपल्याला शोधावे लागतील. या कंपन्या अमेरिकेच्या आहेत आणि आज त्यांना सर्वाधिक कमाई भारतातूनच प्राप्त होते. प्रत्युत्तर म्हणून भारताला या कंपन्यांवर विशिष्ट शुल्क आकारता येईल. परंतु, तसे करणे धोक्याचे ठरू शकते. त्यापूर्वी पर्यायी व्यवस्था निर्माण करावी लागेल आणि या दिशेने प्रयत्न सुरू झाल्याचे समजते. परंतु, कुठल्याही तंत्रज्ञानाची कॉपी करून आपण यशस्वी होऊ शकत नाही. त्यामुळे नागरिकांना ठोस असे पर्यायी स्वदेशी तंत्रज्ञान उपलब्ध करून द्यावे लागतील. तेव्हाच त्यांचा विश्वास बसेल आणि आत्मनिर्भर भारत या संकल्पनेचे उद्दिष्ट वेगाने मार्गी लागेल. १ जुलै २०१५ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डिजिटल इंडिया हा दूरगामी कार्यक्रम सुरू केला आणि पाहता पाहता संपूर्ण देश डिजिटल करून दाखविला. भारतीय नागरिकांनी यूपीआय आणि फोन पे या पर्यायांचाच वापर करावा. कारण, या सुविधा भारतीय आहेत. गूगल पे व अन्य कमी दर्जाच्या विदेशी सुविधा तसेच वस्तूंचा वापर टाळला पाहिजे. सरकारकडून तसे आवाहन करण्यात येत आहे आणि संकट काळात सरकारच्या पाठीशी राहणे हे प्रत्येकाचे राष्ट्रीय कर्तव्य आहे.

९८८१७१६०२७

## प्रासंगिक

# विदर्भाची नीलक्रांती : मत्स्य व्यवसायाची पहाट

**शुभम सोनी**

महाराष्ट्र राज्याचा अविभाज्य भाग असलेला विदर्भ प्रदेश कृषी आव्हानांसाठी ओळखला जातो. तथापि, आता त्याच्या विशाल गोड्या पाण्याच्या साठ्यांमध्ये शांत क्रांती घडत आहे. किनाऱ्यापासून दूर असूनही विदर्भात हजारो प्राचीन, मानवनिर्मित तलाव आहेत; ज्यात मत्स्य व्यवसायासाठी प्रचंड क्षमता आहे. या नैसर्गिक संसाधनांचा अनेक दशकांपासून कमी वापर झाला होता, परंतु सध्या या प्रदेशाच्या आर्थिक परिदृश्यात बदल घडवून आणण्यासाठी दोन मोठे बदल घडत आहेत. पहिले, ऐतिहासिक मालगुजारी तलावांचे पुनरुज्जीवन आणि दुसरे, मत्स्य व्यवसायाला कृषी दर्जा देण्याचा महाराष्ट्र सरकारने घेतलेला ऐतिहासिक निर्णय.

**मालगुजारी तलाव : प्राचीन जलस्रोतांचे पुनरुज्जीवन**

पूर्व विदर्भात सुमारे ७,००० मालगुजारी तलाव आहेत, जे दोन शतकांपूर्वी बांधलेल्या पारंपरिक पाणी साठवण संरचना आहेत. ऐतिहासिकदृष्ट्या हे तलाव ग्रामीण अर्थव्यवस्थेची जीवनरेखा होते, भातशेतींना सिंचन करत होते तसेच स्थानिक माशांच्या उत्पादनालाही आधार देत होते. कालांतराने दुर्लक्ष आणि गाळ साचल्यामुळे अनेक तलावांनी त्यांची उपयुक्तता गमावली. तथापि, २००८ मध्ये सुरू झालेल्या यशस्वी पुनरुज्जीवन चळवळीने भविष्यासाठी एक मजबूत ब्लू प्रिंट सादर केली आहे. भंडाराजवळील जानभोरा तलावाचे पुनर्संचयित करणे हे एक उत्तम उदाहरण आहे. सामुदायिक सहभागाद्वारे गाळ काढण्याच्या प्रयत्नांमुळे तलावाची पाणी साठवण क्षमता लक्षणीयरीत्या वाढली. यामुळे केवळ भूजल पातळी सुधारली नाही आणि आसपासच्या शेती क्षेत्रात उत्पादन वाढले नाही तर माशांच्या उत्पादनातही लक्षणीय वाढ झाली आहे, ज्यामुळे स्थानिक कुटुंबांसाठी उत्पन्नाचा एक महत्त्वाचा अतिरिक्त स्रोत निर्माण झाला आहे. या यशामुळे व्यापक सरकारी उपक्रमांना प्रेरणा मिळाली आहे, जे या प्राचीन संपत्तीला केवळ सिंचनाचे स्रोत म्हणून नव्हे तर भरभराटीच्या मत्स्य व्यवसायासाठी तयार पायाभूत सुविधा म्हणून ओळखतात.

**धोरण बदल : मत्स्य व्यवसायासाठी कृषी स्थिती**

मालगुजारी तलावांचे पुनरुज्जीवन भौतिक पायाभूत सुविधा प्रदान करीत असताना, महाराष्ट्र सरकारच्या अलिकडच्या धोरणात्मक निर्णयामुळे महत्त्वपूर्ण आर्थिक आणि कार्यात्मक चालना मिळते. राज्य सरकारने मत्स्य व्यवसाय क्षेत्राला अधिकृतपणे 'कृषी' दर्जा दिला आहे, जो उद्योगासाठी एक क्रांतिकारी पाऊल मानले जात आहे. या धोरणातील बदलामुळे मत्स्यपालनाचे धोके मूलभूतपणे कमी होतात आणि मत्स्यपालन करणाऱ्या शेतकऱ्यांना पारंपरिक शेतकऱ्यांच्या बरोबरीचे स्थान मिळते, ज्यामुळे त्यांना पूर्वी नाकारलेले अनेक फायदे मिळतात. विदर्भातील मासेमार आता कृषी दरांवर अनुदानित वीजपुरवठा, किसान क्रेडिट कार्ड (केकेसी) द्वारे वेळेवर आणि परवडणारे कर्ज आणि नैसर्गिक आपत्तीच्या बाबतीत शेतकऱ्यांच्या बरोबरीने भरपाईसाठी पात्र आहेत. याव्यतिरिक्त त्यांना नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेंतर्गत ६,००० वार्षिक उत्पन्न मदतदेखील मिळेल.

**केंद्रीय योजनांचे योगदान**

राज्य सरकारच्या या प्रयत्नांना केंद्र सरकारच्या दोन पूरक योजनांमधून लक्षणीय चालना मिळते, ज्या भांडवली गुंतवणूक आणि दीर्घकालीन व्यवहार्यता या दोन्ही गोष्टींना संबोधित करतात.

प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना ही मत्स्यपालन क्षेत्रात नीलक्रांती घडवून आणण्याच्या उद्देशाने सुरू केलेली एक प्रमुख योजना आहे, ज्याचे प्राथमिक उद्दिष्ट आधुनिक मत्स्यपालनाचा उच्च प्रारंभिक खर्च कमी करणे आहे. पीएमएमएसवायद्वारे विदर्भातील शेतकरी नवीन तलावांचे बांधकाम, हॅचरीज उभारणे आणि बायोफ्लॉक किंवा रीसर्कुलेटिंग एक्वाकल्चर सिस्टिम (आरएएस) सारख्या उच्च-उत्पादन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे यासह विविध उपक्रमांसाठी महत्त्वपूर्ण क्रेडिट-लिंक्ड भांडवली अनुदान (सर्वसाधारण श्रेणीसाठी ४० टक्के आणि एससी/एसटी/महिलांसाठी ६० टक्के) मिळवू शकतात. याव्यतिरिक्त पीएमएमएसवायची उप-योजना, प्रधानमंत्री मत्स्य किसान समृद्धी सह-योजना (पीएम-एमकेएसएसवाय) मत्स्यपालन क्षेत्राचे औपचारिकीकरण आणि त्याच्या सूक्ष्म आणि लघु उद्योगांना समर्थन प्रदान करण्यावर लक्ष केंद्रित करते. योजनेचे प्रमुख घटक खालील उद्दिष्टे लक्षित करतात-

शेतकऱ्यांसाठी डिजिटल ओळख निर्माण करणे, पीक नुकसानीपासून होणारे धोके कमी करण्यासाठी मत्स्यपालन विम्याच्या खरेदीला प्रोत्साहन देणे आणि गुणवत्ता आणि कार्यक्षमता सुधारण्यासाठी सूक्ष्म आणि लघु उद्योगांना कामगिरी-आधारित अनुदान प्रदान करणे.

**संधींचा संगम**

या बहुआयामी उपक्रमांचा संगम विदर्भातील मत्स्यपालनासाठी एक अद्वितीय अनुकूल परिसंस्था तयार करतो. मालगुजारी तलाव पुनरुज्जीवन विस्तारासाठी भौतिक आणि समुदाय-केंद्रित पायाभूत सुविधा प्रदान करते. राज्याचे 'कृषी स्थिती' धोरण शेतकऱ्यांना कामकाज स्थिरता आणि एक महत्त्वपूर्ण आर्थिक सुरक्षितता प्रदान करते. भांडवली गुंतवणूक सुलभ करणाऱ्या पीएमएमएसवाय आणि औपचारिकीकरण, जोखीम कमी करणे आणि दीर्घकालीन शाश्वततेला प्रोत्साहन देणाऱ्या पीएम-एमकेएसएसवायद्वारे हा पाया मजबूत होतो. एकत्रितपणे हे उपक्रम खऱ्या नीलक्रांतीचा मार्ग मोकळा करत आहेत, स्थानिक समुदायांना सक्षम बनवत आहेत आणि विकासाच्या अभावी असलेल्या प्रदेशात आर्थिक समृद्धीचा एक नवीन अध्याय सुरू करत आहेत.

(पीएचडी विद्यार्थी, आयसीएआर;
केंद्रीय मत्स्य व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई)

## वाचक पत्रे

### राज्यातील शेतकऱ्यांना हवा मदतीचा हात

राज्यात यंदा पावसामुळे शेतीचे आणि शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. यामुळे राज्यातील अल्पभूधारक शेतकरीच नव्हे संपूर्ण शेतकरीवर्ग मोठ्या संकटात सापडलेला आहे. यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती बिकटच होत चालली आहे. राज्यातील फक्त विदर्भातीलच नव्हे तर इतरही भागात शेतकरी आत्महत्येचे सत्र सुरूच आहे. शेतकरी आत्महत्या हा मुद्दा केवळ राज्यातील राजकारणासाठी महत्त्वाचा विषय ठरला आहे. तर शेतकऱ्यांचा केवळ राजकारणात भांडवल म्हणून उपयोग होतो आहे. आजही अनेक शेतकरी कर्जमाफी, पिकविमापासून वंचितच आहे. शेती जेवढी फायद्याची तेवढीच ती तोट्याची सुद्धा आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतीचेही मोठे नुकसान होताना दिसते आहे. शेतकऱ्यांना शासनाकडून मदतीचा हात मिळावा म्हणून राज्यात अनेक शेतकरी संघटना, शेतकरी नेते आपापल्या परीने संघर्ष करताना दिसतात. मात्र तरीही ग्रामीण भागातील अनेक शेतकऱ्यांच्या समस्या आजही कायम आहे. शेतमोजणीसाठी अनेकदा शेतकऱ्यांना सरकारदरबारी वारंवार चकरा माराव्या लागतात. आजही अनेक सरकारी कार्यालयात चिरीमिरी दिल्याशिवाय समस्या सुटत नाही. कागदपत्रे मिळत नाहीत. राज्यातील अनेक मतदारसंघात ढगफुटीसदृश पाऊस पडलेला आहे. यामुळे प्रचंड नुकसान झाले आहे. रस्ते, नाले, पुलांची अवस्था बिकट झाली आहे. अनेक ठिकाणची विकासात्मक कामे ढगफुटीमुळे उघड झाली आहे. असो, सांगायचे एवढेच की शासनाने नुकसानग्रस्त भागाचे तातडीने पंचनामे करून ओला दुष्काळ जाहीर करावा व शेतकऱ्यांना योग्य पद्धतीने मदतीचा हात द्यावा हीच अपेक्षा.

**सचिन जगन नागरे**/९६०४३२१४३२

### अमेरिकेला धास्ती बसली

अमेरिकेची मुजोरी आणि दंडेलशाही थांबवायची असेल तर स्वदेशीचा आग्रह अत्यंत महत्त्वाचा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पण या अत्यंत ज्वलंत मुद्याला अग्रस्थानी ठेवले असून स्वदेशी वस्तूंविषयी भावनिक आवाहन केले आहे. भाजप शासित राज्याच्या सर्व मुख्यमंत्र्यांनी जनतेला आवाहन केले असून लवकरच याचे दूरगामी सकारात्मक परिणाम दिसू लागतील. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या कार्यकाळात ही मोहीम सुरू झाली होती. अनेक शहरांमध्ये 'स्वदेशी मेळा' या नावाने भव्य प्रदर्शन भरत असे. स्वदेशी जागरण मंचने या मोहिमेला व्यापक पाठिंबा दिला होता. केंद्रीय शासन स्तरावर जनजागृती होणे अत्यावश्यक होते. नंतरच्या सरकारने या चळवळीचे वाटोळे केले. आता अनुकूल परिस्थिती निर्माण झाली असल्याने ही मोहीम यशस्वीपणे राबविण्यात आली तर आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेत अजून बदल होईल. शस्त्रनिर्मितीमध्ये भारताने जी उल्लेखनीय प्रगती केली आहे, त्याचीच धास्ती अमेरिकेने घेतली असल्यास नवल ते काय!

**संजय पाठक**/नागपूर

### आपली बोली भाषा

आपल्या देशात अनेक भाषा आहेत. महाराष्ट्रातील मुख्य भाषांचा विचार केला तर मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती व मारवाडी या ऐकायला मिळतात. भाषा हा राजकारणाचा विषय झालेला आपण पाहतो. वास्तविक पाहता देशाचा विचार केला तर आपल्या देशात अनेक भाषा आणि प्रांत अस्तित्वात आहेत. स्वाभाविकपणे तिथल्या चालीरीती व भाषा वेगवेगळ्या आहेत. आज नाही याला कित्येक वर्षांचा इतिहास आहे. आजचा विषय मराठी, हिंदीचा वाद एवढाच आहे. तो राजकारणाचा भाग आहे. एकच छोटासा प्रश्न आहे की ज्यांनी हा वाद सुरू केला तो राजकीय लाभासाठी. ते असो. आपण दिवसभराच्या व्यवहारात किती भाषा वापरतो व त्यातील कोणती भाषा किती जण अन्य भाषांची कुबडी न घेता बोलतात. त्यात मुख्यत: विदेशी भाषेच्या कुबडीचा विषय आहे. विदेशी भाषांत इंग्रजी, उर्दू, फारसीची कुबडी न घेता आपली मातृभाषा तरी आपण बोलतो का? तर आपण बोलताना निश्चितपणे ठरवून अन्य भाषेचा आधार न घेता बोलण्याचा प्रयत्न करावा.

**प्रमोद देशपांडे**/९४२२१०५७२७

### अकरावी ऑनलाईन प्रवेशामुळे शिक्षण कोसो दूर

सध्या अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. एसएससी परीक्षेचा प्रत्येक बोर्डाचा निकाल हा ९० टक्क्यांच्या जवळपास आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची उत्तीर्ण होण्याची संख्या खूप आहे. अकरावी प्रवेशासाठी शासनाने ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबवली आहे. ग्रामीण भागात बहुतांश ठिकाणी जिथे दहावा वर्ग आहे तिथे अकरा वर्ग आहे. विद्यार्थ्यांच्या दहाव्या वर्गाच्या गुणांचा विचार करता गुणानुक्रमे सर्वच विद्यार्थ्यांचा नंबर जिल्ह्याच्या किंवा तालुक्याच्या शाळेत लागला नाही त्यामुळे ग्रामीण भागातील शाळेमध्ये त्यांचे नंबर लागले परंतु ग्रामीण भागातील शाळेमध्ये विद्यार्थ्यांना जाण्यासाठी व्यवस्थित रस्ते नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांसमोर शिक्षणाच्या दृष्टिकोनातून गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या प्रक्रियेमुळे काही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहून शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर जाऊ शकतात. प्रशासनाने याकडे वेळीच लक्ष घालून विद्यार्थ्यांची शैक्षणिक समस्या सोडवावी.

**धनंजय पांडे**/अकोला

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com





शहरातील अहिल्यानगर-बीड रोडवरील नगरनाका येथे नवीन दुभाजक दोन महिन्यापूर्वीच केलेले असतांना हायमस्ट लाईट बसविण्यासाठी तोडण्यात येत आहे.(छाया कृष्णा शिंदे)

# अतिवृष्टी नुकसानीचे पंचनामे करुन घ्या

## खा.बजरंग सोनवणे यांचे शेतकरी, नागरिकांना आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१९ ऑगस्ट**

मागील काही दिवसांपासून जिल्ह्यात संततधार आणि मुसळधार पावसाची नोंद झालेली असून अनेक नद्यांना पूर गेलेला आहे. कमी जास्त प्रमाणात जिल्ह्यातील सर्वच महसुली मंडळामधे अतिवृष्टीमुळे नुकसान झाल्याच्या घटना घडल्या आहेत. या पावसामुळे पिकांचे, शेतीचे आणि घरांची पडझड होवूनही मोठी हानी झालेली आहे. प्रशासन पंचनामे करत आहेच परंतु आपनही नुकसानीचे फोटो, व्हिडीओ तहसील प्रशासनाकडे द्यावेत, जेणे करून मदत मिळण्यास सोपे होईल, असे अवाहन खा.बजरंग सोनवणे यांनी केले आहे.

गेल्या ४/५ दिवसांपासून झालेल्या संततधार पावसामुळे बीड जिल्ह्यामध्ये सर्वत्रच शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. उपजाऊ मातीसह जमीन वाहून गेल्यामुळे पुढील काळासाठी काही क्षेत्र उजाड झाली आहेत. काही ठिकाणी घरांची पडझड झाली आहे तसेच गुरे दगावले असल्याची माहिती येत आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तात्काळ पंचनामे करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. झालेल्या नुकसानीचे फोटो व व्हिडिओ स्वत:कडे जतन करून ठेवावेत, तसेच नुकसानीबाबतची तक्रार फोटो, व्हीडिओसह तहसीलदार यांच्याकडे लेखी स्वरूपात सादर करावी. या प्रक्रियेत कुठलीही अडचण आल्यास माझ्या कार्यालयाशी संपर्क साधून मदत घ्यावी. पंचनामे करून घेण्यासाठी सरपंच आणि गावपातळीवर काम करणाऱ्या मंडळींनी पुढाकार घेवून पंचनामे पुर्ण करून घेण्यासाठी प्रयत्न करावेत.



# मुद्रांक पेपरची गरज नसताना बीडमधील सरकारी कार्यालयांकडून नागरिकांची अडवणूक

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१९ ऑगस्ट**

राज्य सरकारने आणि उच्च न्यायालयाने स्पष्ट आदेश दिल्यानंतरही बीड जिल्ह्यातील काही शासकीय कार्यालयांकडून नागरिकांकडून मुद्रांक (स्टॅम्प पेपर) सादर करण्याची मागणी केली जात असल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत.

उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाच्या जनहित याचिका (क्रमांक ५८/२०२१) नुसार आणि नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांच्या ३० ऑक्टोबर २०२४ रोजीच्या परिपत्रकानुसार, शासकीय कार्यालयांमध्ये जात, उत्पन्न, निवास, राष्ट्रीयत्व इत्यादी प्रमाणपत्रांसाठी प्रतिज्ञापत्र सादर करताना मुद्रांक पेपराची आवश्यकता नाही.

तरीही, बीड जिल्ह्यातील महसूल विभाग, तहसील कार्यालये आणि काही ईसेवा केंद्रांमध्ये नागरिकांना १०० ते ५०० पर्यंतचे स्टॅम्प पेपर खरेदी करण्यास भाग पाडले जात आहे. यामुळे अनेक सामान्य नागरिक, विशेषतः विद्यार्थी आणि ग्रामीण भागातील लोक आर्थिक व मानसिक त्रासाला सामोरे जात आहेत.

**नागरिकांचा संताप**

बीड शहरातील एका रहिवाशाने सांगितले, जात प्रमाणपत्रासाठी अर्ज करताना ५०० रुपयांचा स्टॅम्प पेपर आणण्यास सांगितले गेले. मी शासनाने सूट दिल्याचे सांगितल्यावरही कर्मचारी म्हणाले - 'आमच्याकडे तसाच प्रोटोकॉल आहे'.

**प्रशासनाचा दुर्लक्ष?**

या प्रकारांमुळे प्रशासनाची कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. शासनाच्या स्पष्ट आदेश असूनही स्थानिक पातळीवर योग्य अंमलबजावणी होत नसल्याचे स्पष्ट दिसत आहे.

**काय आहे शासनाचा आदेश?**

राज्य शासनाच्या परिपत्रकानुसार, प्रमाणपत्रासाठी लागणाऱ्या प्रतिज्ञापत्रासाठी कोणताही मुद्रांक शुल्क लागू नाही. हे आदेश राज्यभरातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना, तहसीलदारांना आणि विभागीय आयुक्तांना देण्यात आले आहेत.

**जनतेची मागणी**

नागरिकांनी या प्रकारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली असून, संबंधित कार्यालयांवर शिस्तभंगात्मक कारवाई करण्याचे आवाहनही करण्यात येत आहे.



गेल्या ३-४ दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे बीड तालुक्यातील लिंबागणेश पंचक्रोशीतील फुलोऱ्यापासून शेंगा लागण्याच्या अवस्थेत असलेले सोयाबीन, मुग, उडीद आदी पिके पाण्याखाली गेली आहेत. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे पिक वाया जाण्याची भीती आहे.

# आमदार नमिता मुंदडा यांच्या हस्ते मेंढपाळांच्या मेंढ्यासाठी औषधी व लसीचे मोफत वाटप

## मेंढपाळानी मेंढ्यासाठी मोफत औषध,लसीचा लाभ घ्यावा-प्रकाश जाडकर

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१९ ऑगस्ट**

बीड जिल्ह्यात सततचा पाऊस चालू असल्यामुळे बीड जिल्ह्यातील मेंढपाळांच्या मेंढ्यांना साथ रोगांचे आजार होत आहेत. केज मतदार संघाच्या आमदार सौ नमिताताई मुंदडा यांनी महाराष्ट्र शासन पशुसंवर्धन विभागाला तातडीच्या सूचना देऊन मेंढ्यांना रोग प्रतिबंधक लस उपलब्ध करून मेंढपाळांच्या मेंढ्यांना लसीचा डोस पाजून आमदार सौ नमिताताई मुंदडा यांच्या हस्ते कुंबेफळ येथे झाला

यापूर्वी मेंढपाळांना खाजगी रुग्णालयातून औषधी आणून हजार रुपये खर्च करावे लागत होते आता मोफत औषध उपचार व लसी देण्यात येत आहेत याचा लाभ घ्यावा असे आवाहन आमदार नमिता मुंदडा यांनी केले.मेंढपाळ बांधवांनी मोफत औषध उपचार व लसी घ्याव्यात असे आवाहन प्रकाश जाडकर यांनी केले कुंबेफळ येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.यावेळी चंदनसावरगाव पशुधन पर्यवेक्षक डॉ अनिकेत काटुळे , भाजप ओबीसी मोर्चा तालुकाध्यक्ष प्रकाश जाडकर, सुरेश नांदे , गोपाळ मस्के, विष्णू थोरात, रामकृष्ण भंडारे, संदीप थोरात व परिसरातील मेंढपाळ उपस्थित होते.



# पर्यावरण क्षेत्रात काम करु इच्छिणाऱ्या पात्र व्यक्तींनी अर्ज सादर करावेत

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१९ ऑगस्ट**

जिल्हाधिकारी बीड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय येथे दि. १५ जुलै २०२५ रोजी जिल्हा पर्यावरण समिती गठीत करण्याबाबत बैठक घेण्यात आली होती.या बैठकी दरम्यान पर्यावरण मंत्रालय महाराष्ट्र शासन यांच्या १ सप्टेंबर २०१५ च्या आदेशानुसार जिल्हा पर्यावरण समितीमध्ये पर्यावरण क्षेत्रातील २ तज्ज्ञ प्रतिनिधी तसेच पर्यावरण क्षेत्रात काम करणा-या जिल्ह्यातील अशासकीय सेवाभावी संस्थेचे २ प्रतिनिधी नियुक्त करावयाचे आहेत.पर्यावरण क्षेत्रात काम करु इच्छिणा-या पात्र व्यक्तींनी जिल्हाधिकारी बीड या कार्यालयात आवश्यक त्या कागदपत्रासह १५ दिवसाच्या आत अर्ज सादर करावेत, जेणे करुन पात्र व्यक्तींची जिल्हा पर्यावरण समितीमध्ये शासन निर्णयानुसार निवड करुन जिल्हा पर्यावरण समिती गठीत करता येईल, असे उप प्रादेशिक अधिकारी म.प्र. नि. मंडळ जालना तथा समन्वयक बीड जिल्हा पर्यावरण समिती यांनी कळविले आहे.

# पूर्णवादी बँकेची ४१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ;सभासदांना ७% लाभांश घोषित

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१९ ऑगस्ट**

पूर्णवादी नागरिक सहकारी बँकेची ४१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक १७/०८/२०२५ रोजी वृंदावन गार्डन, बीड येथे डॉ.सुभाष काशिनाथराव जोशी यांच्या अध्यक्षते खाली व ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ.अरुणराव निरंतर यांचे मार्गदर्शनात संपन्न झाली. वार्षिक सर्वसाधारण सभेचा प्रारंभ दिप प्रज्वलन व प.पू.डॉ रामचंद्र महाराज पारनेरकर व प.पू.डॉ.विष्णु महाराज पारनेरकर तसेच भारत माता यांच्या प्रतिमा पुजनाने झाला.

सभेच्या नोटीसचे वाचन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश कुलकर्णी यांनी केले.तसेच या प्रसंगी त्यांनी बँकेचा सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा ताळेबंद व नफा तोटा पत्रकाचे सभेसमोर वाचन केले. यानंतर बँकेचे अध्यक्ष डॉ सुभाष जोशी यांनी वार्षिक अहवालाचे वाचन करून बँकेच्या आर्थिक स्थितीचा आढावा सभेसमोर मांडताना सांगितले की, बँकेने ४ दशकाचा कालखंड पार करीत ४१ व्या वर्षात यशस्वी पदार्पण केले असून ३१ मार्च २०२५ अखेर बँकेच्या एकुण ठेवी रू.८९७.१३ कोटी एवढ्या तर कर्जे ५३७.४४ कोटीची असून बँकेचा एकूण व्यवसाय हा रू. १४३४ कोटी झालेला आहे. अहवाल वर्षात बँकेस ८ कोटी ७५ लाख इतका निव्वळ नफा झाला असून या वर्षी सभासदांना ७% लाभांश घोषित केला आहे. नेट एनपीए चे प्रमाण ०.६०% इतके आहे तर बँकेचा CRAR १३.८७ % इतका आहे. बँकेचा पारदर्शक व्यवहार आणि ग्राहक व सभासदांनी बँकेवर दाखवलेला विश्वास यामुळेच बँकेची उत्तरोत्तर प्रगति होत असताना दिसून येते. तसेच त्यांनी आपल्या भाषणात बँकेच्या भविष्यातील वाटचालीबाबत माहिती देताना सांगितले की, बँकेने येत्या आर्थिक वर्षासाठी ठेवीचे उद्दीष्ट रू. १२०० कोटी व कर्जे रू. ८००.०० ठेवले असून भविष्यात बँकेला शेड्यूल्ड दर्जा मिळवून देण्याचा निर्धार केला आहे आणि या उद्देशाने व्यवसाय वृद्धीसाठी मागील वर्षभरात बँकेच्या ११ शाखांमध्ये ग्राहक मेळावे आयोजित केले गेले. या मेळाव्यांमधून ग्राहकांनी व सभासदांनी तसेच नवीन हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवून पूर्णवादी बँकेवरील स्नेह प्रकट केला. सर्व सभासदांना व ग्राहकांना संपर्क करण्यासाठी दिवाळी भेट कार्ड, तसेच पूजनीय विष्णूमहाराज पारनेरकरांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आलेली दिनदर्शिका, विविध कर्ज व ठेवी योजनांची माहिती देणारी पत्रके प्रकाशित करून बँकेची माहिती ग्राहक व सभासदापर्यन्त पोहोचविली.



# दीड वर्षापासून क्लासवन अधिकाऱ्याचा जिल्हा बँकेच्या रेस्ट हाऊसमध्ये बेकायदेशीर मुक्काम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१९ ऑगस्ट**

बीड येथे बदलून आलेले सहकार खात्याचे तालुका उपनिबंधक सहकारी संस्था, बीड या पदावर कार्यरत असलेले अधिकारी श्री.घोडके गेल्या दीड वर्षापासून बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या विश्रामगृहात बेकायदेशीर रितीने मुक्कामाला आहेत. त्यांनी आजच चंबू गबाळ आवरावे आणि अन्य ठिकाणी राहायला जावे. अन्यथा आम्हाला आंदोलन करावे लागेल, असा इशारा जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड.अजित एम. देशमुख यांनी दिला आहे.

बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, बीड ही सातत्याने वादाच्या भोवऱ्यात आहे. जिल्हा बँक शेतकऱ्यांची बँक राहिलेली नसून पुढार्यांची बँक झालेली आहे. त्यामुळे सातत्याने मागणी लावून धरत तेथील संचालक मंडळ अस्तित्वात येऊ दिले नाही. मात्र या ठिकाणी नेमलेले प्रशासकीय अधिकारी देखील कमकुवत ठरत असल्याचे दिसत आहे.

जिल्हा बँकेच्या प्रशासकीय मंडळाला त्या बँकेच्या आवारात गेल्या दीड वर्षापासून बेकायदेशीर रीतीने मुक्काम ठोकणाऱ्या तालुका उपनिबंधक सहकारी संस्था, बीड यांना रोखता येत नाही, ही बाब शरमेची आहे.

दरम्यान, याबाबत ॲड. देशमुख यांनी महाराष्ट्र शासन, सहकार आयुक्त पुणे, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था लातूर, जिल्हाधिकारी बीड, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड, तालुका उपनिबंधक सहकारी संस्था बीड आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा बँक, बीड यांच्यासह इतरांना निवेदन दिले आहे.

एकीकडे दीड वर्षापासून शासनाकडून घर भाडे भत्ता घेणे आणि दीड वर्ष चंबुगबाळ जिल्हा बँकेत ठेवून तेथे राहणे, ही क्लास वन अधिकाऱ्याची असलेली भूमिका शासनाची फसवणूक करणारी असल्यामुळे त्यांच्यावर आणि जिल्हा बँकेतील अधिकारी कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हा नोंदवायची मागणी देखील करण्यात आली आहे.

शासन आणि प्रशासकीय मंडळ, जिल्हा बँक यांना दिलेल्या निवेदनात या अधिकाऱ्यांच्या वेतनातून दिलेला घर भाडे भत्ता व्याजासह वसूल करावा. आपण करत असलेल्या कार्यवाहीची माहिती तात्काळ आम्हास द्यावी अन्यथा आम्हाला आंदोलनाची भूमिका घ्यावी लागेल, असा इशारा देखील देशमुख यांनी दिला आहे.

# श्री सोमेश्वर मंदिरात चौथ्या सोमवारी घेतले शेकडो भाविकांनी दर्शन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१९ ऑगस्ट**

बीड शहरातील नामांकित असलेले श्री सोमेश्वर मंदिर या ठिकाणी श्री भगवान महादेवाचे दिव्य स्वरूपाचे दर्शन सर्व भाविक भक्तांनी यथाशक्ती मानस पूजा करून दर्शन घेतले आणि चौथा सोमवार असल्यामुळे बीड जिल्ह्यातील व बीड शहरातील ग्रामीण भागातील शेकडो भाविक भक्तांनी श्री महादेवाचे दर्शन घेण्यासाठी बीड येथील सोमेश्वर मंदिरा ठिकाणी आले होते प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी अतिशय मोठ्या थाटामाटा मध्ये श्रावण महिना उत्सव हा धार्मिक कार्याचे बाबतीत बीड जिल्ह्यामध्ये सर्वत्र साजरा होताना दिसून येत आहे याच पार्श्वभूमीवर बीड शहरातील सर्वांच्या नवसाला पावणारे व सर्वांच्या इच्छा मनोरात पूर्ण करणारे असे श्रीक्षेत्र सोमेश्वर मंदिर या ठिकाणी श्री महादेवाचे दर्शन घेण्यासाठी बीड शहरातील भाविक भक्ताच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या या ठिकाणी श्री सोमेश्वर मंदिर व श्री महारुद्र फाउंडेशन विश्वस्त यांच्या वतीने अतिशय चौक व्यवस्था या ठिकाणी बाबत भक्तांसाठी करण्यात आली आहे येथे येणाऱ्या बीड जिल्ह्यातील तमाम सर्व भाविक भक्तांचे आभार देखील या मंदिराचे विश्वस्त तथा भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती नवनाथ अण्णा शिराळे पाटील हे मानत आहेत व आपण भविष्यातही आपण देव देश आणि धर्म या साठी सातत्याने या मंदिरामध्ये धार्मिक कार्यक्रम घेत राहु असे आश्वासन देखील सर्व भाविक भक्तांना या ठिकाणी मंदिर विश्वस्तांच्या वतीने देण्यात आले हो कुठलाही अनुचित प्रकार घडणार नाही यासाठी पोलीस बंदोबस्त देखील त्या ठिकाणी मंदिराच्या वतीने ठेवण्यात आला होता व श्रावण महिन्यातील हा शेवटचा चौथा सोमवार अतिशय मोठ्या धुमधडाक्यात उत्साहाच्या वातावरणामध्ये श्री महादेवाचे यथाशक्ती यथा भक्ती पूजन करून दर्शन घेऊन त्या ठिकाणी अनेक भक्ताने फराळ केला व सोमवार या महान व्रताचा या ठिकाणी बसवून जप ओम नमः शिवाय या महामंत्राचा जप करून एक आगळावेगळा परमानंद या भाविक भक्तांना या सोमेश्वर मंदिर परिसरामध्ये श्री भगवान महादेवाच्या सानिध्यामध्ये बसून आला असे सर्व भाविक भक्तांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला.



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# रोटरी दत्तक ग्राम नजीक पांगरी येथील शाळेत संगणक प्रयोगशाळेचे लोकार्पण

## डिजिटल युगात प्रत्येक विद्यार्थी संगणक साक्षर होणे काळाची गरज– सुनील रायठ्ठा

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

रोटरी क्लब ऑफ जालनाने सामाजिक उपक्रमांतर्गत नजीक पांगरी (ता. बदनापूर) हे गाव दत्तक घेतले असून, गावाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध प्रकल्प राबविण्याचा संकल्प केला आहे. हॅपी स्कूल उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नवी संगणक प्रयोगशाळा सुरू करण्यात आली आहे. विनोदराय इंजिनिअरिंगचे व्यवस्थापकीय संचालक तथा ज्येष्ठ रोटरियन सुनील रायठ्ठा यांच्या पुढाकारातून पाच संगणक उपलब्ध करून देण्यात आले असून, सोमवार दि. १८ ऑगस्ट रोजी या प्रयोगशाळेचे लोकार्पण समारंभपूर्वक करण्यात आले. तसेच यावेळी रोटरी कम्युनिटी समूहाची स्थापना करण्यात आली.संगणक प्रयोगशाळेचे उद्घाटन सुनील रायठ्ठा यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी रोटरी क्लबच्या अध्यक्षा सौ. वर्षा पित्ती होत्या. व्यासपीठावर क्लबचे सचिव लक्ष्मीनिवास मल्लावत, ज्येष्ठ रोटरियन अरुण अग्रवाल, प्रकल्प प्रमुख रमेश मगरे, सरपंच–उपसरपंच व मुख्याध्यापक डॉ. शिवाजी उगले उपस्थित होते. उद्घाटनपर भाषणात सुनीलभाई रायठ्ठा म्हणाले की, आजचा काळ हा डिजिटल युगाचा काळ आहे. प्रत्येक व्यवहार, प्रत्येक व्यवसाय, प्रत्येक शिक्षणाची पायरी संगणकाशिवाय अपूर्ण आहे. मुलं संगणक साक्षर झाली नाहीत, तर ती भविष्यातील संधींपासून वंचित राहतील. ग्रामीण भागातील शाळांनाही आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडणे ही काळाची गरज आहे. या प्रयोगशाळेमुळे मुलांना प्रत्यक्ष संगणक हाताळण्याची संधी मिळेल आणि त्यांचा आत्मविश्वास वाढेल. भविष्यातील नोकरीच्या आणि शिक्षणाच्या संधींमध्ये संगणक शिक्षण ही मुलांची खरी ताकद ठरेल. माझी इच्छा आहे की या गावातील प्रत्येक विद्यार्थी संगणक साक्षर व्हावा आणि गाव डिजिटलदृष्ट्या प्रगत व्हावे, असे ते म्हणाले. अध्यक्षीय समारोपात सौ. वर्षा पित्ती म्हणाल्या की, रोटरी क्लबने नजीक पांगरी गाव दत्तक घेऊन येथे भौतिक तसेच शैक्षणिक विकास घडविण्याचा निर्धार केला आहे. शाळेला 'हॅपी स्कूल' बनविण्याचा संकल्प असून, त्याचाच भाग म्हणून संगणक प्रयोगशाळेची स्थापना करण्यात आली आहे. पुढील बैठकीत गावाच्या समस्या आणि विकासाच्या गरजांवर चर्चा करून रोटरी क्लब त्यावर ठोस पावले उचलणार उचलणार असल्याने समस्या आणि आवश्यक सुविधांची यादी सरपंच, उपसरपंचांनी आमच्याकडे द्यावी, असे त्या म्हणाल्या. मुख्याध्यापक डॉ. शिवाजी उगले म्हणाले की, संगणक प्रयोगशाळेमुळे आमच्या विद्यार्थ्यांना डिजिटल जगात पाऊल ठेवणे सोपे होईल. या सुविधेमुळे मुलांचा सर्वांगीण शैक्षणिक विकास होणार असून, आम्ही



रोटरी क्लबचे मन:पूर्वक आभारी आहोत. या कार्यक्रमाला रोटरी परिवारातील अकलंक मिश्रीकोटकर, सुनीती मदान, सुरेश मगरे, किशोर देशपांडे, डॉ. दीपक बगडिया, रवी भक्कड, अर्चना देशपांडे, प्रशांत महाजन यांच्यासह गावातील मान्यवर, नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संक्षिप्त

## जालना प्रोफेशनल इनलाइन स्केटिंग स्पर्धेचा इंटरनॅशनल रेकॉर्ड!



तभा वृत्तसेवा
मंठा / प्रतिनिधी

मंठा शहराचे मा.नगराध्यक्ष तथा भाजपा तालुकाध्यक्ष नितीन राठोड यांचे चि. जयवर्धन नितीन राठोड याने स्थापित केला जालना प्रोफेशनल इनलाइन स्केटिंग स्पर्धेचा इंटरनॅशनल रेकॉर्ड..!!

जालना स्केटिंग असोसिएशनने ३ ऑगस्ट २०२५ रोजी महाराष्ट्रातील जालना येथून प्रोफेशनल इनलाइन स्केटिंग स्पर्धा आयोजित करण्यात आली होती, या स्पर्धेत प्रत्येकी ९ विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या ठिकाणांपासून सुरुवात करून इनलाइन स्केटिंगवर ११ किमी अंतर कापले आणि आंतरराष्ट्रीय रेकॉर्ड बुकमध्ये एक नवीन विश्वविक्रम प्रस्थापित केला या नवीन विक्रमाबद्द्ल चि. जयवर्धन नितीन राठोड याचे सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन करण्यात येत आहे.

## क्रेशर मधुन चोरीस गेलेला हायवा ५ तासात ताब्यात परतूर पोलिसांची कार्यवाही



तभा वृत्तसेवा
परतुर/प्रतिनिधी

मौजे लावणी ता. परतुर जि. जालना येथील गजानन स्टोन क्रेशर लावणी येथे टाटा कंपनीचा हायवा कामासाठी लावण्यात आलेला होता. सदरचा दिनांक १६/०८/२०२५ रोजी मध्यरात्री कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेलेला होता. त्यावरुन पोलीस ठाणे परतुर गुरनं ४१५/२०२५ कलम ३०३(२) भा.न्या. संहि प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदरचा गुन्हा उघड मा.पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल यांनी सुचना देऊन आदेशीत केलेले होते. त्यावरुन पोलीस निरीक्षक एस. वी. भागवत यांनी पोलीस ठाणे परतुर येथील अधिकारी अंमलदार सदरचा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी एक तपास पथक नेमलेले आहे. त्यावरुन दिनांक १७/०८/२०२५ रोजी पोलीस निरीक्षक भागवत यांना माहिती मिळाली की, सदरचा चोरीस गेलेला हायवा धारुर केज मार्गे जाणार आहे अशी खात्रीशीर माहिती बातमीदारामार्फत मिळाली होती. त्यावरुन भागवत गुन्हा उघकडीस आणण्यासाठी तात्काळ पथक रवाना केलेले होते. पथकातील अधिकारी अंमलदार यांनी धारुर केज मार्गे जाणाऱ्या रोडवर हायवाचा पाठलाग करीत असतांना सदरचा हायवा हा चोरट्यांनी सुयश हिंदुस्तान पेट्रोल पंप केज जि. बीड येथे सोडुन पळुन गेलेले आहेत. सदर चोरीस गेलेला हायवा किंमती ४०,००,०००/– रुपयांचा जप्त करण्यात आलेला असुन चोरुन नेलेल्या चोरट्यांचा शोध चालू आहे. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक अजयकुमार बसंल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी आर. टी. रेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे परतुरचे पोलीस निरीक्षक श्री. एस. बी. भागवत, पोउपनि अमोल रावते, अंमलदार दिपक आहे, अच्युत चव्हाण, नरेंद्र चव्हाण, प्रशांत काळे आय. टी. सेल सागर बाविस्कर व पोलीस ठाणे केज येथील उमेश निकम यांनी केलेली आहे,

## शासकीय वसतिगृहासाठी इमारत भाड्याने पाहिजे

जालना (जिमाका) :– जालना शहरात आदिवासी मुलींचे वसतिगृह सुरु करावयाचे आहे. तरी शहरात मध्यवर्ती भागात मुबलक पाणी, विज, स्नानगृह, शौचालय सर्व सोयी सुविधांनीयुक्त इमारत अंदाजे ६ ते ७ हजार स्वेअर फुट भाडे तत्वावर घेणे आहे. तरी इमारत मालकांनी गृहपाल, आदिवासी शासकीय वसतिगृह, संजयनगर, जालना यांच्याकडे किंवा अधिक माहितीसाठी मो.९५४५४९५११८ या संपर्क साधावा. असे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## व्यवसाय मार्गदर्शनासाठी मोफत कॉल सेंटर

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

महाराष्ट्रात उद्योग उभारणीसाठी लागणारे सहाय्य करण्यासाठी तसेच जिल्ह्यातील उद्योजक संघटना, नवउद्योजकांना व्यवसायाशी निगडीत मार्गदर्शनासह शासनाकडून मिळणाऱ्या विविध सवलती जाणून घेण्यासाठी कॉल सेंटर सुरु करण्यात आले आहे. तरी आपल्या शंकांचे निरसन करण्यासाठी १८००२३३२०३३, ०२२२२६२२३२२, ०२२२२६२२३६१ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# आ. अर्जुनराव खोतकर मनपा आयुक्त खांडेकर शहरप्रमुख विष्णू पाचफुले यांनी पावसामुळे साचलेल्या पाण्यातून प्रवास करत नुकसानीचा घेतला आढावा!!

### शहरातील कोठारी नगरातील परिस्थितीची आ. अर्जुनराव खोतकररांच्या मनपाला तिर्व शब्दात पाण्याचा निचरा करण्याच्या सूचना!

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

आ. अर्जुनराव खोतकर जालना महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर शिवसेना शहरप्रमुख विष्णू भाऊ पाचफुले यांनी पावसामुळे साचलेल्या गुडघाभर पाण्यातून प्रवास करत पाहणी केली व झालेल्या नुकसानीचा आढावा घेतला. शिवसेनेचे विभाग प्रमुख मनोज लाखोले यांनी आ. अर्जुनराव खोतकर यांच्याकडे फोनद्वारे संपर्क साधला असताना आ. अर्जुनराव खोतकर यांनी कोठारी नगर येथे पाहणीसाठी दाखल झाले आहे. मुसळधार पावसामुळे जालना शहरातील कोठारी नगर भागात गुडघाभर पाणी साचले आहे. अनेक नागरीकांच्या घरात पाणी घुसले होते यामुळे तेथील स्थानिक नागरिकांची तारांबळ उडाली व जनजिवन विस्कळीत होऊन नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. घरात पाणी शिरल्याने संसारोपयोगी साहित्याचेही नुकसान झाले आहे. या परिस्थितीची आ. अर्जुनराव खोतकर यांनी महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर शिवसेना शहर प्रमुखविष्णू पाचफुले यांना सोबत घेऊन पाहणी केली व महापालिकेला त्यांनी तत्काळ उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या आहेत. व येथिल रहीवाशियाना धिर दिला. यावेळी दिनकर घेवंदे, मनोज



लाखोले, उपासे सर, मोरे साहेब, संतोष शहागडकर, गजू हिवाळे, दीपक वैद्य, अभिषेक काबली, शिवसिंग तिलवारे, ऋषिकेश शहागडकर, निखिल गाडे, आकाश जगताप, अजित खेडकर, जावळे साहेब, गोपाल काका काबलिये, सुमित शर्मा, लड्डा साप, सुनील चांडक, शहाणे साहेब, राजु हिवाळे, निहयल साहेब, आदींची उपस्थिती होती.

तसेच आ. अर्जुनराव खोतकर आयुक्त खांडेकर शहरप्रमुख विष्णू पाचफुले यांनी मोंढा परिसरात घेतला आढावा कोठारी नगर भागात मोंढा भागातून येणारे पाणी येत असून मोंढा भागात आ. अर्जुनराव खोतकर आयुक्त खांडेकर शिवसेना शहरप्रमुख पाचफुले यांनी आढावा घेतला आहे महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांना पाणी कोठारी नगर कडे येणार पाणी बंद करण्याचे आदेश आ. अर्जुनराव खोतकर यांनी महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांना दिले आहे आ. अर्जुनराव खोतकर शिवसेना शहर प्रमुख विष्णू पाचफुले यांनी स्वत: उभे राहून जालना शहरातील विविध प्रभागातील पुरपरिस्थिची पाहणी करीत स्वत: उभे राहत प्रशासनाला धारेवर धरत तात्काळ पुरपरिस्थीतुन शहरवासियांना मुक्त करण्यासाठी न मनपा आयुक्त व कर्मचाऱ्यांना सुचना दिल्या आहेत.

# नालीचे बांधकाम बुजवल्याने पावसाची पाणी रस्त्यावर

### महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसह दुकानदार, नागरिकांना होतोय त्रास निवेदनकर्त्यांचा रस्ता रोको चा इशारा

तभा वृत्तसेवा
मंठा प्रतिनिधी

मंठा जालना राष्ट्रीय महामार्ग ७५२ वरील रस्त्यालगत असलेल्या नाल्या बुजवण्यात आल्याने नाल्याचे पाणी रस्त्यावर साचत असल्याने स्वामी विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना व परिसरातील व्यवसायिकांसह नागरिकांना रहदारी करताना तारेवरची कसरत करावी लागत असल्याने रस्त्यावरील पाण्याचे नियोजन तात्काळ करावे अन्यथा (ता. २०) बुधवार रोजी रस्ता रोको करण्याचा इशारा परिसरातील नागरिकांनी मा. तहसीलदार यांना निवेदनाद्वारे दिला आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की, रोडच्या बाजुने पक्या नाल्याचे बांधकाम झालेले आहे. पण सदरील नाल्यामध्ये रोड चे पाणी पुर्ण जात नाही ते पाणी रोडवरच साचत आहे. रोडवर स्वामी विवेकांनद वरिष्ठ महाविद्यालय आहे. त्यामुळे सदरील मुला व मुलीना कॉलेजला जाण्यासाठी फार त्रास होत आहे. व त्या लगत असणारे बैंक, ग्राहाक सेवा केंद्र, हाडर्वअर चे दुकाने, हॉटले, पेट्रोलपंप, व जीवन अवश्यक असणारे दुकाने आहे.त्यामुळे सदरील पाण्यामुळे नागरीकाना खुप त्रास सहन करावा लागत आहे. परिसरातील नागरिकांनी रोड कामाचे कॉन्ट्रॅक्टर आर. बी. घोडके यांना विचारणा केली असता त्यांनी हे काम आमच्या अंतर्गत येत नाल्याचे सांगितले आहे.त्या मुळे शासनाने रस्त्यावरील पाण्याचा तात्काळ बंदोबस्त करावा अन्यथा ता.२० रोजी रस्ता रोखों आंदोलन करणार असल्याचे निवेदनात म्हंटले आहे. निवेदनावर गोपाळराव बोराडे, राजंन बोराडे, शुभम



बोराडे, संतीष देशमुख, अशिष मोरे, गणेश गायकवाड, कृष्णा हेलसकर, नाना देवणे, आर्थव मोरे, सुभाष बोराडे, यांच्या सह्या केलेल्या आहेत.

# जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी





तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

जिल्ह्यात पोळा, गणेशमुर्ती स्थापना या सण, उत्सव आणि इतर आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये जालना जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत दि.२८ ऑगस्ट २०२५ पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी करण्यात आली आहे, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी गणेश महाडिक यांनी जारी केले आहेत. संपूर्ण जालना जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश दि. १५ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजेपासून ते दि. २८ ऑगस्ट २०२५ रोजीच्या २४ वाजेपर्यंत लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत बाळगता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अधिकारी – कर्मचाऱ्यांना तसेच उपविभागातील पोलिस अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूका, सभा, मोर्चा यांना लागू राहणार नाही, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# ओंकारेश्वर ते गौरीशंकर महादेव मंदिर शिवस्वरूप जनार्दन स्वामी पायी कावड यात्रा २० ऑगस्ट रोजी जाफराबादेत दाखल होणार

### जालना जिल्ह्यातील सर्वात मोठी ३११ किलोमीटर एकमेव कावड यात्रा

तभा वृत्तसेवा
जाफराबाद /प्रतिनिधी

शिवस्वरूप जनार्दन स्वामी महाराज, परम पूज्यनीय माधवगिरीजी बाबा यांच्या कृपाशीर्वादाने व परम पूज्यनीय महेशगिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने आशीर्वादाने शिवस्वरूप जनार्दन स्वामी महाराज कावड यात्रा मध्यप्रदेश येथील ओंकारेश्वर महादेवाचे दर्शन व नर्मदा मातेचे पवित्र जल घेऊन दिनांक १० ऑगस्ट २०२५ रोजी ओंकारेश्वर येथून निघाली असून ही कावड यात्रा दिनांक २० ऑगस्ट २०२५ रोजी वार बुधवार ला जाफराबाद शहरातील अहिल्यादेवी होळकर चौक येथे आगमन होणार असून या कावड यात्रेकरूंचे जाफराबाद शहरात सकल हिंदू बांधवांच्या वतीने व संत जनार्दन स्वामी महाराज यांच्या भक्त परिवाराकडून भव्य मिरवणूक काढून



स्वागत करण्यात येणार आहे. ही पायी कावड यात्रा एकूण ३११ किलोमीटर असून जालना जिल्ह्यातील सर्वात मोठी कावड यात्रा आहे. या कावड यात्रेत जाफराबाद तालुक्यातील संत जनार्दन स्वामी भक्त परिवाराचे साहेबराव अंभोरे, विशाल दांडगे, नारायण पोटे, रमेश वाघमारे, राहुल पवार, दगडूबा शेळके यांचा सहभाग आहे. तरी या कावड यात्रेकरूंच्या स्वागतासाठी सकल हिंदू बांधवांनी उपस्थित रहावे असे आवाहन जय जनार्दन भक्त परिवार जाफराबाद तालुक्याच्या वतीने करण्यात आले आहे.

# स्थागुशाखेच्या छाप्यात मादक पदार्थ विकणारा राजेश जयस्वाल जेरबंद

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

रामनगर येथे २३,०००/– रु. किंमतीचे ९२८ ग्रॅम गांजासह एक आरोपी जेरबंद, स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई मा. पोलीस अधीक्षक, सो. जालना यांनी अवैध धंद्याविरुध्द कारवाई करणे बाबत दिलेल्या सुचना व आदेशाप्रमाणे दिनांक १८/०८/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार माहिती घेत असतांना, योगेश उबाळे, सहायक पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा जालना यांना गुप्त बातमीदारमार्फत इसम नामे राजेश शांतीलाल जैस्वाल वय ३८ वर्ष रा. रामनगर ता. जि. जालना हा स्वत: च्या फायद्यासाठी मानवी आरोग्यास अपायकारक असलेला मादक पदार्थ गांजा अवैधपणे ताब्यात बाळगुन त्याची चोरटी विक्री करीत असल्याची माहिती प्राप्त झाली होती.

दिनांक १८/०८/२०२५ रोजी १९:०० वाजता स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शासकीय पंचासमक्ष रामनगर येथे छापा कारवाई करुन राजेश शांतीलाल जैस्वाल वय ३८ वर्ष रा. रामनगर ता.जि. जालना याचे घरातुन एकुण २३,०००/–रुपये किंमतीचा ९२८ ग्रॅम मादक पदार्थ गांजा जप्त करण्यात आला आहे. संभाजी तनपुरे यांचे तक्रारी वरुन नमुद इसमाविरुध्द पोलीस ठाणे मौजपुरी येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर ची कारवाई अजय कुमार बंसल पोलीस अधीक्षक, जालना, आयुष नोपाणी, अपर पोलीस अधीक्षक, जालना अनंत कुलकर्णी उप विभागीय पोलीस अधिकारी जालना यांचे मार्गदर्शनाखाली पंकज जाधव पोलीस निरीक्षक स्था. गु. शा. जालना, सपोनि. योगेश उबाळे, सपोनि. सचीन खामगळ, पोलीस अंमलदार जगदीश



बावणे, कैलास खार्डे, रुस्तुम जैवाळ, रमेश राठोड, प्रशांत लोखंडे, किशोर पुंगळे, वाहन चालक पोकॉ/१५३० कडुळे यांनी केली आहे.

# आतापर्यंत ५६ हजार ८०६ हेक्टर शेती पिकांचे नुकसान- जिल्हाधिकारी

## गंगापूर येथे पुरात अडकलेल्या आठ जणांना काढले बाहेर



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ ऑगस्ट**

मागील तीन दिवसांपासून हिंगोली जिल्ह्यात पावसाने थैमान घातले असून या पावसामुळे जिरायत शेतीसह फळबागा तसेच बागायती शेती असे एकूण ५६ हजार ८०६ हेक्टरमधील शेती पिकांचे अतिवृष्टीमुळे नुकसान झाले असून अजूनही महसूल विभागांच्या पथकाकडून पंचनामे सुरूच आहेत. कळमनुरी तालुक्यातील गंगापूर येथील आठ जणांना हिंगोली नगर परिषद व बचाव पथक तसेच स्थानिक शोध व बचाव पथकामार्फत सुखरूप बाहेर काढण्यात आले आहे. जिल्हा प्रशासन संपूर्ण पूर परिस्थितीवर करडी नजर ठेवून असून उपाययोजना करण्यात येत असल्याची माहीती जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हिंगोली जिल्ह्यात मागील तीन दिवसांपासून अतिवृष्टी सदृश पात्रस सुरू असून आपत्ती व्यवस्थापन विभाग संपुर्ण परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. या पावसामुळे शेती पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. जिल्ह्यातील ३० मंडळापैकी २४ मंडळामध्ये अतिवृष्टी झाली आहे. ऑगस्ट महिन्यात २७३.७ मिमी पावसाची नोंद झाली आहे. या पावसामुळे सेनगाव तालुक्यातील घोडदरी शिवारात नाल्यात वाहून मृत्यू झाला तर हिंगोली तालुक्यातील पारोळा येथील धबधबा तलावात पोहण्यासाठी गेलेल्या एका तरूणाचा मृत्यू झाला आहे. कळमनुरी तालुक्यातील गंगापूर येथील शेताच्या आखाड्यावर आठ व्यक्ती अडकून पडल्याची माहीती प्रशासनाला मिळाल्यानंतर तत्काळ हिंगोली नगर परिषदेचे पथक, बचाव पथक तसेच स्थानिक शोध व बचाव पथकांनी त्यांना सुरक्षित बाहेर काढले आहे.

अतिवृष्टीमुळे औंढा ते दरेगाव, आसोला ते बेरगेवाडी, रांजना ते वडद, येळेगाव ते निशाना हे पूल बाधित झाले आहेत.

जिल्ह्यातील तीनही धरणे १०० टक्के भरली असून सध्या येलदरी धरणातून ३२ हजार १८० क्युसेस, सिध्देश्वर धरणातून ६० हजार ९३५ क्युसेस, इसापूर धरणातून ७४ हजार २८४ क्युसेस पाण्याचा विसर्ग करण्यात येत असून नदी काठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. या पावसामुळे २४५ गावे बाधित झाली आहेत. ३४ जनावरे दगावली आहेत. सर्वात जास्त नुकसान सेनगाव तालुक्यात ४७ हजार ८३९ हेकटर शेती पिकांचे झाले आहे. दरम्यान प्रशासन सर्व पुरस्थितीवर लक्ष ठेवून असून



नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कंत्राटदारांची धरणे आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ ऑगस्ट**

शासनाकडून मागील आठ महिन्यांपासून विविध योजनेच्या विकास कामांचे देयके अदा करण्यास निधी दिला नाही. आता देयके नाही तर कामही नाही असे फलक घेऊन कंत्राटदारांनी मंगळवार दि १९ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करीत जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांना निवेदन सादर केले.

यापूर्वीही कंत्राटदारांनी देयके मिळण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करीत मागण्यांचे निवेदन सादर केले होते परंतु राज्य शासन दखल घेत नसल्यामुळे कंत्राटदार संघटनेच्यावतीने येथील मुख्य रस्त्यावरून मोर्चा काढीत घोषणाबाजी करण्यात आली. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. राज्य शासनाकडून मागील आठ महिन्यांपासून विविध योजनांच्या कामासाठी निधी देण्यात आलेला नाही. यामध्ये प्रामुख्याने जल जीवन मिशन, सार्वजनिक बांधकाम विभाग, पर्यटन विभाग, समाज कल्याण विभागाच्या कामांचा समावेश आहे. यामध्ये कंत्राटदारांनी अनेक कामे काही प्रमाणात पूर्ण केली आहेत. मात्र अद्यापही त्यांचे देयके अदा करण्यात आली नाहीत. शासनाकडून निधीच उपलब्ध नसल्याचे सांगितले जात आहे. एकीकडे शासनाकडून कामांना उशिर झाल्यास दंड आकारल्या जातो मात्र आता शासनाकडूनच निधी नसल्यामुळे रखडलेल्या कामांना कोण जबाबदार असा सवाल यावेळी कंत्राटदारांनी केला.

देयके मिळाली नसल्यामुळे कंत्राटदार आर्थिक अडचणीत सापडले असून एक कंत्राटदाराने आर्थिक अडचणीमुळे आत्महत्या केली आहे. आता शासनाला निधी देण्यासाठी किती आत्महत्या हव्या आहेत असा सवालही यावेळी उपस्थित करण्यात आला. दुसरीकडे शासनाकडून कामे पूर्ण करण्यासाठी नोटीस देऊन कंत्राटदारांचे मानसिक खच्चीकरण केले जात आहे. शासनाने रखडलेली देयके तत्काळ अदा करावी अन्यथा कामे केली जाणार नाहीत असा इशारा संघटनेने दिला आहे. निवेदनावर कंत्राटदारांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# हिंगोलीतील नारायणा ई टेक्नो शाळेला शिक्षण विभागाने ठोकले टाळे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ ऑगस्ट**



नारायणा ई टेक्नो शाळेला ईरादा पत्र प्राप्त होते परंतु शासनाची मान्यता नव्हती. शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर शाळा चालविणे अपेक्षीत होते परंतु यासाठी ४ जुलै २०२५ रोजी गटविकास अधिकाऱ्यांनी बोर्ड लावून अनधिकृत शाळा असल्याचे तसेच शाळेला लेखी पत्राद्वारे कळविले होते. मात्र संबंधित शाळेने मान्यता प्राप्त करून न घेता शाळा सुरू केली. त्यामुळे पुन्हा एकदा शिक्षण विभागाच्यावतीने या शाळेला शिक्षणाधिकारी प्रशांत दिग्रसकर यांनी टाळे ठोकले असून यानंतरही शाळा सुरू ठेवल्यास फौजदारी गुन्हा दाखल करण्याचा इशारा दिला आहे.

दि १९ ऑगस्ट रोजी येथील नारायणा ई टेक्नो शाळेवर शिक्षणाधिकारी प्रशांत दिग्रसकर यांच्यासह शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी गेले. त्यांनी या शाळेला टाळे ठोकले आहे. यावेळी शिक्षणाधिकारी प्रशांत दिग्रसकर यांनी सांगितले की, शाळेला वारंवार शासनाची मान्यता घेण्यासाठी सांगण्यात आले तसेच दंडही आकारण्यात आला परंतु शाळा प्रवेश आणि शाळा सुरूच असल्याची माहीती शिक्षण विभागाला मिळाली. शासनाची मान्यता नसल्यामुळे सदरील शाळा अनधिकृत असल्याचा फलकही लावण्यात आला होता. परंतु काही पालकांची दिशाभूल करून शाळा प्रवेश करण्यात आले. वारंवार शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करण्यात आले. पोलिस ठाण्यातही तक्रार करण्यात आली होती. अखेर मंगळवारी शाळेला कुलूप ठोकले असून या शाळेत ज्या पालकांच्या पाल्यांनी प्रवेश घेतला आहे. पालकांनी इतर शाळेत प्रवेश मागितल्यास त्यांना त्या शाळेत प्रवेश शिक्षण विभाग विद्यार्थ्यांचे समायोजन करणार असून विद्यार्थ्यांचे कोणतेही शैक्षणिक नुकसान होणार नाही अशी ग्वाही दिग्रसकर यांनी दिली.



**हिंगोली- स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून माजी नगरसेवक गोपाल दुबे, घनश्याम तापडीया, अ‍ॅड गयबाराव नाईक, अशोक सारडा, केशव दुबे, आशिष काबरा, रवी चौरसिया आदींनी शहरातील विविध प्रभागातील गरजु मुलींना मोफत सायकलींचे वाटप केले. छाया- सुनील पाठक**

# शासकीय सेवेत समायोजनासाठी राष्ट्रीय आरोग्य कंत्राटी कर्मचाऱ्यांचे कामबंद आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली १९ ऑगस्ट**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याच्या मागणीसाठी मंगळवार दि १९ ऑगस्ट पासून कामबंद आंदोलन पुकारले असून या आंदोलनामुळे आरोग्य सेवेवर मोठा परिणाम होणार असल्याचे दिसत आहे. शासनाने राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत काम करणाऱ्या कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांना दि १४ मार्च २०२४ रोजी शासन निर्णयानुसार नियमित सेवेत समावेशन करण्याचा जीआर काढला परंतु सव्वावर्ष उलटूनही अद्याप अंमलबजावणी न झाल्यामुळे येत्या १९ ऑगस्ट पासून सर्व कंत्राटी कर्मचारी बेमुदत कामबंद आंदोलन करणार असल्याचा इशारा संघटनेच्यावतीने देण्यात आला होता. शासन निर्णयानंतरही राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत काम करणाऱ्या कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांना अद्याप नियमित सेवेत समावेशन करण्यात आले नाही. मागील दहा ते पंधरा वर्षापासून कंत्राटी कर्मचारी समावेशन होईल या आशेवर काम करीत आहेत. उत्कृष्ट आरोग्य सेवा देत आहेत. परंतु त्यांच्या मागणीची दखल शासन घेत नसल्यामुळे या कर्मचाऱ्यांना आंदोलनाचे हत्यार उपसावे लागत आहे. तत्काळ शासनाने कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत समावेशन करावे अन्यथा १९ ऑगस्टपासून ऑनलाईन व ऑफलाईन स्वरूपाची सर्व प्रकारची कामे बंद करण्यात आले आहेत.

निवेदनावर एस आर गारूडी, पी एस गिरी, एन ए बुर्से, एस एस करेवार, बी आर घ्यार, दिपक पवार, पी व्ही बेले, पी एल कुलकर्णी, बालाजी उबाळे, डॉ शारदा मेश्राम, जी व्ही आघाव, एन डी वाघमारे, शेख मुनाफ, जी बी बोंगाणे, गणेश ठोके, राहुल मोरे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. राष्ट्रीय आरोग्य अभियान कर्मचाऱ्यांच्या या आंदोलनामुळे जिल्ह्यातील आरोग्य सेवचे कामकाज ठप्प पडणार असल्याचे दिसत आहे.

# हिंगोलीतील पारोळा धबधब्यावर पर्यटकांना बंदी

**तभा वृत्तसेवा**
**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ ऑगस्ट**



जिल्ह्यातील प्रसिद्ध पर्यटन स्थळ असलेल्या पारोळा येथील धबधबा परिसरात पर्यटकांना बंदी घालण्यात आली आहे. १८ ऑगस्ट रोजी एका तरुणाचा बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडल्यामुळे प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. विभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी कार्यालयाने या परिसराला प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित केले आहे.

मागील काही वर्षांपासून पारोळा येथील नैसर्गिक धबधबा पावसाळ्यात पर्यटकांना आकर्षित करत होता. मात्र, अनेकदा सुरक्षेची पर्वा न करता पर्यटक खोल पाण्यात उतरतात, ज्यामुळे अशा दुर्दैवी घटना घडतात. याच पार्श्वभूमीवर प्रशासनाने तातडीने कठोर पावले उचलली आहेत.

ही दुर्घटना टाळता यावी आणि भविष्यात असा अनुचित प्रकार पुन्हा घडू नये यासाठी प्रशासनाने कडक पाऊल उचलले आहे. धबधबा परिसराच्या प्रवेशद्वारावरच कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पोलीस अंमलदार शंकर इडोळे यांच्या नेतृत्वाखाली नागनाथ वामन, गोरख कोरडे आणि शेख रफिक हे कर्मचारी येथे बंदोबस्त सांभाळत आहेत.

यावेळी पारोळा गावचे सरपंच विठ्ठलराव दहातोंडे, रामकिसन दहातोंडे, सुभाष गायकवाड, लक्ष्मण दहातोंडे, पोलीस पाटील रामेश्वर पांचाळ आणि ज्ञानेश्वर दहातोंडे यांच्यासह अनेक ग्रामस्थ प्रशासनाला सहकार्य करत आहेत. त्यांनी स्वतःहून पुढाकार घेत या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांना थांबवून परत पाठवण्यास मदत केली.

या निर्णयामुळे पर्यटकांचा हिरमोड झाला असला तरी, मानवी जीवनाची सुरक्षितता जपण्यासाठी हे पाऊल उचलणे अत्यावश्यक असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. या दुर्दैवी घटनेने गावभर शोककळा पसरली असून, प्रशासनाच्या या निर्णयामुळे भविष्यात अशा घटना टाळता येतील अशी आशा व्यक्त केली जात आहे. प्रशासनाने धबधब्याच्या धोकादायक ठिकाणी सुरक्षेच्या सूचना फलक लावून लोकांना सावध राहण्याचे आवाहन केले आहे.

# हिंगोलीत छायाचित्र दिन उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ ऑगस्ट**

जागतिक छायाचित्र दिनानिमित्त हिंगोलीत जिल्हा फोटोग्राफर संघटना व जिल्हा प्रेस फोटोग्राफर संघटनेच्या वतीने एक विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम शासकीय विश्रामगृह येथे पार पडला. छायाचित्रण क्षेत्रातील कार्याची दखल घेत, या दिवशी अनेक फोटोग्राफर मंडळी एकत्र येत आपले अनुभव, आव्हाने व यशोगाथा शेअर करत एकत्रितपणे हा दिवस साजरा करतात.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संघटनेचे अध्यक्ष सुनिल पाठक यांनी भूषवले, तर प्रमुख उपस्थिती जिल्हा प्रेस फोटोग्राफर संघटनेचे अध्यक्ष गजानन थोरात, संघटनेचे सचिव संदीप बोरकर यांनी घेतली. यांच्यासह इतर अनेक पदाधिकारी आणि छायाचित्रकार उपस्थित होते.

यावेळी विजय गुंडेकर, सुनिल प्रधान, निलेश गरवारे, सचिन जैन, आकाश रोकडे, सोपान लोंढे, सचिन भोरे, विनायक डांगे, राम कुचले, शरद पारोकर, अरुण विपणे, सुधाकर वाढवे, राजू गवळी, सुनिल सामय, पल्लवी अटल कार्यक्रमात छायाचित्रकारांच्या समस्या, व्यवसायातील बदल, डिजिटल युगातील आव्हाने तसेच नवोदित फोटोग्राफरसाठी मार्गदर्शन यावर चर्चा करण्यात आली. छायाचित्रणाच्या माध्यमातून समाजमनाला जागृत करणाऱ्या या क्षेत्राचे महत्व अधोरेखित करण्यात आले. कार्यक्रमाचे संयोजन व नियोजन संघटनेच्या कार्यकर्त्यांनी कौशल्याने पार पाडले. शेवटी सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत सामूहिक फोटोसेशन घेण्यात आले आणि कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला

# स्वच्छतेसह मुलभूत सुविधा पुरविण्याची व्यापारी महासंघाची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ ऑगस्ट**



इंदिरा चौक व जुनी न.प. शॉपिंग कॉम्प्लेक्स नगर परिषद हिंगोली येथील सर्व व्यापारी, नियमितपणे मासिक/वार्षिक भाडे भरत असतो. मात्र, अत्यंत खेदाने आपणास कळवावे लागत आहे की या कॉम्प्लेक्समध्ये व्यापारी व ग्राहकांसाठी मूलभूत सुविधांचा पूर्णपणे अभाव असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.कॉम्प्लेक्स परिसरातील सध्याची परिस्थितीत स्वच्छतेची अवस्था अत्यंत दयनीय आहे. शौचालय व मूत्रालयाची सुविधा उपलब्ध नाही. संपूर्ण परिसर कचरा टाकण्याचे ठिकाण झाल्यामुळे दुर्गंधी व घाण सर्वत्र पसरलेली आहे. या परिस्थितीमुळे व्यापारी तसेच ग्राहक दोघांनाही प्रचंड गैरसोय होत आहे. आम्ही सर्व व्यापारी वेळेवर भाडे भरतो, त्यामुळे नगर परिषदेकडून आमच्या अपेक्षा आहेत की परिसरातील स्वच्छतेकडे तात्काळ लक्ष द्यावे शौचालय व मूत्रालयाची सुविधा उपलब्ध करून द्यावी. नियमित साफसफाई व कचरा व्यवस्थापनाची योग्य व्यवस्था करावी सध्या पावसाळ्याचा हंगाम सुरू असल्याने घाण व कचऱ्यामुळे संसर्गजन्य रोग पसरण्याचा गंभीर धोका आहे. त्यामुळे या बाबतीत तात्काळ कार्यवाही होणे अत्यावश्यक आहे असेही निवेदनात नमूद असुन सदरचे निवेदन न.प. अभियंता प्रतिक नाईक यांचे कडे सुपुर्द करण्यात आले.निवेदनावर अनिल नैनवाणी, नंदकिशोर तोष्णीवाल, सुमित चौधरीसह अनेक व्यापारी, व्यवसायिक यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# जश्ने ईद मिलादुन्नबीनिमित्त आरोग्य शिबीराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ ऑगस्ट**

दरवर्षी प्रमाणे जश्न ईद- मिलादुन्नबी निमित्त आरोग्य शिबीर, मिलादे, मुस्तफा जुलुसे-ए-मोहम्मदी च्या कार्यक्रमाचे आयोजन मिलादे मुस्तफा कान्फरेस प्रवचन मौलाना मुफ्ती फक्करोद्दीन हाशमती मुंबई महाराष्ट्र मुंबई यांचे (बयाण) तसेच दि.०३/०९/२०२५ रोज बुधवार धार्मिक प्रवचन गोदावरील हॉटेजवजळ संध्याकाळभ् ०५ ते १० वाजपर्यंत करण्याचे आयोजन केले आहे. तसेच गोदावरील हॉटेल जवळ रजा मैदान येथे आरोग्य शिबिर दि.०५/०९/२०२५ रोज शुक्रवार सकाळी ११:०० ते ५०० वाजपर्यंत मान्यवर यांच्या उपस्थीतीत आरोगय शिबिर घेण्यात येईल. तसेच ईद -ए-मिलादुन्नबी जुलुस ए मोहमदी (रॅलीचे) आयोजन दि. ११/०९/२०२५ गुरूवार रोजी करण्यात आले आहे. रॅली सकाळी ०९:०० वा इंदिरा चौक - मेहराज चौक- गोदावरी हॉटेल- पोळा मारोती रोड-जिल्हा परिषद प्रशाला- मंगळवारा रोड, तलाब कट्टा- कपडा गल्ली- हरण चौक- बुरूड गल्ली- गांधी- चौक-डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक-जुना सरकारी दवाखाना- मोंढा पलटन मागे- इंदिरा चौक येथुन दारू उलुम सिर ए-हक रजा ए मुस्तफा मदरसा जुना औंढा नाका येथे समारोप होणर आहे. तसेच सर्व भाविकासाठी जेवणाचा कार्यक्रम आयोजीत केला आहे. तरी सदरील कार्यक्रमाला जास्तीत जास्त उपस्थीत राहण्याचे आवाहन ईद-ए-मिलादुन्नबी समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# मुखेडमध्ये मृत्यूतांडव; प्रशासनावर रोष

**तभा वृतसेवा**
**मुखेड, दि. १९ ऑगस्ट -**

मुखेड तालुक्यातील हसनाळ येथे काल पुराच्या पाण्याने जे बळी गेले आहेत ते सर्व बळी नाकर्त्या सत्ताधाऱ्यांचे आणि बेजबाबदार अधिकाऱ्यांच्या हेकेखोरीपणाचे आहेत . त्यामुळे दोषी संबंधित अधिकारी आणि लोकप्रतिनिधींवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करावेत अशी मागणी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बबन बारसे यांनी आज केली आहे . बारसे आज मुखेड तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त हसनाळ , मुक्रमाबाद व अन्य गावांना भेट दिल्या. त्यानंतर ते माध्यमांशी बोलत होते.

मुखेड तालुक्यात काल झालेल्या अतिवृष्टीमुळे हसनाळ, बामणी, मुक्रमाबाद, भेंडेगाव आदी सहा गावांमध्ये पुराचे पाणी शिरले. त्यात हसनाळ मधील चार महिलांचा मृत्यू झाला आहे . एक जन बेपत्ता आहे. याच भागातील एका शेतकऱ्यांच्या अनेक म्हशींचा ही दुर्दैवी मृत्यू झाला आहे . निर्माण झालेली पूर परिस्थिती ही केवळ लेंडी



धरणाच्या घळभरणीमुळे झाली आहे. धरण बुडीत क्षेत्रात येणाऱ्या नागरिकांचे संपूर्ण पुनर्वसन करण्याआधीच जिल्हाधिकारी , संबंधित विभागाचे मुख्य कार्यकारी अभियंता यांनी येथे धरणाच्या घळभरणीला परवानगी दिली. परिणामी अचानक झालेल्या अतिवृष्टीमुळे पुराचे पाणी गावात शिरून महिलांचा मृत्यू झाला . पशुंचे बळी गेले . नागरिकांची दानादान उडवली .अत्यंत भयावह आणि बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. या सर्व परिस्थितीला केवळ राज्य सरकार , या भागाचा लोकप्रतिनिधी , गळभरन करण्यासाठी ज्यांनी प्रयत्न केले ते सर्व जबाबदार लोकप्रतिनिधी , ज्यांनी परवानगी दिली ते जिल्हाधिकारी , संबंधित विभागाचे कार्यकारी अभियंता जबाबदार आहेत. त्यामुळे सर्व लोकांवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करावेत . दोषी तातडीने अधिकाऱ्यांना निलंबित करावे अशी मागणीही त्यांनी यावेळी केली यावेळी उपस्थित शिवसेना जिल्हाप्रमुख बबनराव बारसे, मा. नगरसेवक शहरप्रमुख आनंदराव जाधव, नांदेड तालुकाप्रमुख सुनिल पा. कदम, मुखेड तालुकाप्रमुख उमेश पाटील आडलूरकर, उपजिल्हा संघटक शरद सावकार कोडगिरे, मुखेड शहरप्रमुख शंकर चिंतमवाड, उपतालुकाप्रमुख मन्मथ खंकरे,अनिल पा. राजुरकर,मंगेश पाटील कबनूरकर (सोशल मिडिया तालुका प्रमुख मुखेड),विजय मंगलगे, योगेश मामीलवाड, सुनिल पाटील व सर्व शिवसैनिकांनी दौरा केला.

# पूरस्थितीवर त्वरित उपाययोजना करण्याची आ.कोहळीकर यांची मागणी

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. १९ ऑगस्ट -**

मागच्या काही दिवसांपासून हदगाव - हिमायतनगर तालुक्यात झालेल्या अतिमुसळधार पावसामुळे त्यातच भर म्हणजे ईसापुर धरणातून पैनगंगा नदीत विसर्गात झालेल्या वाढीमुळे नाले - ओढे तुडुंब वाहत असून शेतकरी बांधवांना व पूर बाधित नागरिकांना त्वरित उपाययोजना करण्याची मागणी आ. बाबुराव कदम कोहळीकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे केली असून स्थानिक प्रशासनास देखील सतर्क राहण्याच्या सूचना आयोजित करण्यात आलेल्या नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन बैठकीत दिले. यावेळी तहसील प्रशासन, पंचायत समिती, कृषी विभाग, पोलीस प्रशासन, महावितरण विभागासह इतर विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

हदगाव- हिमायतनगर तालुक्यात अति मुसळधार पावसाने अक्षरशः झोडपले होते. त्यात दोन्ही तालुक्यातील शेतकरी बांधवांचे अतोनात नुकसान तर झालेच पण यावर्षी ईसापुर धरणातून पैनगंगा नदीत विसर्ग मोठ्या प्रमाणावर झाल्यामुळे अनेक गावांना पूरस्थिती निर्माण झाली त्यात आ. कोहळीकर यांनी



प्रत्येक ठिकाणी जाऊन शेतकरी बांधवांना धीर देण्याचे काम तर केलेच त्याचबरोबर शासनास देखील त्वरित आपत्ती व्यवस्थापन कायद्यानुसार तात्काळ मदत व सुरक्षात्मक उपाययोजना, पूरग्रस्त नागरिकांना व जनावरे यांना सुरक्षित स्थळी हलविण्यात यावे, एनडीआरएफ चे पथक तात्काळ पाठविण्यात यावे यासह इतर उपाययोजना करण्यासाठी निवेदनाद्वारे शासनाकडे मागणी केली आहे.

**तातडीने उपाययोजना करणे अत्यावश्यक**



पूरस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कर्ण अत्यावश्यक आहे. विशेषत : महिला, लहान मुले, शेतकरी, शेतमजूर व गुरेढोरे यांच्या सुरक्षितेच प्रधान्य देण्यात यावे. नागरिकांनी धास्तावुन न जाता प्रशासनाला सहकार्य करावे असे आ.कोहळीकर म्हणाले.

## संक्षिप्त वृत्त

### हिसापाथरड ग्रामस्थांचे उपोषण मागे

**मुदखेड**-मुदखेड तालुक्यातील हिसा पाथरड गावच्या गायरान जागे संदर्भात स्वातंत्र दिनाच्या पूर्वसंध्येला सुरू करण्यात आलेले आमरण उपोषण स्थगितीसाठी काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख यांनी मध्यस्थी ची भूमिका निभावली असून स्थानिक प्रशासनाने विशेष ग्रामसभा बोलवून गायरान जागेचा प्रश्न निकाली काढण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर तसेच गैरव्यवहार प्रकरणाच्या चौकशीसाठी स्वतंत्र समिती नेमून हेरिंग ठेवण्याचे पंचायत समितीने आश्वासन दिल्यानंतर अखेर चौथ्या दिवशी उपोषण वाघे घेण्यात आले आहे.

माधव गोविंद एडके , गोविंद नामदेव लोकरे, सुभाष गिरजाजी बोचरे, करण एडके यांनी ग्रामपंचायत अंतर्गत गावच्या विविध विकास योजनेत गैरव्यवहार केल्यासंदर्भात तसेच गायरान जागेवरील प्लॉट वाटपात सत्तेचा गैरवापर करून खऱ्या गरजूंना वंचित ठेवले असल्याने संबंधित प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला गाव पातळीवर आमरण उपोषण सुरू केले होते. यानंतर चार दिवसांपासून सुरू असलेल्या अमरण उपोषण सोडविण्यासाठी आजी माजी सरपंचांनी तसेच पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी शेखर देशमुख , विस्तार अधिकारी निलेश बंडाळे यांनी उपोषणकर्त्यांची बाजू समजावून घेऊन चर्चा केली. सकारात्मक चर्चेनंतर तोडगा काढण्याचे आश्वासन संबंधित प्रशासन व स्थानिक प्रशासनाने दिले आहे. गायरान जागेवरील प्लॉट वाटपासाठी विशेष ग्रामसभा घेण्याचे आश्वासन आमरण उपोषणकर्त्यांना देण्यात आली. पंचायत समितीच्या वतीने ग्रामपंचायत अंतर्गत झालेल्या गैरव व्यवहाराची चौकशी करण्यासाठी विशेष समिती नेमून सत्यता पडताळणीसाठी तक्रारदारां समक्ष हेरिंग ठेवण्याची लेखी पत्र देण्यात आले आहे. सरपंच सरस्वती संभाजी बोचरे, भगवान दशरथ एडके, बळीराम पाटील माजी सरपंच केशवराव बळीराम पाटील बोचरे , माजी सरपंच संभाजी कोंडीबा लोकरे यांनी गायरान जागे संदर्भातील प्लॉट तक्रारी संदर्भात विशेष ग्रामसभेतून प्रश्न निकाली काढण्याचे आश्वासन दिले आहे. यानंतर सरपंच सरस्वतीबाई बोचरे , विस्तार अधिकारी निलेश बंडाळे, काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख, प्रा संदीप देशमुख , बालाजी शिंदे नागेलीकर, राजू बोचरे यांच्या हस्ते लिंबू सरबत देऊन आमरण उपोषण सोडविण्यात आले आहे. यावेळी उपोषणकर्त्याची वैद्यकीय तपासणी करून ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले आहे. गावच्या विविध मागण्यांसाठी ग्रामस्थांच्या वतीने माधव गोविंद एडके यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेले उपोषण लक्षवेधी ठरले आहे . यानंतर या आमरण उपोषणाची दखल संबंधित प्रशासन , स्थानिक प्रशासन यांनी वेळीच दखल घेऊन तोडगा काढण्याचे आश्वासन दिल्यानंतर गावकऱ्यांना तूर्त दिलासा मिळाला आहे.

### प्रा. डॉ.अनिल कांबळे व प्रा.डॉ.उज्वला कांबळे यांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान

**नांदेड** -पुर्णेचे भुमिपुत्र न्यायाला साथ अन्यायाला लाथ हे ब्रिद वाक्य उराशी बाळगून शैक्षणिक,सामाजिक, राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करण्यासाठी अग्रेसर असलेले प्रा.मास्टर अनिल रामभाऊ कांबळे व त्याच्या पत्नी . प्रा.डॉ. सौ.उज्वला कांबळे यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेऊन यांना नाशिक येथील डि. एस. फाऊंडेशन या संस्थेच्या वतीने शिवाजीराजे जाधव लखोजी जाधव यांचे पंधरावे वंशज यांच्या हस्ते राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. सध्या प्रा.डॉ.अनिल कांबळे हे छत्रपती संभाजीनगर येथील सरस्वती भुवन येथे क्रीडा शिक्षक म्हणून कार्यरत आहेत तर त्यांच्या पत्नी उज्वला अनिल कांबळे भीमाशंकर पाडळकर मनुष्य महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथे सहाय्यक शिक्षक आहेत. राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल भगवान महावीर शाळेचे क्रीडा शिक्षक संदीप राठोड,मूलनिवासी संघाचे रत्नदीप वेडे ,प्रा.नंदा सातपुते. युवा नेते विशाल इंगळे, सुनीलकुमार लहाने आदींनी अभिनंदन केले आहे.



### परवानगीशिवाय ग्राहकांना स्मार्ट मीटर बसवु नये: जनता पँथर



**नांदेड** -वीज कायदा सन २००३ नुसार ग्राहकांच्या संमतीशिवाय वीज मीटर बदलणे हा कायद्याचा भंग असून महावितरणने ग्राहकांच्या परवानगीशिवाय स्मार्ट मीटर बसवु नये अशी मागणी जनता पँथरच्या वतीने एका निवेदनाद्वारे महावितरणचे अधिक्षक अभियंत्यांकडे केली आहे. नांदेड शहरात महावितरण कडून प्रीपेड स्मार्ट मीटर बसविण्यात येत आहेत. महावितरण करत असलेली कृती अनधिकृत असून नागरिकांच्या मूलभूत हक्कावर गदा आणणारी आहे. त्याचबरोबर ग्राहक घरी नसताना देखील कुठलीही परवानगी न घेता त्यांच्या परस्पर स्मार्ट प्रीपेड मीटर बसविण्यात येत आहेत. या मीटरची किंमत जवळपास १२ हजार रुपये असून हा खर्च ग्राहकांच्या माथी मारला जात आहे. त्यातच मागील काही महिन्यापासून घरगुती विजेचे बिल अवाढव्य येत असून हे वीज बिल कमी करावे अशी मागणी जनता पँथरच्या वतीने एका निवेदनाद्वारे महावितरणच्या अधीक्षक अभियंत्यांकडे करण्यात आली. या निवेदनावर आकाश चव्हाण, सुभाष पाटील, प्रवीण पाटील, शिवाजी गोडबोले, जयदीप पैठणे, रघुवीर बकाल आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करा : आ. आनंद बोंढारकर

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १९ ऑगस्ट -**



नांदेड : नांदेड जिल्ह्यात गेल्या चार दिवसापासून झालेल्या अतिवृष्टीमुळे नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील अनेक गावांना पुराच्या पाण्याचा फटका बसला आहे. हजारो हेक्टर वरील पिके पाण्याखाली गेली आहेत . अशा परिस्थितीत पूरग्रस्त शेतकरी आणि ग्रामस्थांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा करण्यासाठी, त्यांना धीर देण्यासाठी आ. आनंदराव पाटील तिडके बोंढारकर यांनी आज नांदेड दक्षिण मतदार संघातील अनेक गावांना भेटी दिल्या. राज्य सरकार आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. त्यामुळे कोणत्याही शेतकऱ्यांनी अथवा नागरिकांनी हातबल होण्याची आवश्यकता नाही निश्चितपणे आपल्याला आर्थिक मदत मिळेल असा विश्वास देतानाच नांदेड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी आ. बोंढारकर यांनी या दौऱ्यात केली आहे.

# शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये मदत द्या: काँग्रेस

**तभा वृतसेवा**
**मुखेड, दि. १९ ऑगस्ट -**

तालुक्यातील पुरग्रस्त शेतकऱ्यांना व कुटुंबांना आर्थिक नुकसान भरपाई देण्यात यावी अशा आशयाचे निवेदन शहर काँग्रेसच्या वतीने महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव डॉ.श्रावण रॅपणवाड, काँग्रेस शहराध्यक्ष हणमंत नारनाळीकर यांच्या नेतृत्वात तहसिलदार मुखेड द्वारा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणविस यांना देण्यात आले.

मुखेड तालुक्यात दि १७.०८.२०२५ च्या रात्री मौ. रावणगाव,हसनाळ,भेंडेगाव खु.भिंगोली,भासवाडी,सांगवी भादेव,ईटग्याळ सह परिसरातील गावात ढगसदृष्य पाऊस झाल्यामुळे शेकडो हेक्टर शेती पाण्याखाली जाऊन या भागातील शेतीचे व कुटुंबाचे अतोनात नुकसान झालेले असुन अनेक घरांची पडझड होऊन घरात पाणी शिरल्यामुळे शेतकरी कुटूंबाचे संसार ऊपयोगी साहीत्य पुरात वाहुन गेल्यामुळे शेकडो कुटुंब उघडयावर पडले आहेत.शेकडो जनावरे मृत्युमुखी पडले असुन पुराच्या पाण्यात कित्येक नागरीक बेपत्ता असुन दि.१८.०८.२०२५ च्या रात्रीपर्यंत ३ ते ४ नागरीकांचे मृतदेह सापडले आहेत.या ढगसदृष्य पावसाच्या पुरामुळे शेतकऱ्यांचे अफाट नुकसान झालेले असुन मुखेड तालुक्यातील पुरग्रस्त शेतकऱ्यांना शेतीचे नुकसान भरपाई म्हणुन प्रतिहेक्टरी ५० हजार रुपय दयावेत व पडझड झालेल्या उध्वस्त कुटुंबाना प्रतिकुटुंब २५ हजार रुपय मदत म्हणुन दयावी.शेतीचे व घराचे पंचनामे तात्काळ होण्यासाठी संबंधित विभागास सुचना देऊन मुखेड तालुक्यातील पुरग्रस्त शेतकरी कुटुंबाना न्याय देण्याची मागणी शहर काँग्रसने केली असुन,तालुक्यातील पुरग्रस्त भागात खा.प्रा. रविंद्र चव्हाण,माजी.आमदार हणमंतराव पा. बेटमोगरेकर व काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी शेतकरी कुटुंबाना प्रत्यक्ष भेटून समस्या जाणुन घेतल्या.या निवेदनावर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे महासचिव डॉ.श्रावण रॅपणवाड, काँग्रेस शहराध्यक्ष हणमंत नारनाळीकर, युवक काँग्रेस शहराध्यक्ष जयप्रकाश कानगुले, अल्पसंख्यांक सेल काँग्रेस अध्यक्ष ईमराण पठाण, मागासवर्गीय काँग्रेस सेल शहराध्यक्ष बालाजी साबणे, तालुका काँग्रेस सचिव रामेश्वर पाटील इंगोले, तालुका युवक काँग्रेस उपाध्यक्ष एम.आर.गोपणर, जिल्हा युवक काँग्रेस सचिव सुनिल पाटील आरगिळे, काँग्रेस शहर उपाध्यक्ष बालाजी वाडेकर, उपाध्यक्ष शिवाजी गायकवाड, आदिवासी कोळी समाजाचे नेते मारोतराव मामीलवाडसह मुखेड तालुक्यातील शेतकरी व शहर काँग्रेसचे पदाधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या असुन या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी नांदेड यांना देण्यात आली आहे.

# पंतप्रधानांच्या दौऱ्यापूर्वी गुरुद्वारा बोर्डाने प्रशासकीय सुधारणा आणि सुरक्षा करावी : गल्लीवाले

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १९ ऑगस्ट -**

येत्या नोव्हेंबरमध्ये नववे शीख गुरु श्री गुरु तेग बहादूर जी यांची ३५० वी हुतात्मा जयंती राष्ट्रीय स्तरावर साजरी केली जात आहे. महाराष्ट्रातील मुंबई, नागपूर आणि नांदेड येथे भव्य समारंभ आयोजित केले जात आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नांदेड समारंभाला उपस्थित राहणार आहेत. पंतप्रधानांच्या भेटीला लक्षात घेऊन गुरुद्वारा सचखंड बोर्डाचे प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंग यांना गुरुद्वारा बोर्डात तातडीने प्रशासकीय सुधारणा करण्याचे, भ्रष्टाचाराविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याचे आणि सुरक्षा व्यवस्था बळकट करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी गल्लीवाले यांनी फडणवीस यांच्याकडे केली आहे.



गल्लीवाले म्हणाले की, विजय सतबीर सिंह यांच्या दोन वर्षांच्या कार्यकाळात बोर्डात अनुशासनहीनता वाढली आहे. नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या पंतप्रधानांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर मंडळ व्यवस्थापनात सुधारणा करून सुरक्षा व्यवस्था बळकट करण्याची, मूलभूत सुविधा विकसित करण्याची तसेच सक्षम मुख्य अधीक्षक नियुक्त करण्याची मागणी केली आहे.

# सरकारने तात्काळ मदत जाहीर करावी : शिवशंकर कलंबरकर

**तभा वृतसेवा**
**मुक्रमाबाद, दि. १९ ऑगस्ट -**

लेंडी परिसर व मुखेड तालुक्यात २५० पेक्षा अधिक मी.मी.पावसामुळे मोठ्या प्रमाणात जीवितहानी झाली आहे.शेकडो पेक्षा अधिक म्हशींचा व जनावरांचा जीव गेला आहे.माणसांचीही जीवित हानी झाली आहे.घरं-पुलं-रस्त्यांची मोठी हानी झाली आहे.तर पिकं अक्षरशः वाहून गेली आहेत.या हानीमुळे सामान्य माणूस,शेतकरी उघडा झाला आहे.सरकारने याची दखल घेऊन पंचनाम्याची औपचारिकता सारून तात्काळ पुरग्रस्तांना मदत जाहीर करावी,अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तहसील कार्यालयामार्फत शिवशंकर पाटील कलंबरकर यांनी केली आहे.

मध्यरात्री झालेल्या महापुरामुळे लेंडी परिसरातील काही गावांचा संपर्क पूर्णतः तुटला होता.प्रशासनाचे मदतकार्य मिळे प्रयंत लोकांना सुरक्षित स्थळी नेतांना ट्रॅक्टर सारखी वाहने वाहून गेली.सकाळनंतर प्रशासनाच्या एनडीआरएफ, लष्करी पथकाकडून लोकांना सुरक्षित स्थळी नेण्यात आले. वाहून गेलेले काही नागरिक अजून प्रयंत सापडले नाहीत.यात काही नागरिकांची जीवितहानी झाल्याचे त्यात अडकलेल्या लोकांकडून सांगीतले जात आहे.तर लेंडी प्रकल्पग्रस्तांकडून पुनर्वसनाअगोदर धरणाचे पाणी थांबवणारे लेंडी प्रशासन झालेल्या जीवितहानीला जबाबदार असून त्यांच्यावर कार्यवाही करावी अश्या पूरग्रस्तांच्या संतप्त प्रतिक्रिया आहेत.याची संवेदनशील दखल घेऊन कार्यवाही करावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

# बेनिफिशियरी ॲपचा वापर करावा : -तहसीलदार जगताप

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. १९ ऑगस्ट -**

विशेष सहाय योजनेतून विधवा, दिव्यांग आणि ज्येष्ठ व्यक्ती लाभार्थ्यांना दरवर्षी हयातीच्या दाखल्याचा तगादा लावला जातो. आता त्यातून सुटका होण्याची संधी ॲपमुळे उपलब्ध झाली असून निराधारांना आता घरूनचे हयात प्रमाणपत्र मिळवता येणार आहे. या ॲपचा लाभ घेऊन लाभार्थ्यांनी गैरसोय टाळावी असे आवाहन माहूरचे तहसीलदार अभिजीत जगताप यांनी केले आहे.

बेनिफिशियरी ॲप तसेच आधार फेस आरडी ॲप या दोन ॲपचा उपयोग करून आपल्या स्मार्टफोनवरून घरबसल्या काही मिनिटांत हयात प्रमाणपत्र तहसीलदार माहूर यांच्याकडे दाखल करू शकतात. हे ॲप वापरून विविध योजनांचा लाभ चालू ठेवता येतात. या नवीन सुविधेमुळे ही प्रक्रिया सोयीची बनली असुन ॲपचा वापर करण्याचे आवहन जगताप यांनी केले आहे.

# किनवट-माहुर विधानसभा क्षेत्रातील पुरग्रस्तांसाठी आ. केराम सरसावले

**तभा वृतसेवा**
**किनवट/माहूर, दि. १९ ऑगस्ट -**

किनवट-माहूर तालुक्यात अतिवृष्टीमुळे आणि ईसापुर धरणातील पाण्याचा विसर्ग करण्यात आल्यामुळे प्रचंड पूरस्थिती निर्माण झाली असून यामुळे शेतातील पिकांचे तसेच नागरी वस्त्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर किनवट-माहूर विधानसभेचे आमदार भिमराव केराम यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन पाठवून सरसकट आर्थिक मदत, पिक नुकसान भरपाई तसेच अन्य पूरानुषंगिक उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.



आ. केराम यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे की, दिनांक १५ व १६ ऑगस्ट रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे किनवट तालुक्यातील ६ महसूल मंडळात व माहूर तालुक्यातील १ महसूल मंडळात अतिवृष्टी झाली. नदी-नाल्यांना आलेल्या पुरामुळे शेतजमिनी खरडून गेल्या असून शंभर टक्के पीक नुकसान झाले आहे. नागरी वस्तीमध्ये पुराचे पाणी शिरून अनेक कुटुंबांचे संसार उध्वस्त झाले आहेत, कच्ची घरे पडून अन्नधान्य व घरगुती साहित्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. पाळीव जनावरे वाहून गेली असून, किनवटमध्ये एका स्कूल बस चालकासह एका व्यक्तीचा मृत्यू झाला व एक जण गंभीर जखमी आहे.

माहूर तालुक्यात अंदाजे १६,३२७ शेतकरी बाधित, १७,२८३ हे.आर. जमीन खरडून पिके नष्ट, ७६ घरे बाधित, एक दुधाळ जनावर वाहून गेले. किनवट तालुक्यात : ४४,३५६ शेतकरी बाधित, कापूस ३१,५१० हे.आर., सोयाबीन १५,५६० हे.आर., ज्वारी ६०, मका १,२०५, तूर ४,०३२, मुग ११३, उडीद ११०, फळपिके १५४ हेक्टरवर नुकसान झाले आहे. अनेक पूल व रस्ते वाहून गेल्याने वाहतुकीची मोठी समस्या निर्माण झाली असुन शेतकऱ्यांना तातडीने पीक नुकसान भरपाई द्यावी, शेतकऱ्यांचे कृषी निविष्ठेचे (बियाणे, खते, औषधे) नुकसान भरून काढण्यासाठी विशेष अनुदान द्यावे, नागरी वस्तीत बाधित झालेल्या कुटुंबांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, पूरामुळे बाधित झालेल्या रस्ते व पुलांची तातडीने दुरुस्ती करून आवश्यक ठिकाणी संरक्षण भिंतीचे बांधकाम करावे अशी मागणी आ. केराम यांनी केली आहे.

दरम्यान पूरस्थितीची माहिती मिळताच आमदार भिमराव केराम यांनी किनवट शहर व परिसराचा दौरा करून नुकसानीचा आढावा घेतला. पुरात वाहून गेलेल्या ऑटो चालक पवार यांच्या कुटुंबीयांशी दूरध्वनीवरून संपर्क साधून त्यांना धीर दिला. तहसीलदार सौ. शारदा चौंडेकर यांना दूरध्वनीद्वारे तात्काळ नुकसानीचा पंचनामा करण्याच्या सूचना दिल्या. नागरीक, शेतकरी व व्यापाऱ्यांना तत्काळ मदत उपलब्ध करून देण्याचे निर्देशही दिले. पुरात मृत्यू झालेल्या ऑटो चालकाच्या कुटुंबाला शासनाच्या नैसर्गिक आपत्ती निवारण निधीतून ४ लाख रुपये मदत तातडीने मंजूर करण्याचा प्रस्ताव तयार करण्याचे आदेश, पुरबाधितांसाठी अन्न व राहण्याची व्यवस्था तातडीने करण्याचे निर्देश. देण्यात आले.

# धर्माबाद ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकिय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १९ ऑगस्ट -**

धर्माबाद येथील ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे शिवाजी पांचाळ यांचा मृत्यू झाला असून, या प्रकरणाची चौकशी सुरु आहे. दरम्यान चौकशी सुरु असताना जावक क्रमांक तसेच स्टॅम्प नसलेले पत्र धर्माबाद येथील वैद्यकीय अधीक्षकांनी समाज माध्यमावर व्हायरल केले असून या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्या विजयालक्ष्मी सोनटक्के यांनी एका निवेदनाव्दारे जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

धर्माबाद ग्रामीण रुग्णालयात दि.७ ऑगस्ट रोजी उपचारासाठी आलेल्या शिवाजी गोपीनाथ पांचाळ यांचा वेळेवर उपचार न मिळाल्याने मृत्यू झाला होता. या प्रकरणी तक्रार करण्यात आल्यानंतर जिल्हा शल्यचिकित्सकांनी यासंबंधाने चौकशी समिती नेमली. परंतू चौकशी सुरु असताना ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षक व अधिकारी, कर्मचारी कार्यरत असून चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करावे तसेच चौकशी पूर्ण झाली नसतानाही दि.१४ ऑगस्ट रोजी वैद्यकीय अधीक्षकांनी जावक क्रमांक तसेच स्टॅम्प नसलेले प्रसिध्दीपत्रक समाज माध्यमावर व्हायरल करुन पत्रकार व पिडीत कुटुंबाची दिशाभूल केली असून या प्रकरणात दोषीवर कडक कारवाई करावी, अन्यथा दि.१६ सप्टेंबरपासून धर्माबाद ग्रामीण रुग्णालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्त्या विजयालक्ष्मी सोनटक्के यांनी दिला आहे.

# 'खुशी' च्या उपक्रमाने अंध विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमलली खुशी

**तभा वृतसेवा**
**देगलुर, दि. १९ ऑगस्ट -**

शहरातील सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर असणाऱ्या खुशी सेवाभावी संस्थेच्या वतीने अनेक सामाजिक उपक्रम घेतले जातात. शहरातील अंध विद्यालय येथे ४७ विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून गणवेश वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचे चेहरे आनंद भारावून गेल्याचा क्षण पाहायला मिळाला.

आपल्या आयुष्यातील अंधारमय जगातही प्रकाशाची ज्ञानज्योत कशी उजळावी, प्रत्येक मुलाने आत्म विश्वासाने समाजात वाटचाल करावी, या भावनेतून यापूर्वी या संस्थे च्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना गणवेश देण्यात आले होते, त्यावेळीही सर्वच्या सर्व ४७ विद्यार्थ्यांना मिळाल्याने त्यांचं हा आनंद गगनात मावेनाशा झाला होता.



या संस्थेचे अध्यक्ष बबलू टेकाळे यांनी सांगितले की, लहान मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहिला की माझे मन भारावून जाते. त्यांच्या चेहऱ्यावरची खुशी हीच माझी खरी संपत्ती आहे. मी दिलेला शब्द पाळणार असून येत्या दसऱ्याला विद्यालयासाठी संगणक उपलब्ध करून विद्यार्थ्यांना एकसारखा गणवेश देणार आहे. विद्यार्थ्यांच्या उज्वलभविष्याचा गाजावाजा न करता, अगदी मनापासून सेवा करण्याची गरज असते, याचे उदाहरण या उपक्रमातून दिसून आले. विद्यार्थ्यांच्या निरागस चेहऱ्यावर उमटलेले हास्य आणि मिळालेल्या गणवेशाची खुशी, हेच या उपक्रमाचे खरे यश ठरले.

शहरातील 'खुशी सेवा भावी संस्थे ' च्या वतीने असे अनेक सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक उपक्रम म्हणजे समस्त देगलूरवाशियांसाठी अभिमानाची बाब आहे. या सर्व सामाजिक कार्याचे शहरातील लहान थोरामध्ये चर्चा सुरु आहे.